
पुणे, मंगळवार, ८ एप्रिल २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 130 • वर्ष ४ थे, अंक १३० • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News



जिल्हाधिकाऱ्यांचा रौद्रावतार; अधिकारी 'गर्भगळीत'..!

P३



चेंडूवर लाळेच्या परवानगीचा फायदा होतो आहे : सिराज

१२

# राहू -केतू वर केळकरांचे खापर

## मंगेशकर रुग्णालयातील डॉक्टर सुश्रुत घैसास यांचा राजिनामा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे शहरातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या कथित हलगर्जीपणामुळे गर्भवती तनिषा भिसे यांचा मृत्यू झाल्याच्या घटनेने संपूर्ण प्रशासनावर रोषाचा डोंगर कोसळला आहे. या प्रकरणात आता रुग्णालयातील वरिष्ठ डॉक्टर सुश्रुत घैसास यांनी आपल्या पदाचा राजीनामा सादर केल्याने नवी चर्चा सुरु झाली आहे.

त्याचबरोबर रुग्णालयाचे डीन डॉ. धनंजय केळकर यांनी पुणे येथे पत्रकारपरिषदेत तनिषा भिसे यांच्या उपचारासाठी त्या दिवशी १० लाख रुपयांच्या ठेवीची (डिपॉझिट) मागणी करण्यात आल्याची कबुलीही डॉ. केळकर यांनी दिली. ते म्हणाले, "आम्ही सामान्यतः डिपॉझिट घेत नाही, पण त्या दिवशी काय झाले माहीत नाही, राहू-केतूचा परिणाम असावा, पण १० लाख मागितले गेले." असे सांगून साऱ्याप्रकरणाचे खापर राहू आणि केतू ग्रहांवर टाकून एका वेगळ्याच चर्चेला उधान आले. तनिषा भिसे मृत्यू प्रकरणाच्या गंभीरतेमुळे रुग्णालय प्रशासनाने डॉ. घैसास यांचे राजीनामापत्र लता मंगेशकर मेडिकल फाउंडेशनच्या विश्वस्त मंडळासमोर ठेवले आहे. "मला धमकीचे फोन येत आहेत, मी दबावाखाली आहे. सोशल मीडियावरही माझ्यावर तीव्र टीका होत आहे. या तणावपूर्ण वातावरणामुळे डॉ. घैसास यांनी राजीनामा देण्याचा निर्णय घेतला. रुग्णालयाची बदनामी टाळण्यासाठीच त्यांनी हे पाऊल उचलले आहे.



> डिपॉझिट सगळ्यांकडून घेत नाही. गरीब लोकांकडून तर अजिबातच घेत नव्हतो. ज्यांना जमेल त्यांना पैसे मागितले जात होते. पण या प्रकरणानंतर आम्ही डिपॉझिट हि पॉलिसी रद्द केली आहे. इथून पुढे ती घेतली जाणार नाही. त्यादिवशी असं काय झालं यांनी कागदावर डिपॉझिट लिहून दिलं हे माहित नाही.
>
> -डॉ. धनंजय केळकर

# ब्लॅक मंडे





■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चीन :** भारतासह संपूर्ण आशियाई शेअर बाजारात सोमवार ७ एप्रिल रोजी मोठी घसरण झाली, जो आता 'काळा सोमवार' म्हणून ओळखला जातो. या मोठ्या प्रमाणात घसरणीचे मुख्य कारण चीनने केलेली प्रत्युत्तरात्मक कारवाई असल्याचे मानले जाते, ज्याने अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणाला प्रत्युत्तर म्हणून त्यांच्यावर ३४% चा मोठा टॅरिफ लादला आहे. यामुळे अमेरिका आणि चीनमधील व्यापार युद्ध अधिकच तीव्र होत चालले आहे, ज्यामुळे संपूर्ण जगात मंदीचा धोका निर्माण झाला आहे.

सोमवारी भारतासह जगभरातील शेअर बाजारात मोठी घसरण झाली. गुंतवणूकदारांना अब्जावधी डॉलर्सच्या मालमत्तेचे नुकसान सहन करावे लागले. बाजार उघडताच, बीएसई सेन्सेक्स ३,९३९.६८ अंकांनी किंवा ५.२२% ने घसरून ७१,४२५.०१ च्या पातळीवर पोहोचला. एनएसई निफ्टी देखील १,१६०.८० अंकांनी किंवा ५% ने घसरून २१,७४३.६५ वर बंद झाला. एकट्या भारतीय शेअर बाजारात गुंतवणूकदारांच्या संपत्तीत १६.१९ लाख कोटी रुपयांची मोठी घट झाली.

● शेअर बाजारात 'ब्लॅक मंडे' हा शब्द १९ ऑक्टोबर १९८७ पासून सुरू झाला, जेव्हा जगभरातील शेअर बाजारात अचानक आणि मोठ्या प्रमाणात घसरण दिसून आली. त्यावेळी सुमारे १.७ ट्रिलियन डॉलर्सची मालमत्ता नष्ट झाली होती. या मंदीमुळे व्यापक आणि दीर्घकाळापर्यंत आर्थिक अस्थिरता निर्माण झाली आणि १९२९ ते १९३९ च्या महामंदीची पुनरावृत्ती होण्याची भीती निर्माण झाली. आता २०२५ मधील हा नवीन 'ब्लॅक मंडे' देखील जागतिक मंदीचे लक्षण म्हणून पाहिले जात आहे.



# घाटे यांच्या गौप्यस्फोटामुळे मेधाताई तोंडघशी!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**पुणे :** राज्यसभेच्या खासदार मेधा कुलकर्णी आणि भाजपा शहर अध्यक्ष धीरज घाटे यांच्यातील कोल्ड वॉर सध्या चर्चेचा विषय आहे . महिला मोर्चावर कारवाई करण्याबाबत अध्यक्ष धीरज घाटे यांना पत्र दिल्याचे काल खासदार मेधा कुलकर्णी यांनी सांगितले ..

परंतु प्रत्यक्षात असले कुठलेही पत्र त्यांनी शहर भाजपाला दिले नाही . माध्यमात त्यांनी या पत्राची चर्चा केली . असा गौप्य स्फोट शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी केला .

त्यामुळे मेधा कुलकर्णी या तोंडावर आपटले आहेत. डॉ . घैसास यांच्या जवळीकतेमुळे मेधा ताई या डॉ. घैसास क्लिनिक वरील हल्ल्यामुळे व्यथित झाल्या होत्या.

मंगेशकर रुग्णालय प्रकरणी भाजपच्या खासदार मेधा कुलकर्णी यांनी भाजपच्या पदाधिकाऱ्यांचे कान टोचले आहेत. 'सोम्या - गोम्या' असा उल्लेख करून कायदा हातात घेतल्याचे म्हणत थेट भाजप पदाधिकाऱ्यांना फैलावर घेतले आहे. मेधा कुलकर्णी यांनी शहराध्यक्ष धीरज घाटे यांना पत्र लिहून डॉक्टर घैसास यांच्या रुग्णालयात झालेल्या तोडफोडीबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. भाजपच्या महिला आघाडीने घैसास यांच्या रूग्णालयात तोडफोड केली होती. मेधा कुलकर्णी यांनी घाटे यांना पत्र पाठवले आहे असे सांगण्यात आले . या प्रकरणी पुण्याचे भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी प्रतिक्रिया देताना 'मला हे पत्र मेधा कुलकर्णींनी दिलं नाही माध्यमांच्या मार्फत हे पत्र मला समजलं असल्याचं म्हटलं आहे. यामुळे आता मंगेशकर रुग्णालयामुळे पुणे भाजपमधील कोल्ड वॉर सुरू आहे का? अशा चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाल्या आहेत.

महिला मोर्चाच्या महिला कार्यकर्त्यांमुळे त्यांनी पत्र दिलं आहे. मात्र, एका महिलेला प्रसूती दरम्यान मृत्यू झाल्याने महिलांचा रोष हा साहजिक आहे. मेधा कुलकर्णी आणि मी काल स्थापना दिनाच्या कार्यक्रमात भेटलो होतो, त्यावेळी या पत्रासंदर्भात काहीही बोलणं झालं नाही. त्यांनी पक्षाच्या बैठकीत ह्या गोष्टी बोलायला हव्या होत्या, पत्राच्या माध्यमातून सगळ्यांना द्यायला नको होतं, मीडियाच्या माध्यमातून हे पत्र मला मिळालं आहे, असंही घाटे यांनी स्पष्ट केलं आहे

# इंधनाचा भडका!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**दिल्ली :** पेट्रोल, डिझेलच्या उत्पादन शुल्कात दोन रुपयांची वाढ केल्यानंतर लगेचच केंद्र सरकारने आणखी एक झटका दिला आहे. एलपीजी गॅस सिलिंडरच्या किमतीत वाढ जाहीर केली आहे. एलपीजी गॅस सिलिंडरच्या दरात ५० रुपयांची वाढ करण्यात आली आहे. ही वाढ तत्काळ प्रभावाने लागू करण्यात येणार आहे. थोड्या वेळापूर्वीच सरकारने पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्क वाढवण्याचा निर्णय घेतला होता. सेन्सेक्सची घसरण आणि पेट्रोल-डिझेलचे भाव वाढल्यानंतर आता सर्वसामान्यांना धक्का देणारी ही बातमी आहे. ही दरवाढ प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या (पीएमयूवाय) लाभार्थी आणि गैर-लाभार्थी दोघांनाही लागू आहे. सुधारित किमती ८ एप्रिलपासून लागू होणार आहेत. उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांसाठी गॅस सिलिंडरची किंमत ५०० रुपयांवरून ५५० रुपयांपर्यंत वाढेल. इतर ग्राहकांसाठी, ती ८०३ रुपयांवरून ८५३ रुपयांपर्यंत वाढणार असल्याची माहिती, केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी दिली.

पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्क वाढीचा उद्देश ग्राहकांवर भार टाकण्याचा नाही. त्याऐवजी अनुदानित गॅसच्या किमती वाढविल्यामुळे तेल विपणन कंपन्यांना झालेल्या ४३,००० कोटी रुपयांच्या तोट्याची भरपाई करण्यास मदत करणे आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती घसरत असताना देखील सरकारने पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात प्रति लिटर २ रुपयांची वाढ केली आहे.

» पान ७ वर

# मोहोळांनी घेतला अनोखा अनुभव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** बाणेर येथील यो स्काईज एव्हीएशन इन्स्टिट्यूटने विकसित केलेल्या देशातील पहिल्या स्वदेशी बनावटीच्या एअरबस ए३२० फ्लाइट सिम्युलेटरचे उदघाटन केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अत्याधुनिक सिम्युलेटरवरून विमान चालवण्याचा अनुभव घेतला.

उद्घाटनप्रसंगी मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी स्वतः या सिम्युलेटरवर आभासी पद्धतीने "मुंबई विमानतळावरून एअरबस ए ३२० उडवण्याचा अनुभव घेतला आणि तो अनुभव अत्यंत आनंददायी व वास्तविकतेचा असल्यासारखा भास झाला, असे सांगितले. त्यांनी सिम्युलेटरमधील यथार्थपणा, प्रशिक्षणक्षमता आणि भारतीय तरुण अभियंत्यांच्या कामगिरीचे विशेष कौतुक केले.

या प्रसंगी यो स्काईजचे संस्थापक संचालक स्क्वॉड्रन लीडर (नि.) अजय परांजपे आणि संचालिका कॅप्टन तृप्ती कर्नावट यांनी सिम्युलेटरविषयी सविस्तर माहिती मान्यवरांना दिली.

» पान ७ वर

## At a Glance

### सुधीर मुनगंटीवारांना खडेबोल

**चंद्रपूर :** भाजपच्या जेष्ठ नेत्या, माजी मंत्री आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या काकू शोभाताई फडणवीस यांनी माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांचं नाव न घेता भर कार्यक्रमात कानपिचक्या दिल्याचे समोर आले आहे. "जोरगेवार चंद्रपूरचे आमदार असल्यामुळे त्यांच्या कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित राहणं आवश्यक होतं, छोट्या छोट्या मानसन्मानासाठी भांडू नका,

» पान ७ वर

### बेस्ट बसने चिमुरडीला चिरडलं

**बोरिवली :** बोरिवली पूर्वेतील राजेंद्र नगरमध्ये एका बेस्ट बसने ३ वर्षाच्या चिमुरडीला चिरडल्याची घटना घडलीय. राजेंद्र नगरमध्ये हा अपघात घडलाय. एका लहान मुलीला बेस्ट बसने धडक दिली. यात मुलीचा जागीच मृत्यू झालाय. पोलीस घटनास्थळी पोहोचले असून प्रकरणाचा तपास करत आहे. कस्तुरबा मार्ग पोलिसांनी बस चालकाला ताब्यात घेतले आहे.

### बदलापूर प्रकरणी सरकारला दणका

**बदलापूर :** बदलापूरच्या अक्षय शिंदे बनावट चकमक प्रकरणी उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दणका दिला आहे. या प्रकरणातील संबंधित पोलिस अधिकाऱ्यांवर तातडीने गुन्हा दाखल करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिले आहेत. या प्रकरणातील पोलिस अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करणार नाही अशी भूमिका

» पान ७ वर

## सांत्वनपर भेट...

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी आरोग्य विभागाचा अहवाल पाहण्याअगोदर भिसे कुटुंबीयांची भेट घेतली.

# ५ तास रक्तस्राव, तरी उपचाराविना... - रुपालीताई चाकणकर भडकल्या

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी दिनानाथ मंगेशकर रुग्णालयातील गर्भवती महिलेच्या मृत्यूप्रकरणी पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी चौकशी समितीने दिलेल्या अहवालाबाबत तसेच राज्य शासनाने दिलेल्या अहवालाबाबत माहिती दिली.

राज्य महिला आयोगाने राज्य शासनाला समिती स्थापन करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार, चार सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली. त्यानुसार, संबंधित महिलेचा मृत्यू हा माता मृत्यू असल्याने यासंबंधी सखोल चौकशी माता मृत्यू अन्वेषण समितीच्या माध्यमातून होईल. सखोल चौकशी करुन हा अहवाल आज संध्याकाळपर्यंत येईल. मात्र संपूर्ण घटनेत रुग्णालयावर ठपका ठेवण्यात आला आहे. संध्याकाळपर्यंतचे अहवाल आल्याशिवाय कोणतीही कायदेशीर कारवाई करता येणार नाही. उद्यापर्यंत या घटनेप्रकरणी अंतिम निष्कर्ष काढला जाईल, अशी माहिती रुपाली चाकणकर यांनी दिली आहे.

चौकशी समितीने दिलेल्या अहवालाबाबत बोलताना त्या म्हणाल्या, 'पोलीस आयुक्त, आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांची आढावा बैठक पार पडली. या बैठकीला उपस्थित राहण्याआधी मी भिसे कुटुंबीयांची घरी जाऊन भेट घेतली. त्यांनी याबाबत काही गोष्टी सांगितल्या.'

### चाकणकरांकडून निषेध व्यक्त...

● रूपाली चाकणकर यांनी या प्रकरणाची संपूर्ण माहिती दिली आहे. यावेळी दीनानाथ रूग्णालयावरती ठपका ठेवण्यात आला आहे. तनिषा भिसे यांच्या मृत्यूला दीनानाथ रूग्णालय जबाबदार असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे. यावेळी त्यांनी रूग्णालयाने रूग्णाच्या खासगी माहिती अहवालातून दिल्याने चाकणकरांनी निषेध व्यक्त काल असून याबाबत त्यांनी दीनानाथ रूग्णालयाला समज देण्यात येईल असंही त्यांनी सांगितलं आहे.

# नव्या युगाचे भवितव्य ईलेक्ट्रिक कार

## एमआयटी डब्ल्यूपीयूत 'ई-मोबिलिटी सेंटर ऑफ एक्सलन्स' चे उद्घाटन

### तंत्रज्ञान

**"ई-मोबिलिटी क्षेत्रात नवोपक्रम, संशोधन व विकासाला प्रोत्साहन देणे, कौशल्य विकास आणि प्रशिक्षण प्रदान करणे, उद्योग व शैक्षणिक संस्थांमधील सहकार्याला प्रोत्साहन देणे आणि ईव्ही तंत्रज्ञानाबद्दल जागरुकता वाढवणे हा मुख्य उद्देश आहे. तसेच प्रकल्प विकास, सहयोगी संशोधन, करिअर कौन्सिलिंग, विद्यार्थी आणि प्राध्यापकांचे प्रशिक्षण, उदयोगांशी सल्लामसलत, स्टार्टअप सहाय्य आणि ईव्ही क्षेत्रात संशोधन आणि विकास हे सेंटरचे महत्वाचे काम आहे."**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** "नव्या युगामध्ये आयसी इंजीन बरोबरच इलेक्ट्रिक कार झपाट्याने वाढतांना दिसत आहेत. भविष्यात हायब्रीड व्हेइकल्स, ईलेक्ट्रिक कार आणि हायड्रोजन कार असे अनेक पर्याय इलेक्ट्रिक कारमध्ये उपलब्ध होतील, लवकरच हे सेक्टर फार मोठा पल्ला गाठणार आहे. या सर्व इंडस्ट्रीला मदत करणारे हे सेंटर अत्यंत महत्वपूर्ण असेल." असे विचार टाटा मोटर्सचे वरिष्ठ महाव्यवस्थापक नारायण जाधव यांनी व्यक्त केले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी च्या वतिने नव्याने सुरू करण्यात आलेल्या ई-मोबिलिटी सेंटर ऑफ एक्सलन्सचे अधिकृत उदघाटन टाटा मोटर्सचे वरिष्ठ महाव्यवस्थापक नारायण जाधव, माईर्सचे संस्थापक विश्वस्त व पेट्रॉन प्रा. प्रकाश जोशी आणि एमआयटी डब्ल्यूपीयूचे कुलगुरू डॉ. आर.एम.चिटणीस यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या प्रसंगी डॉ. पारूल जाधव, डॉ. साकेत येवलेकर, डॉ. कृष्णप्रसाद गुणा, डॉ. पंकज धात्रक आणि प्रा. हेरंब फडके उपस्थित होते.



माईर्सचे संस्थापक विश्वस्त प्रा. प्रकाश जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली व गुजरातच्या गांधीनगर येथील इंटरनॅशनल ऑटोमोबाइल सेंटर ऑफ एक्सलन्स यांच्या सहकार्याने एमआयटीतील डब्ल्यूपीयूत ई-मोबिलिटी सेंटर ऑफ एक्सलन्सची स्थापना करण्यात आली आहे. इलेक्ट्रिक मोबिलिटीच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अभ्यास करण्यासाठी हे सेंटर समर्पित आहे. तसेच महाराष्ट्रातील अभियांत्रिकी महाविद्यालये, उद्योग क्षेत्रातील आणि प्राध्यापकांसाठी अभ्यासक्रम चालविला जाणार आहे.

प्रा.प्रकाश जोशी म्हणाले, " ई-मोबिलिटी क्षेत्रात नवोपक्रम, संशोधन व विकासाला प्रोत्साहन देणे, कौशल्य विकास आणि प्रशिक्षण प्रदान करणे, उद्योग व शैक्षणिक संस्थांमधील सहकार्याला प्रोत्साहन देणे आणि ईव्ही तंत्रज्ञानाबद्दल जागरुकता वाढवणे हा मुख्य उद्देश आहे. तसेच प्रकल्प विकास, सहयोगी संशोधन, करिअर कौन्सिलिंग, विद्यार्थी आणि प्राध्यापकांचे प्रशिक्षण, उदयोगांशी सल्लामसलत, स्टार्टअप सहाय्य आणि ईव्ही क्षेत्रात संशोधन आणि विकास हे सेंटरचे महत्वाचे काम आहे."

> "सेंटर ऑफ एक्सलन्स हे इलेक्ट्रिक वाहने आणि संबंधित तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात उत्कृष्टता प्राप्त करण्यासाठी संशोधन, विकास, कौशल्य विकास आणि उदयोगाशी सहकार्याला प्रोत्साहन देण्यासाठी स्थापन केलेले केंद्र आहेत."
>
> -नारायण जाधव

#रा

## ईशरे' अध्यक्षपदी ठाकूर

**पुणे :** 'इंडियन सोसायटी ऑफ हीटिंग, रेफ्रिजरेटिंग ॲण्ड एअर कंडिशनिंग इंजिनिअर्स' (ईशरे) पुणे शाखेच्या अध्यक्षपदी चेतन ठाकूर यांची नियुक्ती करण्यात आली. ठाकूर आणि त्यांच्या कार्यकारिणीचा पदग्रहण व शपथविधी वाकड येथे झालेल्या कार्यक्रमात नुकताच झाला.

सोसायटीचे अध्यक्ष जयंतकुमार दास, कमलेश मेहता, अजाज काझी, रमेश परांजपे, नंदकिशोर कोतकर, आर. एस. कुलकर्णी, दीपक वाणी आणि सभासद उपस्थित होते. कार्यक्रमात अरविंद सुरंगे यांनी अमेरिकेतून पाठविलेली शुभेच्छा चित्रफीत दाखविण्यात आली. २०२५ - २६ या कालावधीसाठी नवनिर्वाचित सभासदांमध्ये नियोजित अध्यक्ष सुभाष खनाडे, कोषाध्यक्ष अमित गुलवडे, सचिव विमल चावडा, माजी अध्यक्ष आशुतोष जोशी, विशाल पवार, सुबोध मुरकेवार, कौस्तुभ वाणी, नीलेश गायकवाड, महेश मोरे, प्रमोद वाजे, आर. शशिधर, अरुण चिंचोरे, सुजल शहा, देविका मुथा, आदिती बगाडे, सरिता मोरे, मानव चौबे, लोकेश सैंदाणे, मनीष ताम्हणे, क्षितीज डहाके आदींचा समावेश आहे. वीरेंद्र बोराडे यांनी संयोजन केले.

## विश्वासार्ह माहिती संकलित व्हावी : डॉ. शिकारपूर



**पुणे :** "कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरापूर्वी योग्य आणि विश्वासार्ह माहितीचे संकलन होणे आवश्यक आहे. तसेच शासकीय कामकाजात याविषयी स्वतंत्र विभाग विकसित करणे आवश्यक आहे. आज मोठ्या प्रमाणात माहितीची (डिजिटल डेटा) निर्मिती होत आहे. नगर रचना विभागातही कृत्रिम बुद्धिमत्ता प्रभावीपणे वापरावी. परंतु तो करण्याआधी सुयोग्य आणि विश्वासार्ह माहितीचे संकलन होणे आवश्यक आहे," असे मत ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ. दीपक शिकारपूर यांनी केले.

नगर रचना आणि मूल्यांकन विभागाच्या अधिकाऱ्यांसाठी 'शहर नियोजनात कृत्रिम बुद्धिमत्तेचे स्थान' या विषयावर मार्गदर्शन सत्र झाले. यात राज्यभरातील सुमारे ६५० अधिकाऱ्यांचा सहभाग होता. यावेळी नगर रचना विभागाचे संचालक अविनाश पाटील, अतिरिक्त जिल्हाधिकारी सुहास मापारी उपस्थित होते. शासकीय कामकाजात सुसूत्रता आणता यावी, नागरिकांना सुलभतेने उत्तम सुविधा पुरविण्यासाठी तसेच प्रशासकीय कामकाजात कृत्रिम बुद्धिमत्ता, मशिन लर्निंग आणि माहिती विश्लेषणाचा कशा पद्धतीने वापर होऊ शकतो, यासाठी या सत्राचे आयोजन केले होते. नगर रचना विभागाचे उपसंचालक किशोर गोखले यांनी आभार मानले.



## व्यसन-आसक्ती ते मुक्ती' विषयावर परिसंवाद

**पुणे :** 'रोटरी क्लब ऑफ पुणे गांधी भवन' च्या वतीने 'व्यसन-आसक्ती ते मुक्ती' विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे.हा परिसंवाद गुरुवार,दि.१० एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता गांधी भवन (कोथरूड) च्या तिसऱ्या मजल्यावरील सभागृहात होणार आहे.या परिसंवादात मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्राच्या संचालिका मुक्ता पुणतांबेकर ,प्रफुल्ला मोहिते,विजय बोटे-पाटील हे कार्यकर्ते सहभागी होतील.त्यांच्याशी संगीता जोशी संवाद साधतील.याच कार्यक्रमात मुक्ता पुणतांबेकर यांना गौरी शिकारपूर यांच्या हस्ते 'सर्व्हिस एक्सलन्स रोटरी अवॉर्ड' देण्यात येणार आहे.'रोटरी क्लब ऑफ पुणे गांधी भवन'च्या अध्यक्षा डॉ.मीनल धोत्रे,सचिव शशांक टिळक,डॉ.उज्ज्वला बर्वे,डॉ.ऋचा मोकाशी,संगीता जोशी यांनी पत्रकाद्वारे ही माहिती दिली.हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य आहे.



## व्यसनमुक्ती केंद्राचे पैसे न दिल्याने मारहाण

**पुणे :** व्यसनमुक्ती केंद्रात भावाला दाखल केल्यानंतर मित्रांकडून फीसाठी घेण्यात आलेले पैसे परत न केल्याने तरुणाला बेदम मारहाण करण्यात आल्याची घटना सिंहगड रस्त्यावरील धायरी परिसरात घडली. याप्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

याप्रकरणी सिद्धार्थ पवार (रा. गारमाळ, रायकरनगर, धायरी), कार्तिक उर्फ पप्पू बाळकृष्ण लोणारे (रा. लोणारे वस्ती, धायरी), बबलू कसाळे (रा. धायरी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सूरज अरुण गायकवाड (वय ३०, रा. लोणारे वस्ती, धायरी) याने नांदेड सिटी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. सूरज गायकवाड याचा भाऊ आकाश याला दारू पिण्याचे व्यसन आहे. त्याला सिद्धार्थ पवार याचे सिंहगड रस्त्यावरील खानापूर परिसरात व्यसनमुक्ती केंद्र आहे. व्यसनमुक्ती केंद्रात आकाश याला १५ मार्च रोजी दाखल करण्यात आले होते. दहा दिवसांसाठी चार हजार रुपये आणि ने-आण करण्यासाठी एक हजार रुपये असे पाच हजार रुपये सिद्धार्थ पवार याला द्यायचे ठरले होते.

३१ मार्च रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास सूरज गायकवाड धायरीतील उंबऱ्या गणपती चौकातून निघाला होता. त्या वेळी तेथील एका दुकानासमोर सिद्धार्थ पवार, कार्तिक लोणारे, बबलू कसाळे थांबले होते.त्या वेळी त्यांनी सूरज याच्याकडे व्यसनमुक्ती केंद्राची फी मागितली. तेव्हा त्याने माझ्याकडे पैसे नसल्याचे त्यांना सांगितले. त्या वेळी तिघांनी त्याला रस्त्यात मारहाण करण्यास सुरुवात केली.

## गौरव 'नेमबाज'चा...!



पुणे साईनाथ मंडळ ट्रस्टतर्फे भारतीय महिला हॉकी संघाच्या माजी कर्णधार रेखा भिडे यांच्या हस्ते अंजली भागवत यांचा साई पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

## यशप्राप्तीसाठी मेहनत; जिद्द महत्त्वाची: भागवत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** 'माझ्यातील खिलाडू वृत्तीला मुंबईतील गणेश मंडळात चालना मिळाल्याने खेळाडू म्हणून जडणघडण झाली. पदक मंचापर्यंत पोहोचणारा एकच खेळाडू असतो. त्याच्या यशप्राप्तीसाठी मेहनत, जिद्द या बरोबरीनेच सुहृदांच्या शुभेच्छा आणि आशीर्वाद महत्त्वाचे असतात,' अशी भावना जागतिक कीर्तीच्या नेमबाज अंजली भागवत यांनी व्यक्त केली

'समाज एकत्र राहण्यासाठी आणि हिंदुत्व टिकविण्यासाठी केवळ सामाजिक कामच नाही तर, वैचारिक देवाणघेवाणीचे कार्य करणाऱ्या गणेश मंडळांमार्फत घडावे', अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. साईनाथ मंडळ ट्रस्टतर्फे भारतीय महिला हॉकी संघाच्या माजी कर्णधार रेखा भिडे यांच्या हस्ते अंजली भागवत यांचा साई पुरस्काराने सन्मान करण्यात आला. त्याप्रसंगी भागवत बोलत होत्या. राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, आमदार हेमंत रासने, श्रीमंत दगडूशेठ हलवाई मंडळ ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने आणि साईनाथ मंडळ ट्रस्टचे अध्यक्ष पीयूष शहा या वेळी उपस्थित होते.

# विमानांची 'घे भरारी'...!

### देशांतर्गत शहरांसाठी नवीन उड्डाणे सुरू; यंदा प्रवास करणाऱ्यांची संख्या १०.६६ टक्क्यांनी वाढ

गेल्या दीड वर्षांच्या कालखंडात विमान प्रवाशांना विशेषत: पुणेकरांना केंद्रिय नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या रूपाने एक हसतमुख आणि अभ्यासू असा चेहरा मिळाला आहे; विशेष म्हणजे सहजगत्या काम करून घेण्याची त्यांची ख्याती अगदी दिल्लीच्या तख्तापर्यंत जाऊन पोचली आहे. याच बळावर त्यांनी दीड वर्षांमध्ये पुण्याच्या विमानतळाला भरभरून असा निधी दिला आहे. त्यांचे हे प्रेम विरोधकही खासगीतच नव्हे तर जाहीररित्याही मान्य करत आहेत, मोहोळ यांच्या या अथक परिश्रमामुळेच देशांतर्गत विमानांना चालना मिळाली असून प्रवास करणाऱ्यांची संख्या १०.६६ टक्क्यांनी वाढली आहे; त्यातूनच या विमानांनी 'घे भरारी'चा नारा पुकारत महसूलातही हवेत कोटीच्या कोटी उड्डाणे घेतली आहे. त्यात मोहोळ यांचे निश्‍चितच मोलाचे योगदान आहे.

> पुण्याहून देशातंर्गत विमानांची संख्या खूपच कमी होती, त्यामुळे अनेकांना इच्छा असूनही विमानाने प्रवास करणे शक्य नव्हते. त्यामुळे ही उड्डाणे वाढविण्याच्या सूचना करण्यात आल्या होत्या, त्यामध्ये अपेक्षेपेक्षाही सर्वाधिक यश आले असून त्यामध्ये सातत्य ठेवण्याचा आमचा प्रयत्न असणार आहे.
>
> **-मुरलीधर मोहोळ,** केंद्रिय नागरी उड्डाण व सहकार राज्यमंत्री





■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे विमानतळावरून प्रवासी वाढविण्यासाठी विमानतळ प्रशासनाकडून प्रयत्न सुरू आहेत. गेल्या आर्थिक वर्षात नवीन देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय मार्ग सुरू केले. त्यामध्ये पुणे-दुबई आणि पुणे-बँकॉक थेट आंतरराष्ट्रीय सेवा प्रवाशांसाठी उपलब्ध करण्यात आल्या आहेत. तसेच, भोपाळ, त्रिवेंद्रम, चेन्नई, इंदौर, अहमदाबाद आणि देहरादून यांसारख्या देशांतर्गत शहरांसाठी नवीन उड्डाणे सुरू झाली.

लोहगाव येथील नवीन विमान टर्मिनल खुले झाले आणि प्रवाशी संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. मागील आर्थिक वर्षात पुणे विमानतळ येथून एक कोटी पाच लाख प्रवाशांनी प्रवास केला आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा प्रवास करणाऱ्यांची संख्या १०.६६ टक्क्यांनी वाढली आहे.त्यामध्ये डिसेंबर २०२४ हा महिना सर्वाधिक प्रवासी वाहतुकीचा ठरला असून, ज्यामध्ये ९ लाख ५४ हजार प्रवाशांनी पुणे विमानतळाचा वापर केला. त्यामध्ये ९ लाख २० हजार देशांतर्गत आणि ३३ हजार ३३७ आंतरराष्ट्रीय प्रवाशांचा समावेश होता.

पुणे विमानतळाचे नवीन टर्मिनल विकसित करून विमान उड्डाणे सुरू झाली. तर जुन्या टर्मिनलचा विकास सुरू करण्यात आला आहे. सध्या विमानतळावरून दररोज जवळपास दोनशे विमानांच्या फेऱ्या होतात. नवीन टर्मिनल सुरू झाल्यानंतर काही नवीन शहर जोडण्यात आली आहेत.त्यामुळे प्रवासी संख्या वाढत आहे. गेल्या आर्थिक वर्षात यामुळेच प्रवासी संख्येत वाढ झालेली दिसून येत आहे. २०२३-२४ च्या तुलनेत अकरा टक्क्यांजवळ प्रवासी संख्या वाढली आहे. त्यामध्ये सर्वाधिक प्रवासी हे देशांर्तंग प्रवास करणारे आहेत.

# 'घिरट्या' बंद

### पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात ड्रोनला बंदी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे पोलिसांनी एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. दहशतवादी/राष्ट्रविरोधी घटक ड्रोन, रिमोट कंट्रोल, मायको-लाईट, एअरक्राप्ट, पॅराग्लायडरचा वापर करुन त्यांचे हल्यामध्ये आणि त्याव्दारे व्हीव्हीआयपींना लक्ष्य करु शकतात. मोठया प्रमाणावर सार्वजनिक जीवन धोक्यात आणू शकतात, सार्वजनिक मालमत्तेची नासधूस करु शकतात, आणि पुणे शहर पोलीस आयुक्तालय क्षेत्रात कायदा व सुव्यवस्था बिघडवू शकतात.

अशा ड्रोन, रिमोट कंट्रोल, मायको-लाईट, एअरक्राफ्ट, पॅराग्लायडरव्दारे संभाव्य घातपात रोखण्यासाठी पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात अशा घटकांच्या कारवाया, त्यासाठी काही प्रतिबंधात्मक सक्रीय उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्यामुळे पुण्याचे सहपोलीस आयुक्त रंजन कुमार शर्मा यांनी ड्रोन, रिमोट कंट्रोल्ड मायक्रो - लाइट एअरक्राफ्ट, पॅराग्लायडर्ड्स, पॅरा मोटर्स, हॅण्ड ग्लायडर्स हॉट एअर बलून इत्यादीच्या उड्डाण क्रियांना पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात प्रतिबंध करण्याचे आदेश दिले आहेत. हे आदेश पुढील ३० दिवसांसाठी म्हणजे आजपासून ६ एप्रिल ते ५ मेपर्यंत देण्यात आले आहेत. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीवर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे, असं देखील सांगण्यात आलं आहे.

## चित्र प्रदर्शनाचे ११ ते १३ एप्रिल दरम्यान आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मालविका गौर आणि जेहन कोठारी यांच्या संकल्पनेमधून विवा आर्टच्या वतीने येत्या शुक्रवार दि. ११ एप्रिल ते रविवार दि. १३ एप्रिल दरम्यान एरंडवणे भागातील द बॉक्स या ठिकाणी न्यू वेव्ह आर्ट इनिशिएटिव्ह (एनडब्लूएआय) या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. ११ एप्रिल रोजी सायंकाळी ५ ते ८ या वेळेत केवळ निमंत्रितांसाठी प्रदर्शन खुले असून १२ व १३ एप्रिल रोजी सकाळी १० ते सायं ६ दरम्यान प्रदर्शन सर्वांसाठी विनामूल्य खुले असेल.

वेगवेगळी पार्श्वभूमी असणाऱ्या कलाकारांना एकत्र आणत त्यांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने पुण्यातील विवा आर्टच्या वतीने 'न्यू वेव्ह आर्ट इनिशिएटिव्ह' या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. सैन्य दलातील अधिकारी, कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबीय यांनी चितारलेली चित्रे हे या प्रदर्शनाचे एक वैशिष्ट्य असून या सर्व कलाकारांना एक व्यासपीठ उपलब्ध करून द्यावे या यामागील उद्देश आहे.

या उपक्रमाविषयी अधिक माहिती देताना प्रदर्शनाच्या आयोजक असलेले जेहन कोठारी म्हणाले, "न्यू वेव्ह आर्ट इनिशिएटिव्ह (एनडब्लूएआय) हे वेगवेगळ्या पार्श्वभूमी असलेल्या आश्वासक कलाकारांना एकत्र आणत त्यांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देते.



पुणे मालविका गौर आणि जेहन कोठारी यांच्या संकल्पनेमधून विवा आर्टच्या वतीने येत्या शुक्रवार दि. ११ एप्रिल ते रविवार दि. १३ एप्रिल दरम्यान एरंडवणे भागातील द बॉक्स या ठिकाणी न्यू वेव्ह आर्ट इनिशिएटिव्ह (एनडब्लूएआय) या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

# विनोद ही संकल्पना प्रत्येकाच्या मनात : भाऊ तोरसेकर




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मेनका प्रकाशनच्या खमंग टमंग च्या पुस्तक प्रकाशन सोहळ्यात तोरसेकर,टोकेकर यांची फटकेबाजी

पुणे:"विनोद ही संकल्पना प्रत्येकाच्या मनात असते आणि विनोद लेखनही प्रत्येकाला सुचत असते तथापि पूर्वतयारी करूनही विनोदी लेखन करता येत नाही",असे मत ज्येष्ठ पत्रकार भाऊ तोरसेकर यांनी व्यक्त केले.मेनका प्रकाशन ने प्रकाशित केलेल्या आणि ज्येष्ठ पत्रकार भगवान दातार लिखित 'खमंग टमंग' या खुमासदार पुस्तकाचा प्रकाशन समारंभ पार पडला.'खमंग टमंग' चे प्रकाशन तोरसेकर यांचे हस्ते झाले त्यावेळी ते बोलत होते

ज्येष्ठ पत्रकार प्रवीण टोकेकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मेनका प्रकाशन चे व्यवस्थापकीय संचालक अभय कुलकर्णी व्यासपीठावर उपस्थित होते.

खमंग टमंग पुस्तकाचे लेखक भगवान दातार यांनी पुस्तक लिहिण्यामागची भूमिका स्पष्ट केली.ते म्हणाले की,सध्याच्या काळात राजकीय दांभिकतेवर भाष्य करण्यासाठी उपहास आणि विडंबन याचा शस्त्र म्हणून वापर करण्यात येतो या प्रकारच्या लेखनशैलीमध्ये वापर करीत तत्कालीन राजकीय नेते प्रसंग आणि घटना यावर भाष्य करणारे लेखन केले हे सांगतांना त्यांनी शरद पवार,उद्धव ठाकरे,बाळासाहेब थोरात यांच्यामुळे लेखनाची प्रेरणा मिळाली,असेही त्यांनी नमूद केले.हे सांगताना त्यांनी अभय कुलकर्णी यांनी भगवान दातार यांनी त्यांचे लिखाण प्रसिद्ध करण्याची संधी दिल्याबद्दल आभार मानले.

कार्यक्रमाच्या सुरवातीला केतकी दातार हिने सरस्वती स्तवन सादर केले.भगवान दातार यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले.नाट्यकर्मी सुधीर मोघे यांनी सूत्रसंचालन केले.



> विनोद हा मैत्री करू शकतो पण विनोद शस्त्र वगैरे नसते.विनोदी लेखन ही एक कसरत असते.त्याला एक मर्यादा आहे आपण ती पाळली पाहिजे. विनोद हा दोस्तांच्या कोंडाळ्यात रमणारा असतो.विनोद हा मैत्री करू शकतो पण विनोद शस्त्र वगैरे नसते.
>
> **— भाऊ तोरसेकर,** ज्येष्ठ पत्रकार



## बक्षिस वितरण समारंभ संपन्न

**पुणे :** वारजे मधील यशोदीप हायस्कूल येथे विद्यार्थ्यांसाठी चैतन्य भाषा प्रसार मंडळातर्फे घेण्यात आलेल्या कथाकथन,हस्ताक्षर,निबंध स्पर्धामध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांसाठी बक्षीस समारंभ आयोजित करण्यात आला होता.चैतन्य भाषा प्रसार मंडळ संस्थेच्या संचालिका अनिता जोशी, ॲड.रेवती रायरीकर,ज्योतिष पंडित,मुग्धा पत्की ह्यांचे हस्ते मुलांना बक्षिसे,वह्या, पेन देण्यात आली स्कूलच्या मुख्याध्यापिका नीता गुंजीकर व त्यांच्या सहकारी शिक्षक शिक्षिकांनी हा कार्यक्रम अतिशय सुरेख आखला होता,कार्यक्रमाचे वेळी विद्यार्थ्यांमध्ये जोश,आनंद दिसून आला. श्रेया पेडणेकर या विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक करून अनिता जोशी व रेवती रायरीकर यांनी मराठी भाषेचा अधिकाधिक उपयोग करून ती भाषा जिवंत ठेवली पाहिजे असे आवाहन केले.




## मोकाट कोकाटेला मंत्रीपदावरून हाकला

**पुणे :** कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांच्या विषयात केलेल्या चुकीच्या वक्तव्यावर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पुणे शहर पक्षाच्या वतीने तीव्र निषेध आंदोलन लालमहल चौक येथे करण्यात आले. महाराष्ट्र हा शेतीप्रधान आहे आणि नेहमी सत्ताधारी हे शेतकऱ्यांची चेष्टा लावल्यासारखे वक्तव्य करीत असतात शेतकरी सक्षमीकरणासाठी हे सरकार काम करीत नाही हे त्यांच्या प्रत्येक कृतीतून दिसून येते हे सरकार सामान्य माणसाचे नसून हे व्यापाऱ्यांचे आहे असा रोष शिवसैनिकांनी व्यक्त करून निषेध नोंदवला.

यावेळी आंदोलनास शहरप्रमुख संजय मोरे, गजानन थरकुडे, उपशहर प्रमुख आबा निकम, शहर संघटक राजेंद्र शिंदे, उमेश वाघ, किशोर राजपूत, प्रसिद्धी प्रमुख अनंत घरत, युवासेनेचे शहर संघटक राम थरकुडे, जिल्हा अधिकारी युवती सेना निकिता मारटकर, विभाग प्रमुख सूरज लोखंडे, मुकुंद चव्हाण, अजय परदेशी, संतोष भुतकर, रूपेश पवार, अमर मारटकर, जितू निजामपूरकर, अतुल दिघे, शिव आरोग्य सेना रमेश क्षिरसागर, दिलीप पोमण, आशिष अढळ, तुषार भोकरे, गणेश घोलप, नागेश खडके, दत्तात्रय करपे, बकुळ ढाखवे, तानाजी पवळे, अनिल परदेशी, इम्रान खान, राहुल शेडगे, नितीन दलभंजन, वाहतूक सेनेचे सूरज खंडागळे, राजेश माने, सचिन घोलप, बाळासाहेब गरुड, मिलिंद पत्की, महिला आघाडीच्या रोहिणी कोल्हाळ, अमृत पठारे, वैशाली दारवटकर, सोनाली जुनवणे, नाज इनामदार, सविता गोसावी, युवासेने चे युवराज पारिख, परेश खांडके, सोहम जाधव, वैभव कदम, चिंतामणी मुंगी, तेजस मर्चंट, अक्षय हबीब, इंद्रजीत शिंदे, आणि शिवसैनिक उपस्थित होते.

## राम नगरकर कलागौरव पुरस्कार अभिनेते संदीप पाठक यांना जाहीर

**पुणे :** ख्यातनाम विनोदी अभिनेते राम नगरकर यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ राम नगरकर कला अकादमी आणि



बेलवलकर सांस्कृतिक मंच यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी देण्यात येणारा राम नगरकर कलागौरव पुरस्कार यावर्षी प्रसिद्ध अभिनेते संदीप पाठक यांना जाहीर झाला असल्याची घोषणा राम नगरकर यांच्या स्नुषा डॉ वैजयंती वंदन नगरकर आणि बेलवलकर सांस्कृतिक मंचचे समीर बेलवलकर यांनी केली.

राम नगरकर कलागौरव पुरस्काराचे हे पाचवे वर्ष असून ज्येष्ठ नाटककार सतीश आळेकर यांच्या हस्ते सोमवार दि. १४ एप्रिल रोजी नवी पेठेतील एस एम जोशी सभागृह या ठिकाणी सायं ५.३० वाजता संपन्न होणाऱ्या कार्यक्रमात तो प्रदान करण्यात येईल. रुपये अकरा हजार, मानपत्र आणि मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. सदर कार्यक्रम हा सर्वांसाठी विनामूल्य खुला असून त्यासाठी प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर प्रवेश देण्यात येईल.

# जिल्हाधिकाऱ्यांचा रौद्रावतार; अधिकारी 'गर्भगळीत'..!

## कात्रज रस्त्याच्या भूसंपादनावर मनपा प्रशासन धारेवर; भूसंपादनासाठी सात दिवसांची डेडलाईन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शांत आणि संयमी अशी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांची पुणेकरांमध्ये ओळख निर्माण झाली आहे; कोणताही प्रकल्प शांततेच्या मार्गाने लिलया मार्गी लावणे अशी त्यांची ख्याती आहे. मात्र; कात्रज चौकातील रूंदीकरणाचे काम भूसंपादनाच्या अभावी रखडल्याने शांत जिल्हाधिकारी आज बैठकीत चांगलेच संतप्त झाले.

त्यासाठी त्यांनी अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरत विशेष कायद्यान्वये भूसंपादन प्रक्रिया पार पाडावी, यासाठी मोजणी विभागाने संयुक्त प्रकल्पाची सात दिवसात मोजणी पूर्ण करून पालिकेला द्यावी असे आदेश दिले. त्यांच्या या रौद्रावतारामुळे महापालिकेचे अधिकारी चांगलेच 'गर्भगळीत' झाले. विशेष म्हणजे त्यांच्या दालनातील 'एसी' फुल्ल असतानाही या अधिकाऱ्यांना चांगलाच घाम फुटला.

शहरातील पथदर्शी प्रकल्प म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कात्रज-कोंढवा रस्त्याचे रुंदीकरण भूसंपदानाअभावी रखडले आहे. भूसंपादन प्रक्रियेत झालेल्या विलंबावर पालिका




अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरत विशेष कायद्यान्वये भूसंपादन प्रक्रिया पार पाडावी, यासाठी मोजणी विभागाने संयुक्त प्रकल्पाची सात दिवसात मोजणी पूर्ण करून पालिकेला द्यावी असे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी आदेशीत केले.

भूसंपादन कायद्यान्वये राजस सोसायटी ते खडीमशीन चौकाच्या पुढे अशा साडेतीन किमी लांबीच्या व ८४ मीटर रुंदीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर झाले आहेत. या प्रकल्पासाठी एकदाच संयुक्त मोजणी करून संपूर्ण प्रकल्पासाठी ग्राह्य धरण्यासाठी विधान परिषदेचे आमदार योगेश टिळेकर यांच्या पुढाकाराने विशेष बैठक जिल्हाधिकारी यांच्या दालनात लावण्यात आली.

यावेळी भूसंपादन उपजिल्हाधिकारी कल्याण पांढरे, अतिरिक्त आयुक्त महेश पाटील, उपायुक्त प्रतिभा पाटील, विशेष भूसंपादन अधिकारी श्वेता दारूनकर, भूसंपादन उपअभियंता दिगंबर बांगर, मोजणी उपअधीक्षक अमरसिंह पाटील, पथ उपअभियंता धनंजय गायकवाड आदींसह विविध खात्यांचे अधिकारी उपस्थित होते.

कात्रज कोंढवा रस्ता रुंदीकरण प्रकल्पाचे महत्व लक्षात घेता गतीने भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी दर पंधरा दिवसांनी आढावा बैठक घेण्यात येईल असे डुडी यांनी आदेश दिले. त्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या भूसंपादन प्रक्रियेला वेग येईल अशी आशा निर्माण झाली आहे.

दक्षिण पुण्याच्या वाहतूक नियोजनाच्या दृष्टीने कात्रज-कोंढवा रस्ता हा महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. भूसंपादनातील अडथळे दूर करण्यासाठी स्थानिक पातळीवर अडचणी येत आहेत.

भूसंपादन दिरंगाईस काही अंशी पालिका जबाबदार असून यातून मार्ग काढण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी पुढाकार घ्यावा अशी मागणी करून बैठक लावली. भूसंपादन प्रक्रियेला वेग देऊन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे विधान परिषद आमदार योगेश टिळेकर यांनी बैठकीवेळी सांगितले.



> सर्व सुविधा आणि अधिकारी, कर्मचारी उपलब्ध असतानाही या मोजणीसह भूसंपादनाला लागत असलेला वेळ हा निश्चितच चिंताजनक आहे. प्रशासनाच्या एका अक्षम्य अशा चुकीमुळे नागरिकांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे; ही बाब कदापीही खपवून घेतली जाणार नाही.
>
> **-जितेंद्र डुडी,** जिल्हाधिकारी, पुणे

- **मोजणी विभागाने मनपाला तात्काळ चलन द्यावे**
- **दर पंधरा दिवसाला जिल्हा आणि मनपा प्रशासनाची बैठक झालीच पाहिजे**
- **भूसंपादनातील अडथळे गतीने दूर करा**
- **सात दिवसात मोजणीची प्रक्रिया पूर्ण करा**
- **५० मीटर व ८४ मीटर भूसंपादन बाबत मोजणी पूर्ण करा**

# 'लाईफलाईन' टाकणार 'कात'..!

## 'पीएमपी' करणार प्रवाशांच्या सूचनांची अंमलबजावणी

तब्बल तेरा लाख सर्वसामान्य प्रवाशांची 'लाईफलाईन' असलेल्या 'पीएमपी' प्रशासनाचा आर्थिक कारभार चांगलाच डबघाईला आला आहे. दररोज सुमारे पावणेदोन ते दोन कोटी रुपयांचा महसूल मिळवित असतानाही खर्च आणि उत्पन्न यांचा ताळमेळ बसविताना प्रशासनाला तारेवरची कसरत करावी लागत आहे. त्यातच पंधरा वर्षाहुनही अधिक आयुर्मान संपलेल्या बसेस मार्गावर धावत असून त्या मार्गावर बंद पडत आहेत, त्यातूनच प्रवासी आणि प्रशासन यांच्यातील दरी दिवसेंदिवस अधिकच वाढत असून अनेकांनी वाहतूकीसाठी अन्य पर्यायांची निवड केली आहे. त्यामुळे आता उरलेला संसार सावरण्यासाठी नव्या दमाच्या अध्यक्षा दीपा मुधोळ मुंडे यांनी प्रवाशांना आश्वासित करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे प्रवाशांना काहीशी अंधुक आशा निर्माण झाली आहे.



> पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून ५०० आणि पुणे महानगरपालिकेकडून ५०० अशा एक हजार बस, तर केंद्र सरकारकडून एक हजार अशा दोन हजार बस ताफ्यात दाखल करून घेण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत..
>
> **-दीपा मुधोळ मुंडे,** अध्यक्षा व व्यवस्थापकीय संचालिका, पीएमपी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** 'पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपीएमएल) सुविधांमध्ये अनेक त्रुटी असल्या, तरी सुधारणांच्या अनुषंगाने नक्कीच प्रयत्न केले जातील. त्यासाठी नागरिकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असून, वेळोवेळी सूचना केल्यास नक्कीच 'पीएमपी' सुलभ आणि गतिशील होईल,' अशी ग्वाही 'पीएमपीएमएल'च्या व्यवस्थापकीय संचालक दीपा मुधोळ मुंडे यांनी दिली. दरम्यान, कार्यक्रमात उपस्थितांनी मोठ्या प्रमाणात तक्रारी मांडल्यानंतर मुंडे यांनी 'पीएमपी' सेवेत नक्कीच सुधारणा करण्यात येतील, अशी स्पष्टोक्ती दिली.

'सजग नागरिक मंच' आणि 'पीएमपी प्रवासी मंच' यांच्या सहभागाने रविवारी आयोजित 'पीएमपी प्रवासी मेळावा' कार्यक्रमात मुंडे बोलत होत्या. 'पीएमपी प्रवासी मंचा'चे जुगल राठी, संजय शितोळे, सजग नागरिक मंचाचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी 'पीएमपी' प्रशासनाच्या सेवांबद्दल टिप्पणी केली.

मुंडे म्हणाल्या, 'आयुर्मान संपलेल्या ३०० पेक्षा अधिक बस जून महिना अखेरपर्यंत मोडीत काढून नव्याने ६०० बस ताफ्यात घेण्यात येणार आहे. अपघात रोखण्यासाठी 'अपघात विरहीत पीएमपीएमएल सेवा' अभियान राबविले आहे. ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणात नवीन मार्गिका सुरू करण्यासाठी मागणी होत आहे, त्यानुसार या मार्गांवर बस सुरू करण्यात आल्या आहेत.'

'पुण्यातील सार्वजनिक वाहतूक सुविधा सक्षम करून वाहतूक कोंडी सोडविण्याच्या दृष्टीने 'सर्वंकष वाहतूक आराखडा' तयार करण्यात आला आहे. त्यातही 'पीएमपी'ला चार हजारांपेक्षा अधिक बसची आवश्यकता असल्याचे सांगण्यात आले आहे. असे मुंडे यांनी स्पष्ट केले.

"पीएमपी'कडे राजकारण्यांची अनास्था दिसून येते. पालकमंत्री अजित पवार यांनी नगर रस्त्यावरील 'बीआरटी' मार्गिका काढून टाकण्याचे आदेश नुकतेच दिले आहेत. मात्र, याबाबत नागरिकांचा अभिप्राय, हरकती, सूचना विचारात न घेता परस्पर निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे राजकारण्यांना प्रश्न विचारण्याची गरज निर्माण झाली असल्याचे मत पीएमपी प्रवासी मंचचे संजय शितोळे यांनी व्यक्त केले.

### उपस्थितांमधून प्रश्नांचा भडिमार

- उपस्थितांमधून 'पीएमपी'च्या नवीन बस सेवेपासून अचानक रस्त्यात बंद पडणाऱ्या बस, मार्गांवर असलेल्या आणि थांब्यांवर न थांबणाऱ्या बस, वापरात असलेल्या थांब्यांवर प्रवाशांसाठी अपुरी आसनक्षमता आणि प्रकाशव्यवस्था, एकाच मार्गावर पाठोपाठ चालणाऱ्या बस, त्यामुळे इतर मार्गिकांवर बसची कमतरता, 'पीएमपी'स्थानकावर किंवा बसमध्ये होणाऱ्या चोऱ्यांचे प्रमाण आदी प्रश्न विचारले.

### अशा आहेत प्रवाशांच्या समस्या

- अचानक रस्त्यात बंद पडणाऱ्या बस
- मार्गांवर असलेल्या आणि थांब्यांवर न थांबणाऱ्या बस
- वापरात असलेल्या थांब्यांवर प्रवाशांसाठी अपुरी आसनक्षमता आणि प्रकाशव्यवस्था
- एकाच मार्गावर पाठोपाठ चालणाऱ्या बस, त्यामुळे इतर मार्गिकांवर बसची कमतरता
- 'पीएमपी'स्थानकावर किंवा बसमध्ये होणाऱ्या चोऱ्यांचे प्रमाण

# सुप्रिया सुळेंनी पालिकेच्या अधिकाऱ्यांना सुनावले



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** दहा लाख रुपयांच्या अनामत रकमेसाठी दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने तनिषा भिसे या गर्भवती महिलेला उपचार नाकारल्याने आणि वेळेत उपचार न मिळाल्याने गर्भवतीचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडल्यानंतर दीनानाथ मंगेशकर रुग्णालय आता नवीन वादात सापडले आहे. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने २०१९ पासून पुणे महापालिकेचा तब्बल २७ कोटी ३८ लाख ६२ हजार ८७४ रुपयांचा मिळकत कर थकवला असल्याची धक्कादायक बाब समोर आल्यानंतर रुग्णालयाविरोधात प्रचंड प्रमाणात रोष वाढला आहे. मिळकत कर थकवणाऱ्या दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर तत्काळ दंडात्मक कारवाई करावी यासाठी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या वतीने पुणे महानगरपालिका कर आकारणी व संकलन विभागाच्या उप आयुक्त यांना निवेदन देण्यात आले. बारामती लोकसभेच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या उपस्थितीत हे निवेदन देण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस रोहन सुरवसे पाटील, विद्यार्थी काँग्रेस पुणे सरचिटणीस कृष्णा साठे, दीपक चौगुले, ज्ञानेश्वर जाधव, कुलदीप नाईकनवरे, देवेंद्र खाटीर, बाबा मिसाळ, सुनील कुसाळकर, ऋषिकेश आंधळे हे उपस्थित होते.

> पैश्यासाठी माणुसकीला काळीमा फासणाऱ्या, एका गर्भवती महिलेचा जीव घेऊन नवजात दोन जुळ्या मुलांना आईच्या मायेला पोरकं करणाऱ्या दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने २०१९ साला पासून २७ कोटी ३८ लाख ६२ हजार ८७४ रुपये इतका मिळकत कर भरला नाही. गेल्या ६ वर्षांपासून जर रुग्णालय कर भरत नसेल तर आजपर्यंत महापालिकेने या रुग्णालयावर कारवाई का केली नाही?
>
> **— रोहन सुरवसे पाटील,** प्रदेश सरचिटणिस, युवक काँग्रेस

# दिव्यांगांचे प्रश्न सोडविणारच : देवेंद्र फडणवीस

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यातील दिव्यांग बांधव हा समाजाचा एक महत्त्वाचा दुवा आहे, त्यांचे योगदान आणि मेहनतीमुळे समाजाला एक नवी दिशा मिळत असून त्यांचे प्रश्न प्राधान्याने सोडविण्यासाठी राज्य शासनाचे सातत्याने प्राधान्य राहील अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. दिव्यागांसाठी माजी आमदार बच्चु कडू करत असलेले कार्य निश्चितच कौतुकास्पद आहे असे गौरवोदगारही त्यांनी काढले.

माजी आमदार बचू कडू यांनी दिव्यागांच्या प्रश्नासाठी रायगडावर काही दिवसांपूर्वी केलेल्या अन्नत्याग आंदोलनानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दालनात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी त्यांनी हे आश्वासन दिले. उपमुख्यमंत्री अजित पवार, माजी आमदार बच्चू कडू यांच्यासह प्रहार दिव्यांग क्रांती आंदोलनाचे प्रदेशाध्यक्ष धर्मेंद्र सातव पाटील, राज्य संपर्कप्रमुख रामदास खोत, राज्यसचिव सुरेश मोकल, राज्य उपाध्यक्ष शिवाजी गाडे, राज्य कोषाध्यक्ष देवदत्त माने, महिला राज्य समन्वयक लक्ष्मी देशमुख, सुरेखा ढवळे, अनिता कदम, मूकबधिर संघटनेचे प्रकाश शिंदे, काजल नाईक यांची उपस्थिती होती. धर्मेंद्र सातव यांनी दिव्यागांचे मुद्देसूद अभ्यासपूर्ण प्रश्न मांडल्याबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी धर्मेंद्र सातव पाटील यांचे बैठकीत कौतुक केले.



पुणे | माजी आमदार बचू कडू यांनी दिव्यागांच्या प्रश्नासाठी रायगडावर काही दिवसांपूर्वी केलेल्या अन्नत्याग आंदोलनानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दालनात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते,

# देशाच्या एकसंधतेसाठी वज्रमूठ कायम ठेवा : ॲड जगदाळे

## 'राष्ट्र संचार'च्या सारिका रोजेकर 'राज्यस्तरीय आदर्श पत्रकारिता'ने सन्मानित



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जातीय आणि धार्मिक विद्वेष पसरविणाऱ्या प्रवृत्तीच्या विरोधात गुणिजनांनी कंबर कसून उभे राहिले पाहिजे. एकात्म एकसंध समाजच देशाला विकासाच्या वाटेवर घेऊन जाऊ शकतो त्यामुळे आपली सामाजिक एकजूट कायम ठेवा, असे आवाहन मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. कृष्णाजी जगदाळे यांनी केले.

पुणे शहरात आयोजित राज्यस्तरीय नारीशक्ती सन्मान आणि गुणिजन गौरव महासंमेलनात ७५ गुणवंतांचा राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नुकतेच शुक्रवार, दिनांक ४ एप्रिल २०२५ रोजी मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमी संस्थेच्या प्रेरणेने आयोजित राज्यस्तरीय नारीशक्ती सन्मान आणि गुणिजन गौरव महासंमेलन तसेच पुरस्कार वितरण सोहळा पुणे शहरातील सांस्कृतिक सभागृहात थाटात संपन्न झाला. या सोहळ्यात दैनिक राष्ट्र संचारच्या वरिष्ठ उप संपादिका सारिका रोजेकर यांना 'राज्यस्तरीय आदर्श पत्रकार' पुरस्काराने गौरविण्यात आले. महाराष्ट्र राज्यस्तरावर विविध क्षेत्रांतून पुरस्कारासाठी निवडलेल्या ७५ मानकऱ्यांना या सोहळ्यात मानाचा फेटा, मानकरी बॅच, महावस्त्र, गौरवपदक, सन्मानचिन्ह आणि मानपत्र या स्वरूपात राज्यस्तरीय पुरस्कार थाटात प्रदान करण्यात आले.

सुप्रसिद्ध इंटरनॅशनल आयकॉन डॉ. जे. सानिपीना, पुणे प्रॅक्टिशनर्स डॉक्टर्स असोसिएशनच्या अध्यक्षा डॉ. शुभदा जोशी, प्राचार्या शिक्षणतज्ज्ञ प्रगती साळवेकर, इंटरनॅशनल ह्यूमन राईट्स संस्थेचे डॉ. अविनाश सकुंडे आदी मान्यवर या पुरस्कार सोहळा संमेलनाला विशेष पाहुणे म्हणून उपस्थित होते.

या सोहळ्याचे अत्यंत बहारदार सूत्रसंचालन दिपाली परब यांनी आपल्या खास शैलीत करून उपस्थित गुणिजनांची मने जिंकून घेतली. आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. जे. सानिपीना यांनी उपस्थित पुरस्कारप्राप्त मानकऱ्यांच्या कार्याचे कौतिक करून भविष्यकालीन यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आपल्या भाषणात त्या म्हणाल्या की, विविध क्षेत्रांतील गुणवंत, कीर्तिवंत, यशवंत व्यक्तिमत्वांचा शोध घेऊन त्यांच्या कार्याचा समारंभपूर्वक गौरव करणे खूप अभिनंदनीय बाब आहे.

यावेळी झालेल्या विविध गीतांच्या सादरीकरणात मानकऱ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. पुरस्कार सोहळ्याच्या समारोपात तमाम गुणिजन मानकऱ्यांनी राष्ट्रवंदना सादर करून समारंभाची सांगता केली.



> "अडीअडचणी आणि संकटांवर यशस्वी मात करण्यासाठी प्रत्येक स्त्रीने आत्मनिर्भर झाले पाहिजे! परिस्थितीवर मात करण्याची क्षमता ईश्वराने स्त्रीला दिलेली आहे! नारीशक्ती सन्मान आणि गुणिजन गौरव पुरस्कारप्राप्त सर्व मानकऱ्यांचे मी अभिनंदन करतो. रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करणाऱ्या या गुणिजन संस्थेच्या समाजोपयोगी उपक्रमांना माझ्या शुभेच्छा आहेत..
>
> **—भानुप्रताप बर्गे,** सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त

## तिवारींच्या वक्तव्याचा 'वंचित' तर्फे निषेध

**हडपसर :** भाजपचे बिहारमधील आमदार सुनीलमनी तिवारी यांनी केलेल्या वादग्रस्त वक्तव्याच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीतर्फे जोडे मारा आंदोलन नुकतेच करण्यात आले. आमदार तिवारी यांच्यावर कारवाई करून त्यांची आमदारकी रद्द करावी, अशा मागणीचे निवेदन बिहारचे राज्यपाल आणि पोलिस उपायुक्त अजय परमार यांना पाठविण्यात आले. या प्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे शहराध्यक्ष ॲड. अरविंद तायडे, विश्वास गदादे, सागर आल्हाट, अजय भालशंकर, चैतन्य इंगळे, ॲड. किरण कदम, हिरा वाघमारे आदी उपस्थित होते.

## बहिणीचा गळा आवळून खून; एकास जन्मठेप



**पुणे :** मुलीच्या लग्नासाठी म्हणून १० ते १२ वर्षांत जमा केलेले पैसे परत मागितल्याने बहिणीचा गळा आवळून खून करणाऱ्याला न्यायालयाने जन्मठेप आणि १० लाख रुपये दंडाची शिक्षा सुनावली. अतिरिक्त सत्र न्यायाधीश पी. पी. जाधव यांनी हा निकाल दिला. रवींद्र श्रीनिवास जालगी (वय ४८, रा. कर्वेनगर) असे शिक्षा झालेल्याचे नाव आहे. कस्तुरी शेखर माने (वय ४५) यांच्या खूनप्रकरणी मुलगा प्रज्ज्वल (वय १९. रा. हिंगणे, मूळ रा. कर्नाटक) याने सिंहगड रस्ता पोलिसात फिर्याद दिली होती. ही घटना १३ एप्रिल २०१९ ला रात्री आठच्या सुमारास घडली होती. फिर्यादीनुसार १४ ते १५ लाख रुपयांची रक्कम आहे. दंडाच्या रकमेपैकी नऊ लाख रुपये महिलेचा फिर्यादी मुलगा आणि मुलीला देण्यात यावेत. दंड न भरल्यास त्याला अतिरिक्त सहा महिने कारावास भोगावा लागेल, असे निकालात नमूद आहे. या खटल्याचे कामकाज सरकारी पक्षातर्फे नामदेव तरळगट्टी यांनी पाहिले. सिंहगड रस्ता पोलिस ठाण्याचे तत्कालीन पोलिस अधिकारी सतीश उमरे यांनी या गुन्ह्याचा तपास केला. सहायक पोलिस फौजदार एस. पी. पुणे यांनी पैरवी अधिकारी म्हणून काम केले. कस्तुरी यांचा आरोपी रवींद्र हा मानलेला भाऊ होता. मुलीच्या लग्नासाठी म्हणून थोडे थोडे पैसे कस्तुरी यांनी त्याच्याकडे ठेवायला दिले होते. मुलीचे लग्न असल्यामुळे त्या पैसे परत मागत होत्या. त्यावरून दोघांत भांडण झाले होते. घटनेच्या दिवशी कस्तुरी आणि जालगी दोघेच घरात होते. त्यावेळी त्याने तिचा आवळून खून केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

## शिवरायांच्या अर्धपुतळयाचा वर्धापनदिन साजरा

**पुणे :** गरवारे महाविद्यालयातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्धपुतळ्याचा प्रतिष्ठापना दिन नुकताच उत्साहात साजरा झाला. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल खैरनार यांच्या हस्ते पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी शिवराय पुतळा स्मारक समितीचे पदाधिकारी प्रवीण तुपे, दिलीप तुपे, बापू पवार, महेश महाले, राजू इनामदार आदी उपस्थित होते. या पुतळ्याची प्रतिष्ठापना तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांच्या हस्ते ५ एप्रिल १९८९ रोजी झाली होती. या वेळी पुतळा प्रतिष्ठापनेच्या आठवणींना उजाळा देण्यात आला.

## काही भागांचा पाणीपुरवठा आज बंद



**पुणे :** पुणे शहरातील काही भागात मंगळवारी म्हणजे उद्या पाणीपुरवठा बंद राहणार आहे. खडकवासला ते वारजे जलकेंद्र आणि होळकर जलकेंद्राला जोडणाऱ्या रॉ वॉटर लाईन सांडपाणी वाहिनीच्या कामामुळे फुटल्याने पाणीपुरवठा बंद राहणार आहे.

ही गळती थांबवण्यासाठी महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून मंगळवारी दुरुस्तीची कामे हाती घेतली असल्याने शहराच्या काही भागाचा पाणीपुरवठा मंगळवारी बंद राहणार आहे.

वारजे, शिवणे औद्योगिक परिसर, कर्वेनगर, शिवाजीनगर, गोखलेनगर, भोसलेनगर, पाषाण, बाणेर, बालेवाडी, कोथरूड आणि खडकीचा काही भाग येथील पाणीपुरवठा कमी दाबाने होणार आहे. दुरुस्ती कालावधीमध्ये टँकरने केला जाणारा पाणी पुरवठा देणे शक्य होणार नसल्याचे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून सांगण्यात आले आहे. त्यामुळे या मंगळवारी नागरिकांनी पाणी जपून वापरावे असे आवाहन पालिकेकडून करण्यात आले आहे.

# दिव्यांगांवर मात करत घातली यशाला 'गवसणी'

## डॉक्टरकीचा गिरविला 'श्रीगणेशा'; मोलमजूरांच्या लेकाची अनोखी कहाणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आई-वडील मोलमजुरी करून घर चालवायचे, आर्थिक परिस्थिती बेताचीच आणि अशातच सहावीत असताना झालेल्या अपघातात पाय गमावला. त्यामुळे लहानपणापासून 'डॉक्टर' होण्याची असलेली इच्छा पूर्ण होइल अथवा नाही याची त्याच्या आई-वडिलांना आणि खुद्द गणेशलाही होती. मात्र जिद्द, जिकाटी आणि मेहनत या त्रिसूत्रीच्या बळावर खचून न जाता शिक्षण घेत अखेर जिद्दीने त्याने डॉक्टर होण्याचे स्वप्न पूर्ण केलेच आणि अवघड वाटत असलेल्या या यशाला 'गवसणी' घालत डॉक्टरकीचा 'श्रीगणेशा' केला.

मूळच्या जालना जिल्ह्यातील चिंचोली (मच्छिंद्रनाथ) येथील गणेश पांढरे या तरुणाची ही कहाणी. आजच्या तरुण पिढीला आदर्श ठरणाऱ्या गणेशने आपल्या अशिक्षित आई-वडिलांनाच नाही तर एकूण प्रत्येकाला अभिमान वाटावा, अशी कामगिरी केली आहे.

मुंबईतील ग्रँट मेडिकल महाविद्यालयातून त्याने नुकतेच वैद्यकीय शिक्षण (एमबीबीएस) पूर्ण केले असून, वैद्यकीय पदवी प्राप्त केली आहे. गणेशचे चौथीपर्यंतचे प्राथमिक शिक्षण गावीच चिंचोली (मच्छिंद्रनाथ) येथे झाले, तर पाचवी ते आठवीचे पैठण तालुक्यातील बाभळगावच्या एन. जी. पाटील विद्यालयात झाले.



येथे शिकत असतानाच एका अपघातात त्याला आपला पाय गमवावा लागला. अशा परिस्थितीत एखाद्या विद्यार्थ्याला शिक्षण अर्धवट सोडायची वेळ आली असती; परंतु गणेशने जिद्दीने पुढील शिक्षण घेतले. परभणी येथील काणेकर अस्थिव्यंग विद्यालयात नववी व दहावीचे शिक्षण पूर्ण केले.

यानंतर पुन्हा जालना जिल्ह्यातील अंबडल येथील मत्सोदरी महाविद्यालयातून अकरावी व बारावीचे शिक्षण पूर्ण केले. सरकारी वसतिगृहात राहून महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. पुढे डॉक्टर व्हायचे हे मनाशी ठरवून नीटची तयारी केली.

छत्रपती संभाजीनगरला नीटची तयारी करून परीक्षेत उत्तीर्णही झाला व शेवटी डॉक्टर होण्याचे उराशी बाळगलेले स्वप्न सत्यात उतरले.

> दिव्यांग असल्याने डॉक्टर होइल अथवा नाही याची भीती होतीच, पण आई-वडिलांनी मोठे बळ दिले. त्यासाठी त्यांची सर्व आर्थिक ताकदही माझ्या पाठीमागे उभी केली. त्यांच्या अथक परिश्रमामुळेच हे करणे शक्य झाले आहे, त्यामुळे यापुढील काळात त्यांच्यासह अन्य गोरगरीबांची सेवा करण्याचा माझा मानस आहे.
>
> **डॉ. गणेश पांढरे, दिव्यांगावर मात करणारा अवलिया**

> आजच्या काळात छोट्या-छोट्या कारणांवरून आत्महत्या किंवा गैरकृत्य करणाऱ्या तरुणांनी गणेशसारख्या तरुणाचा आदर्श घेतला, तर आयुष्यात आई-वडिलांसह स्वतःसाठी चांगले दिवस येऊ शकतील. मोबाईलच्या माध्यमातून भरकटत चाललेल्या या नवीन पिढीत गणेशसारखे चांगले विद्यार्थीसुद्धा आहेत, अशी आदर्श उदाहरणे समाजापुढे यायला हवीत.मुलाने आमच्या कष्टाचे चीज केले. असा मुलगा प्रत्येक माता-पित्याच्या पोटी जन्माला यावा.
>
> **- विमल पांढरे, गणेशची आई**

# नदीकाठ सुधार मोहीम फत्ते...!

## पहिल्या टप्प्यातील ८० टक्के काम पूर्ण

पुणे हे एक ऐतिहासिक शहर समजले जात आहे. पुण्याचा शनिवारवाडा, लालमहाल, आगाखान पॅलेस यासह उपनगरांमध्ये अनेक पर्यटनस्थळे असून ही पर्यटनस्थळे पाहाण्यासाठी जगभरातून अनेक पर्यटन पुण्यात येत असतात. त्यातीलच संगमवाडी ते बंडगार्डन पूल हा इंग्रजांच्या काळातील सर्वात जुना पूल आहे, काळानुसार झालेल्या बदलामुळे या नदीवर महापालिका प्रशासनाला आणखी दोन नवे पूल बांधावे लागले. त्यामुळे वाहतूक कोंडीचा प्रश्न बहुतांशी प्रमाणात सुटला आहे. मात्र; काळ बदलला असला तरीही जुन्या बंडगार्डन पूलाचे महत्त्व अद्यापही अबाधित आहे. त्याठिकाणी सुशोभीकरण करण्यात आले आहे, त्यातील ८० टक्के काम पूर्ण झाले आहे. त्यामुळे या पूलाच्या सुशोभीकरणात आणखीनच भर पडणार असून शहराच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला जाणार आहे.



> मुळा - मुठा नदीकाठ सुधार प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील ८५ टक्के काम पूर्ण झाले आहे. जूनपर्यंत पहिल्या टप्प्यातील दोन किलोमीटरचे काम पूर्ण होईल. तसेच दुसऱ्या टप्प्यातील काम देखील ३२ टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे. संबंधित कामाला गती देण्यात आली आहे.
>
> **- युवराज देशमुख,** प्रमुख, विशेष प्रकल्प विभाग, पुणे महापालिका

**असा असेल दुसरा टप्पा...!**

- बंडगार्डन पूल ते मुंढवा या दरम्यानच्या पाच किलोमीटरच्या दुसऱ्या टप्प्यातील देखील ३२ टक्के काम पूर्ण
- पाच पैकी चार किलोमीटर काठबांधणीचे काम झाले.
- घाटांचीही कामे करण्यात आली आहेत.
- वडगाव शेरीतील नदीच्या पुर पातळीत येणाऱ्या विविध धर्मीयांच्या तीन स्मशानभूमी स्थलांतरित करणार
- नागरिकांना चालण्यासाठी दोन्ही बाजूंना तीन किलोमीटरचे प्रोमीनाड तयार



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महापालिकेच्या नदीकाठ सुधार प्रकल्पाच्या संगमवाडी ते बंडगार्डन पूल या पहिल्या टप्प्यातील ८० टक्के काम पूर्ण झाले आहे. जून महिन्यापर्यंत पहिल्या टप्प्यातील बहुतांश काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट महापालिकेने ठेवले आहे. याबरोबरच बंडगार्डन पूल ते मुंढवा या दुसऱ्या टप्प्याचे कामही ३२ टक्क्यांपर्यंत पूर्ण झाले आहे. दोन्ही टप्प्यातील कामांना गती देण्यावर महापालिकेकडून भर दिला जात आहे.

मुळा - मुठा नदीकाठी वाढलेले शहरीकरण, प्रक्रिया न केलेले सांडपाणी थेट नदीमध्ये सोडणे, नदीमध्ये कचरा टाकून नदी प्रदूषणात भर टाकली जात आहे. दरम्यान, अहमदाबादमधील साबरमती नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाच्या धर्तीवर पुणे महापालिकेच्या विशेष प्रकल्प विभागाकडून मुळा - मुठा नदीकाठ सुधार प्रकल्प मार्च २०२२ पासून हाती घेण्यात आला. त्यानुसार, महापालिकेने संगमवाडी ते बंडगार्डन पूल (स्ट्रेच १) हा ३.७ किलोमीटरचे काम सुरू केले.

अनेक अडथळ्यांची शर्यत पार करत या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे काम पूर्णत्वाच्या मार्गावर आहे. साडेतीन किलोमीटरच्या या पहिल्या टप्प्यातील ८५ टक्के काम पूर्ण झाले आहे. आतापर्यंत दोन्ही बाजूला घाट व काठबांधणीची कामे झाली आहेत. लँडस्केपींगचे काम लवकरच सुरू होणार आहे.

त्यानंतर वृक्षारोपण केले जाणार आहे. याबरोबरच नदीकाठच्या दोन्ही बाजूंना साडेतीन किलोमीटर इतक्या अंतराची नागरिकांना चालण्यासाठीची व्यवस्था (प्रोमीनाड) केली आहे. जूनपर्यंत साडेतीन पैकी दोन किलोमीटरचे काम पूर्ण होणार आहे. पहिल्या टप्प्यातील काम पाहण्यासाठी विद्यार्थी, नागरिक व विविध संस्थांचे अधिकारी व कर्मचारी येऊ लागले आहेत, अशी माहिती कार्यकारी अभियंता बिपिन शिंदे यांनी दिली.



# गावांच्या सुरक्षिततेसाठी १० ठिकाणी फायर ब्रिगेड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) कार्यक्षेत्रात येणाऱ्या गावांच्या सुरक्षिततेसाठी दहा ठिकाणी अग्निशमन केंद्र बनवण्याचा निर्णय घेतला आहे. त्याला प्रशासकीय मंजुरीही मिळाली आहे. या केंद्रांसाठी जागा निश्चित होत नव्हत्या; मात्र आता जागा निश्चितीचे काम आता शेवटच्या टप्प्यात आहे. जागा निश्चितीसाठी 'पीएमआरडीए'कडून जिल्हाधिकाऱ्यांना प्रस्ताव दिला आहे.

पूर्व हवेलीत शहरीकरण, नागरीकरण व औद्योगिकीकरणाचा वेग मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यामुळे आगीच्या छोट्या-मोठ्या घटना वारंवार घडत आहेत. हडपसर आणि वाघोली येथील अग्निशमन दलाची गाडी येईपर्यंत नागरिकांचे मोठे नुकसान होते. यामुळे पूर्व हवेलीत आग लागून होणारे नुकसान टाळण्यासाठी प्रशासनाने लोणी काळभोर, केडगावसह जिल्ह्यात १० ठिकाणी अग्निशमन केंद्र मंजूर केले आहेत.

दौंड, खेड, मुळशी, शिरूर आणि पुरंदर तालुक्यातील प्रत्येकी एका गावाचा समावेश आहे. तर सर्वाधिक जास्त केंद्रे हे हवेलीमध्ये तीन आणि मावळ तालुक्यात दोन होणार आहेत. 'पीएमआरडीए'च्या हद्दीमध्ये 814 गावांचा समावेश आहे. औद्योगिक वसाहती, त्यामुळे वाढत्या नागरीकीकरणामुळे अग्निशमन केंद्रांची अत्यंत आवश्यकता होती. सध्या जिल्हाधिकाऱ्यांना जागेसाठी प्रस्ताव पाठविला आहे.

जिल्हाधिकाऱ्यांकडून हिरवा कंदील मिळाल्यानंतर तातडीने केंद्रांच्या कामाला सुरुवात होणार आहे. या कामांसाठी दीडशे कोटींच्या प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली आहे. जिल्ह्यात एखादी मोठी दुर्घटना घडली, तर पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधून अग्निशामक विभागाच्या गाड्या बोलवाव्या लागतात. त्यासाठी ग्रामीण भागात जागा निश्चित करून त्या मिळवण्यासाठी 'पीएमआरडीए'चे प्रयत्न सुरू आहेत.

अग्निशमन दलाची केंद्रे हवेली तालुक्यातील लोणी काळभोर, वडाचीवाडी, औताडे हांडेवाडी, शिरूर तालुक्यातील शिक्रापूर, दौंड तालुक्यातील केडगाव, मावळ तालुक्यातील कान्हे, पाटण, पुरंदर मधील दिवे, मुळशीतील महाळुंगे व खेड तालुक्यातील येलवाडी येथे होणार आहेत.

# कादंबरी हे आशयसंपन्न विणलेले वस्त्र - आशुतोष जावडेकर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** 'सध्या कवितेचा स्फोट होत असून कथेचा संकोच होत आहे. कादंबरी हे आशयसंपन्न विणलेले वस्त्र असते. कथा हे ताकदीचे भावविश्व असून लेखक आपल्या प्रतिभेच्या चिमटीतून कथानक मांडत असतो,' असे मत लेखक डॉ. आशुतोष जावडेकर यांनी व्यक्त केले.

सुरेश एजन्सी आणि भावार्थ यांच्यातर्फे डॉ. अरुणा ढेरे लिखित आणि डॉ. वंदना बोकील-कुलकर्णी संपादित 'सीतेची गोष्ट आणि इतर निवडक कथा' या पुस्तकाच्या द्वितीय आवृत्तीचे प्रकाशन डॉ. आशुतोष जावडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी जावडेकर बोलत होते. सुरेश एजन्सीचे बाळासाहेब कारले आणि भावार्थच्या जोशी या वेळी उपस्थित होत्या. 'सीतेची गोष्ट' या कथेचे अभिवाचन करून वंदना बोकील-कुलकर्णी यांनी या कथेचे सौंदर्य उलगडले.

जावडेकर म्हणाले, 'कथा ही कोणाच्या मालकीची नसते. तर ती सांगणाऱ्याची, वाचणाऱ्याची व ऐकणाऱ्याची असते. या कथांमधून डॉ. ढेरे यांनी स्त्रीजीवनाविषयीचा ऊहापोह केला असला तरी पुरुष व्यक्तिरेखा समजून-उमजून रेखाटल्या आहेत. अरुणाताईंच्या कथेने मराठी कथेला आदिबंधात्मक स्वरूपाचे वेगळे वळण दिले.

कोणत्याही साहित्यकृतीसाठी तर्काने होणारी सुरुवात आणि शेवट महत्त्वाचा असतो, असे सांगून वंदना बोकील-कुलकर्णी म्हणाल्या, 'या लेखनाला लोकसाहित्याचे पदर आहेत. मुलीचा विवाह करून तिला अयोध्या नगरीमध्ये दिले तर तिच्या नशिबी वनवास येतो, अशी समजूत आजही त्या भागात आहे.



# ग्लोबल एजुकेशन फेअर २०२५ ला विद्यार्थी, पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

परदेशी जाऊन शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी स्टडी स्मार्टच्या वतीने ग्लोबल एजुकेशन फेअर २०२५चे आयोजन करण्यात आले होते. या फेअर ला पुण्यातील विद्यार्थी आणि पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** परदेशी जाऊन शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी स्टडी स्मार्टच्या वतीने ग्लोबल एजुकेशन फेअर २०२५चे आयोजन करण्यात आले होते. या फेअर ला पुण्यातील विद्यार्थी आणि पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या एज्युकेशन फेअर मध्ये एक हजाराहून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते तर युरोप, अमेरिका सह ऑस्ट्रेलिया मधील विविध विद्यापीठांचे प्रतिनिधी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी आले होते.

हा फेअर पुण्याच्या 'पोचा हॉल', बोट क्लब येथे आयोजित करण्यात आलेल्या ग्लोबल एज्युकेशन फेअर २०२६ बद्दल माहिती देताना स्टडी स्मार्टचे मॅनेजिंग डायरेक्टर, चेतन जैन यांनी सांगितले की, "आजकाल अनेक विद्यार्थी १२वी किंवा ग्रॅज्युएशनच्या नंतर विदेशात उच्च शिक्षण घेण्याचे स्वप्न पाहतात. मात्र त्यांना योग्य मार्गदर्शन, माहिती आणि तज्ञांचा सल्ला न मिळाल्यामुळे ते या मार्गात अडचणींचा सामना करतात."

या फेअरमध्ये जगभरातील ५० हून अधिक नामांकित विश्वविद्यालयांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. यामध्ये यूके, यूएसए, आयर्लंड, जर्मनी, दुबई आणि इतर देशांतील प्रतिष्ठित शैक्षणिक संस्था समाविष्ट आहेत. विद्यार्थी या प्रतिनिधींशी थेट संवाद साधू शकतात, योग्य अभ्यासक्रम, प्रवेश प्रक्रिया, करिअरचे मार्गदर्शन, आणि विविध महत्त्वाच्या संधींबद्दल माहिती देण्यात आली.

याशिवाय, फेअरमध्ये विविध इंटरएक्टिव्ह कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते, यामध्ये विद्यार्थी आणि पालकांना छात्रवृत्त्या आणि आर्थिक सहाय्य, सप्टेंबर २०२५ मध्ये प्रवेशासाठी संधी, स्पॉट ऑफर आणि IELTS सूट, पोस्ट-स्टडी काम आणि करिअर संधींविषयी पूर्णपणे मोफत मार्गदर्शन करण्यात आले.

# गुलाबो गँगकडून फेरीवाल्यांच्या डोळ्यात धुळफेक : कांबळे

**पिंपरी :** फेरीवाल्यांवर कारवाई होणार नसल्याचा उच्च न्यायालयाने आदेश दिल्याचे सांगत गुलाबो गँग आणि काही लोकांनी गुलाल उधळून स्वागत केले खरे. मात्र



दुसऱ्याच बाजूला शहरातील काही फेरीवाल्यांना महापालिकेच्या कारवाईला सामोरे जावे लागल्याची घटना घडली आहे. त्यामुळे न्यायालयाचा आदेश आहे तर तो दाखवून अधिकाऱ्यांना कारवाईपासून का रोखले नाही. न्यायालयाच्या आदेशाचे कारण सांगून गुलाल उधळणारी गुलाबो गँग फेरीवाल्यांच्या डोळ्यात धुळफेक करत आहे का, असा परखड सवाल पिंपरी-चिंचवड महापालिका फेरीवाला समितीच्या सदस्य आशा बाबा कांबळे यांनी उपस्थित केला आहे. न्यायालयाच्या आदेशाची प्रत जाहिर करून फेरीवाल्यांमधील संभ्रम दूर करावा, असे आवाहनही आशा कांबळे यांनी गुलाबो गँगला केले आहे. आशा कांबळे यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, पिंपरी-चिंचवड शहरात असंख्य गोरगरिब फेरीवाले आपला उदरनिर्वाह करत आहेत. त्यांना शासनाने फेरीवाला कायद्यांतर्गत योग्य संरक्षण आणि सुविधा देणे अपेक्षित आहे. मात्र त्याकडे दुर्लक्ष करत शासन यंत्रणा कारवाईचा बडगा उगारत आहे. अनेक फेरीवाल्यांची वाहने जप्त करत त्यांचा संसार उघड्यावर आणत आहे. या फेरीवाल्यांची लढाई योग्य रितीने लढून त्यांना न्याय देणे अपेक्षित आहे. मात्र काही लोक चुकीचा संदेश पसरवून फेरीवाल्यांची दिशाभूल करताना दिसत आहेत.



## भाजपची भारतीय लोकशाहीत प्रभावी भूमिका

**पिंपरी :** भारताला एक मजबूत, समृद्ध आणि शक्तिशाली राष्ट्र म्हणून जागतिक स्तरावर स्थापित करण्यासाठी कटिबद्ध असणारा भारतीय जनता पार्टी (भाजपा) राजकीय पक्ष आहे. स्थापनेपासूनच, भाजपाने आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि लोकहिताच्या विषयांवर आवाज उठवून भारतीय लोकशाहीत प्रभावी भूमिका बजावली आणि भारतीय राजकारणाला नवीन आयाम दिले, असे प्रतिपादन भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार शंकर जगताप यांनी केले. भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेशने सदस्य नोंदणीचा दीड कोटींचा टप्पा नुकताच पार केला. भारतीय जनता पार्टीच्या तमाम कार्यकर्त्यांचं हे यश असून याच पार्श्वभूमीवर आज पक्षाच्या ४५ व्या स्थापना दिवसानिमित्त 'मजबूत संघटन ऑनलाईन कार्यकर्ता संमेलन' मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या मार्गदर्शनात संपन्न झाले. यानिमीत्त चिंचवड विधानसभा कार्यक्षेत्रात भाजपा सरचिटणीस नामदेव ढाके यांच्या यांच्या कार्यालयात आयोजित कार्यक्रमांवेळी ते बोलत होते. ऑनलाइन संमेलनात प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी मार्गदर्शन केले.



## आमदार जगताप यांची पुस्तक तुला

**पिंपरी :** आमदार शंकर जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांना नागरिकांचा उदंड प्रतिसाद लाभला. विशेष म्हणजे, शुभेच्छा देण्यासाठी पुष्पगुच्छांऐवजी पुस्तक देण्याच्या अभिनव उपक्रमाला भरभरून प्रतिसाद मिळत, एकूण ६,८४२ पुस्तके जमा झाली. दिवसभरात जमा झालेल्या या पुस्तकांची संध्याकाळी 'बालजत्रा' कार्यक्रमात तुला करण्यात आली. ही सर्व पुस्तके चिंचवड विधानसभा मतदारसंघातील वाचनालयांना मोफत देण्यात येणारआहेत. या विशेष दिवशी पिंपरी-चिंचवड शहरात दिवसभर विविध सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक व सांस्कृतिक उपक्रम आयोजित करण्यात आले. पिंपळे गुरव येथील महादेव मंदिरात अभिषेक, तर ८ वाजता संपूर्ण चिंचवड मतदारसंघात स्वच्छता अभियान राबवण्यात आले. यामध्ये नागरिकांचा मोठा सहभाग दिसून आला.संतोष कांबळे यांच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले आणि लॉन टेनिस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

## आजी आजोबांच्या लाडात रमली मुले !

**पिंपरी :** विभक्त कुटुंब पद्धती, कामानिमित्त शहरातील वास्तव्य, शहर-खेड्यातील जीवनशैलीतील अंतर यामुळे अनेक मुलांना आज्जी-आजोबाचे प्रेम व संस्काराची शिकवण लाभत नाहीत. हाच धागा पकडत डीसके कुजंबन सोसायटीमधील जेष्ठ महिला मंडळाने गुढीपाडव्याच्या शुभमुहुर्तावर सोसायटीमधील मंदिरात विनामुल्य संस्कार-वर्ग सुरू केले. सोसायटीतील मुलांना एकत्र करत त्यांच्याशी गप्पा मारल्या, संस्कारक्षम गोष्टी शिकवल्या. मुले देखील या आजी आजोबांच्या लाडामध्ये रमून गेली आहेत. आजच्या महागाईच्या आणि स्पर्धात्मक युगामधे दैनंदिन जीवन जगण्यासाठी खेड्याखेड्यामधुन अनेकजण मुबंई-पुणे सारख्या शहरात येतात. आय.टी., अॅटोमोबाईल सारख्या क्षेत्रात काम करून अथवा कोणतातरी व्यवसाय करून कुटुंबाच्या पालनपोषणासाठी अथक प्रयत्न करतात. आईवडील अर्थाजनासाठी सकाळी बाहेर पडतात व संध्याकाळी घरी येतात. दोघांनाही मुलांवर लक्ष द्यायला व संस्कार घडवायला वेळ नसतो.

## सायकल डोनेशन उपक्रम




पुणे मुलांना सायकल भेट देण्यात आल्या. सायकल मिळणार म्हणून सकाळी लवकर उठून तयार झालेल्या मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहण्यासारखा होता.

## इंडो अॅथलेटिक सोसायटी तर्फे गरजूंना 'सायकल भेट'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** भारतातील क्रीडा व आरोग्य क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या इंडो अॅथलेटिक सोसायटीतर्फे (दि.०६) इंडो अॅथलेटिक सोसायटीच्या ऑफिसमध्ये गरजू विद्यार्थ्यांसाठी काम करणाऱ्या सहकार मी फाउंडेशनच्या मस्ती की पाठशाला या शाळेतील बांधकाम व वीट भट्टी कामगारांच्या मुलांसाठी सायकल डोनेशन उपक्रम घेण्यात आला. संस्थेतर्फे दर सहा महिन्याला असा उपक्रम घेतला जातो असे इंडो अॅथलेटिक सोसायटीतर्फे सांगण्यात आले.

रनिंग ट्रेकिंग स्विमिंग व सायकलिंगची आवड जपत अनेक सामाजिक उपक्रम करणाऱ्या मस्ती की पाठशाळेच्या पाच मुलांना या उपक्रमात सायकल भेट देण्यात आल्या. सगळ्या सायकलींना छान फुलांचे हार घालण्यात आले होते. मुलांना इंडो अॅथलेटिक सोसायटीचे टीशर्ट भेट देण्यात आले. त्यामुळे आमची मुलं इंडो अॅथलेटिकच्या परिवारात अगदी सहजरीत्या सामावून गेली.

# स्थापना दिननिमित्त भाजपाचे शक्तीप्रदर्शन!





"राष्ट्र प्रथम, त्यानंतर पक्ष आणि शेवटी स्वतः" हा भाजपा विचार अंगिकारत, अंत्योदयाच्या मार्गावर भाजपाचा प्रत्येक कार्यकर्ता अविरत वाटचाल करत आहे. भाजपा स्थापना दिनानिमित्त निवासस्थानी, प्रत्येक मंडल अधिकाऱ्यांच्या कार्यालयसमोर आणि पदाधिकाऱ्यांनी आपल्या निवासस्थानी भारतीय जनता पक्षाचा ध्वज फडकावून हा गौरवाचा दिवस साजरा केला आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपाचे संघटन मजबूत करीत असून, पक्षाची ध्येय धोरणे सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवणे आणि विकसित भारत व शेवटच्या घटकाचा विकास साधणे, असा संकल्प आहे.

**-महेश लांडगे, आमदार,**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** "विकसित भारत अभियान" चा नारा देत देशभरात भारतीय जनता पार्टीचा स्थापना दिवस विविध उपक्रम आणि विधायक कार्यक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपा वज्रमूठ दाखवली आणि शहरभरात जोरदार शक्तीप्रदर्शन करण्यात आले. संपूर्ण शहरात पक्षाचे फ्लेक्स लावण्यात आले असून, शहरवासीयांचे लक्ष वेधून घेतले आहे.

भाजपासह तमाम हिंदू बांधवांचे आराध्य प्रभू श्रीराम जन्मोत्सव अर्थात राम नवमी आणि भाजपा स्थापना दिवस एकत्र येण्याचा योग आला. त्यामुळे एका बाजुला श्रीराम यांचा जयघोष आणि दुसऱ्या बाजुला "अजेय भारत... अजेय भाजपा.." असा संकल्प शहरातील भाजपा कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांचा दिसला आहे.

भाजपाच्या मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालय येथे स्थापना दिनाच्या निमित्ताने ध्वजारोहन करण्यात आले. यावेळी शहराध्यक्ष व आमदार शंकर जगताप, आमदार महेश लांडगे, आमदार उमाताई खापरे, प्रदेश कार्यकारणी सदस्य सदाशिव खाडे, माऊली थोरात, कार्यकारी अध्यक्ष शत्रुघ्न काटे, जिल्हा सरचिटणीस संजय मंगोडेकर, युवा मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष तुषार हिंगे आदी पदाधिकारी - कार्यकर्ते उपस्थित होते.

आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेत शहरात फ्लेक्सद्वारे विकसित भारत आणि महाराष्ट्रात दीड कोटी सदस्य नोंदणी झाल्याबाबत जनजागृती केली. या जाहिरातींमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांचे फोटो झळकले आहेत. तसेच, विविध वृत्तपत्र आणि प्रसारमाध्यमांमध्ये पक्षाच्या जाहीरातीही प्रसिद्ध झाल्या आहेत. आमदार लांडगे यांच्या निवासस्थानी त्यांनी सकाळी ध्वजारोहण केले. त्यानंतर भोसरी येथील मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालयावर ध्वज फडकावण्यात आला. आगामी निवडणुकांच्या निमित्ताने भाजपाच्या स्थानिक नेत्यांनी एकजुट केल्याचे पहायला मिळत आहे.

### महाराष्ट्रात दीड कोटी सदस्यांचा टप्पा पूर्ण...

भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेशने सदस्य नोंदणीचा दीड कोटींचा टप्पा नुकताच पार केला. भारतीय जनता पार्टीच्या तमाम कार्यकर्त्यांचं हे यश असून याच पार्श्वभूमीवर आज पक्षाच्या ४५ व्या स्थापना दिवसानिमित्त 'मजबूत संघटन ऑनलाईन कार्यकर्ता संमेलन' मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या मार्गदर्शनात संपन्न झाले. २०१४ मध्ये नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात पहिल्यांदाच भाजपाचे पूर्ण बहुमताचे सरकार स्थापन झाले, जे आज 'सबका साथ, सबका विकास' या घोषणेसह गौरवशाली भारताची पुनर्बांधणी करत आहे. राष्ट्रीय अध्यक्ष अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली भाजपा सुमारे ११ कोटी सदस्यांसह जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष बनला आहे.

### पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपा मजबूत...

पिंपरी-चिंचवडमध्ये भारतीय जनता पार्टीची वाटचाल 2014 पासून सक्षम होवू लागली. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी भाजपात प्रवेश केला आणि त्यावेळीचा सत्ताधारी पक्ष राष्ट्रवादी काँग्रेसमधील मोठा गट भाजपासोबत गेला. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीमध्ये आमदार महेश लांडगे यांनी भाजपात जाहीर प्रवेश केला आणि मोठा गट भाजपात दाखल झाला. परिणामी, 2017 मध्ये पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेवर "कमळ" फुलले. भाजपाच्या सत्ताकाळात शहरातील अनेक मान्यवरांना मोठी संधी मिळाली. त्यामध्ये सदाशीव खाडे, अॅड. सचिन पटवर्धन, अमित गोरखे, उमा खापरे, अनुप मोरे अशा अनेक नेत्यांचा समावेश आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपा बलाढ्य असून, त्या ताकडीने पक्ष संघटना मजबूत होत आहे.

# तळेगावमध्ये ३०० एकर जागा टूल हबसाठी देणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** तळेगाव येथे टूल हब साठी ३०० एकर जागा उपलब्ध करुन देण्यात येईल. पुरंदर येथील विमानतळाच्या जमिनीचे भूसंपादन प्रक्रिया तातडीने पूर्ण करा, पुणे व पिंपरी चिंचवड महापालिकांनी सेंद्रिय कचऱ्यातून गॅस निर्मिती प्रकल्प राबविण्याबाबत कार्यवाही करावी, डी. पी. रोड आखून घ्या, सर्व रस्त्यांचे काँक्रीटीकरण करा, रस्ते जास्तीत जास्त रुंद करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या.

उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी पुणे महानगर प्रदेश विकास परिषदेअंतर्गत जिल्हा विकास आराखड्यातील कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा (ए आय) वापर, पर्यावरण व परिपूरक अर्थव्यवस्था, उद्योग क्षेत्र व उत्पादकता वाढविण्यासाठी विविध संस्थाकडून सविस्तर आढावा घेतला. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पोलीस आयुक्त अमितेश कुमार, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, पुणे मनपा आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, मैत्री संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविण परदेशी, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील तसेच विविध संस्थांचे प्रमुख उपस्थित होते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे 2047 पर्यंत विकसित भारत करण्याचे उद्दिष्ट आहे. त्यानुसार 3 ट्रिलियन वरुन 30 ट्रिलियन अर्थव्यवस्था करण्याचे उद्दिष्ट आहे. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था वाढविण्याचे उद्दिष्ट राज्य शासनाने ठेवले आहे. राज्यात जलद आणि सर्वसमावेशक विकासासाठी, खासगी क्षेत्र व अशासकीय संस्थांच्या सहभागाद्वारे काम करणाऱ्या मैत्री संस्थेवर राज्यातील महत्त्वाच्या शहरातील विविध विकासात्मक कामे करण्याची जबाबदारी दिली.

**— अजित पवार** उपमुख्यमंत्री,

# 'ओपन रोलर स्केटिंग स्पर्धा-२०२५' चे आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिंचवड :** नगरसेवक शत्रुघ्न (बापु) काटे स्पोर्ट अकॅडमी यांच्या सौजन्याने चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त पिंपळे सौदागर येथील शिव छत्रपती क्रीडांगण याठिकाणी "ओपन रोलर स्केटिंग स्पर्धा-२०२५" चे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी आमदार शंकरशेठ जगताप यांच्या उपस्थितीत या स्पर्धेचे उद्‌घाटन करण्यात आले. या वयोगट ५ वर्षे ते १४ वर्ष वयोगटातील ५०० पेक्षा जास्त स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. या स्पर्धेत ड्रीम क्लब, शिशा स्केटिंग क्लब, LJ स्केटिंग क्लब, साई स्केटिंग क्लब आणि वर्ल्ड पीस स्कुल आळंदी यांनी अनुक्रमे पहिला दुसरा तिसरा चौथा आणि पाचवा क्रमांक पटकविल्या बद्दल चषक तसेच प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. आपले शरीर लवचिक राहण्यासाठी अनेक खेळ खेळले जातात. त्यापैकीच एक खेळ म्हणजे स्केटिंग. मुलांमध्ये अगदी लहानपणापासूनच स्केटिंगचे आकर्षण असते. पायाला चाकं लावून भन्नाट वेगाने पुढे जाणे असे त्यांना वाटत असते. नियमित सरावामुळे गुडघे व पायाची हाडे मजबूत होतात. पोटाचा व पाठीचा व्यायाम होतो.



पुणे "ओपन रोलर स्केटिंग स्पर्धा-२०२५" वेळी भाजप जिल्हा कार्यकारी अध्यक्ष शत्रुघ्न (बापु) काटे, भानुदास काटे पाटील, मनोज ब्राह्मणकर, राजेश पाटील, सुप्रिया पाटील, अशोक वारकर काका, प्रविण कुंजीर, बाळकृष्ण परघळे, संभाजी मगर, दिपक गांगुर्डे, शंतनू प्रभुणे, सुशील भाटिया, नितेश जगताप, संकेत चोंधे, सनी बारणे, प्रसाद कस्पटे व इतर मान्यवर उपस्थित होते.

# एकजुटीने रामजन्मोत्सव दणक्यात साजरा

**महेश लांडगे यांच्या सोबतीने रामभक्तांचा जल्लोष**
**'हिंदू एकजूट'चा संकल्प करीत युवकांचा पुढाकार**





■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** "एकही नारा...एकही नाम... जय श्रीराम..." असा जयघोष करीत पिंपरी-चिंचवडमध्ये राम नवमी उत्साहात साजरी करण्यात आली. पश्चिम महाराष्ट्रातील सर्वात मोठी शोभायात्रा भोसरी आणि परिसरातून काढण्यात आली. यामध्ये विविध मंडळांनी एकजुट दाखवत जन्मोत्सव दणक्यात साजरा केला.

इंद्रायणीनगर येथे विश्व हिंदू परिषद, बजरंग दल अशा संघटनांनी भव्य शोभायात्रा काढली. भोसरीतील कृपासाई फाउंडेशनचे संस्थापक प्रदीप पवार यांच्या पुढाकाराने रामरथ सोहळा आयोजित करण्यात आला. यामध्ये महबली हनुमान मूर्ती शोभायात्रेचे आकर्षण ठरले.

तसेच, सुमीत लांडगे युथ फाउंडेशन, जय भवानी युवा मंच, श्री. दुर्गामाता सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळ, मोशी येथील शिवयोद्धा ग्रुप, एसवाय ग्रुप सोशल फाउंडेशन, राम नवमी उत्सव समिती, निगडी यांच्या तर्फे प्रभू श्रीराम जन्मोत्सव साजरा करण्यात आला. या सर्व मंडळांचे आधारस्तंभ म्हणून आमदार महेश लांडगे यांच्या नावाचा उल्लेख केला जात आहे.

आमदार लांडगे म्हणाले की, मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीरामांच्या आदर्शमय जीवनातून प्रेरणा घेऊन समाजात सौहार्द, सहिष्णुता आणि सत्याची मूल्ये अधिक बळकट झाली पाहिजेत. श्रीरामांनी दाखवलेली प्रजाहितदक्षता, सत्यनिष्ठा आणि निःस्वार्थ सेवा ही आजही आपल्यासाठी प्रेरणादायी ठरतात. त्यांच्या जीवनातून आपण एकता, शांती आणि समरसतेची शिकवण घेणे आवश्यक आहे.



'हिंदू' म्हणून युवकांनी एकोप्याने राहिले पाहिजे. समाजातील आठरापगड जाती-बारा बलुतेदार यांना सोबत घेवून जाणारे हिंदूत्व आपल्या प्रभू श्रीरामांनी शिकवले. त्यांच्या विचारांनीच छत्रपती शिवाजी महाराज यांनी हिंदवी स्वराज निर्माण केले. छोट्या-छोट्या मंडळांमध्ये श्रीराम जन्मोत्सव न करता भव्य-दिव्यपणे प्रत्येक परिसरात व्हावा. तमाम हिंदूत्ववादी युवकांनी यावर्षी उत्सव दिमाखात साजरा केला, ही परंपरा कायम रहावी, अशीच प्रार्थना आहे..

**— महेश लांडगे,**
आमदार,

संपादकीय विशेष

# हा चोंबडेपणा भारतासाठी धोक्याचा

डॉ. मोहम्मद युनूस हे आंतरराष्ट्रीय किर्तीचे अर्थतज्ज्ञ असले, तरी चांगले राजकारणी नाहीत, हा अनुभव जगाला येत आहे. बांगलादेशला अडचणीतून बाहेर काढण्याचा प्रयत्न करण्याऐवजी ते चीनसारख्या देशाच्या पुढ्यात ढकलून मोकळे होत आहेत. त्यासाठी त्यांनी केलेल्या तत्त्वशून्य तडजोडींमुळे भारत आणि बांगलादेशचे संबंध सर्वात खालच्या पातळीवर पोहोचले आहेत. युनूस यांनी अलिकडेच केलेल्या वक्तव्यामुळे भारतातील लोक संतप्त झाले आहेत. युनूस अलिकडेच चीनच्या दौऱ्यावर होते. त्यांनी चीनला बंगालच्या उपसागर भागात येण्याचे आमंत्रण दिले. युनूस म्हणाले की भारतातील ईशान्येकडील सात राज्यांना 'सेव्हन सिस्टर्स' म्हणून ओळखले जाते. हे भूपरिवेष्टित क्षेत्र आहे. या राज्यांना समुद्रात प्रवेश नाही. त्या प्रदेशातील महासागराचे आपणच रखवालदार आहोत. चीन इथे गुंतवणूक करू शकतो. पश्चिम बंगालच्या 'सिलीगुडी कॉरिडॉर'ला भारताचा चिकन नेक म्हटले जाते. ते मुख्य भारताला ईशान्येशी जोडते. या भागात चीनने विस्तार करावा, या आशयाच्या वक्तव्यामुळे त्यांच्याबद्दल नाराजी पसरली.

युनुस यांच्या मते या भागात केलेल्या गुंतवणुकीतून चीनला 'चिकन नेक'मध्ये प्रवेशाचा मार्ग खुला होईल. चीन या संधीची किती तरी दशके वाट पाहत आहे. त्यासाठी त्याने मध्यंतरी भूतानबरोबर वाटाघाटी केल्या.'चिकन नेक कॉरिडॉर'द्वारे बंगालमधून ईशान्येकडील राज्यांपर्यंत पोहोचणे भारतासाठी आर्थिक आणि धोरणात्मकदृष्ट्या काहीसे आव्हानात्मक आहे. युनूस यांना या जागेबाबतची भारताची संवेदनशीलता माहीत आहे. म्हणूनच ते चीनला या भागात समुद्रात प्रवेश देण्याचे निमंत्रण देत आहेत. 'चिकन नेक' हा पश्चिम बंगालच्या शेजारी वसलेला एक अरुंद भाग आहे. हा 20-22 किलोमीटर रुंद आणि साठ किलोमीटर लांब आहे. याला 'सिलीगुडी कॉरिडॉर' असेही म्हणतात. हा मार्ग ईशान्येकडील राज्यांना जोडतो. त्याला 'सेव्हन सिस्टर्स' असेही म्हणतात. हा कॉरिडॉर नेपाळ, भूतान, चीन, बांगलादेश या शेजारी राष्ट्रांनी वेढलेला आहे. चीनची नजर भारताच्या महत्त्वाच्या 'सिलीगुडी कॉरिडॉर'वर आहे. चीन तिबेट स्वायत्त प्रदेशा (टीएआर)च्या चुंबी खोऱ्यात आपला संपर्क मजबूत करत आहे. हा भाग भारताच्या 'सिलीगुडी कॉरिडॉर'च्या जवळ आहे.

'सिलीगुडी कॉरिडॉर'हे केवळ व्यावसायिक आणि भौगोलिकदृष्ट्याच नाही, तर सामरिकदृष्ट्याही भारताचे महत्त्वाचे क्षेत्र आहे. पूर्व कमांडर लेफ्टनंट जनरल मनोज पांडे यांनी अलीकडेच सिलीगुडीचे वर्णन संवेदनशील म्हणून केले होते. एका अधिकृत सूत्राने सांगितले की चीन सिलीगुडी कॉरिडॉरच्या जवळ असलेल्या चुंबी खोऱ्यात पर्यायी मार्ग तयार करत आहे. चीनचे सैन्य रस्ते बांधून भूतानच्या हद्दीत आपली मुळे मजबूत करत आहे. गेल्या वर्षी प्रसिद्ध झालेल्या उपग्रह प्रतिमांमध्ये चीनने भूतानच्या भूभागातून तोरसा नदीकाठी रस्ते बांधल्याचे दिसले आहे. सर्वांचे लक्ष लडाख सीमेवरील 'पीपल्स लिबरेशन आर्मी'च्या अतिक्रमणावर असताना, चीन शांतपणे इतरत्र आपली आक्षेपार्ह क्षमता वाढवत आहे. यामध्ये भारताच्या 'चिकन नेक'जवळ भूतान प्रदेशातील रस्तेबांधणीचा समावेश आहे. हा प्रदेश बांगलादेश, नेपाळ, भूतान आणि चीनसह अनेक आंतरराष्ट्रीय सीमांनी वेढलेला आहे. या खोऱ्याच्या शेवटी भारत, नेपाळ आणि भूतानचा त्रिखंड आहे, जो डोकलाम क्षेत्र म्हणून ओळखला जातो. तो आता एक 'स्टँडऑफ पॉइंट' बनला आहे. दार्जिलिंगचा चहा आणि लाकूड या प्रदेशाचे महत्त्व आणखी वाढवते.

'सिलीगुडी कॉरिडॉर'ला रस्ते आणि रेल्वेने जोडलेले आहे. या कॉरिडॉरमधूनच त्यांना सर्व जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा केला जातो. युद्ध झाल्यास 'सिलीगुडी कॉरिडॉर'मधून शस्त्रे आणि सैन्य सहज जमवता येते. भारतीय लष्कराने ब्रह्मोस मिसाईल रेजिमेंट तैनात करून या भागाची सुरक्षा मजबूत केली आहे. 'सिलीगुडी कॉरिडॉर'ची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी, भारतीय लष्कर आणि हवाई दलाने त्यांची लष्करी रचना आणखी मजबूत केली आहे. चीन आणि बांगलादेशच्या कारवाया पाहता भारत या प्रदेशात सर्व संभाव्य सुरक्षा उपाय करत आहे, जेणेकरून कोणत्याही संभाव्य आव्हानाला चोख प्रत्युत्तर देता येईल. 'बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह' (बीआरआय) च्या माध्यमातून चीन आधीच बांगलादेशमध्ये आपली उपस्थिती वाढवत आहे. अशा स्थितीत युनूस यांच्या चीन दौऱ्याकडे भारताविरुद्धची मुत्सद्दी खेळी म्हणून पाहिले जाऊ शकते.

2017 मध्ये भारत-चीन-भूतान सीमेवरील त्रिकोणी भागात भारत आणि चीनचे सैन्य दोन महिने एकमेकांसमोर उभे ठाकले होते. या वेळी चीनने भूतानच्या भूभागातील डोकलाममध्ये रस्ता बांधण्याचा प्रयत्न केला होता. भारतीय लष्कराने भूतानच्या हद्दीत घुसून चीनला रस्ता बांधकाम थांबवण्यास भाग पाडले. चीनने डोकलाम पठार ओलांडून यशस्वीपणे रस्ता बांधला असता, तर सिक्कीमच्या 'सिलीगुडी कॉरिडॉर'ला धोका निर्माण करून ते जामफेरी रिजच्या जवळ पोहोचले असते. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन भारताने चिकन नेक भागात चीनची आक्रमकता रोखण्यासाठी अनेक महत्त्वाची पावले उचलली आहेत.

एस-400 पृष्ठभागावरून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्र प्रणाली एस-400 सॅम ही पृष्ठभागावरून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्र प्रणाली आहे, जी 400 किलोमीटरहून अधिक अंतरावरील शत्रूची लढाऊ विमाने, क्रूझ आणि बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे नष्ट करू शकते. भारताने रशियाकडून या प्रणालीच्या पाच रेजिमेंट पाच अब्ज डॉलर खर्चून खरेदी केल्या आहेत. त्यापैकी रशियाने भारताला तीन रेजिमेंट दिल्या आहेत. पाकिस्तान आणि चीनच्या पश्चिम आणि उत्तर सीमांचे रक्षण करण्यासाठी पंजाब प्रदेशात पहिली रेजिमेंट तैनात करण्यात आली होती. भारतीय हवाई हद्दीत चिनी लढाऊ विमानांचा प्रवेश रोखण्यासाठी 'सिलीगुडी कॉरिडॉर'मधील चिकन नेक भागात दुसरी रेजिमेंट तैनात करण्यात आली आहे. भारताच्या 'डीआरडीओ'ने इस्रायलच्या सहकार्याने विकसित केलेली हवाई संरक्षण यंत्रणा 70 किलोमीटरहून अधिक अंतरावरील हवाई लक्ष्य नष्ट करू शकते. प्रगत आकाश प्रणालीमध्ये नवीन साधक तंत्रज्ञान, अंतराळ-कार्यक्षम डिझाइन आणि 360-डिग्री प्रतिबद्धता क्षमता समाविष्ट आहे. अर्थात या भागाच्या रक्षणासाठी भारताची संरक्षणसिद्धता झाली असली, तरी बेसावध राहून चालणार नाही. आणि म्हणूनच युनुस यांच्या बेजबाबदार विधानांची देशभरात निंदा करण्यात आली.

# निवडणुकीची सौगात

**भारतीय जनता पक्षाने अलिकडेच ईदनिमित्त घरोघरी भेटीच्या किटवाटपाचा निर्णय घेतला. त्यासाठी भाजपच्या कार्यकर्त्यांना कामाला लावले. भारतीय जनता पक्ष कोणतीही गोष्ट सहज करत नाही. उत्तर प्रदेश, बिहार आणि पश्चिम बंगाल राज्यातील वेगवेगळ्या निवडणुका लक्षात घेऊन मतांची आणखी बेगमी करण्यासाठी ही व्यूहनीती आखली गेल्याचे सांगितले गेले. वास्तव काय सांगते?**

मागोवा

राहुल शिवाजी कराळे,
विधिज्ञ



देशातील सर्वसामान्य गरीब मुस्लिमांची मने जिंकण्यासाठी भाजपने अलिकडेच घरोघरी जाऊन ईदच्या भेटवस्तूंचे वाटप केले. पक्षाच्या अल्पसंख्याक आघाडीने दिल्लीतून हा देशव्यापी प्रचार केला. पक्षातर्फे 32 लाख मुस्लिम कुटुंबांना 'सौगात-ए-मोदी किट'चे वाटप करण्यात आले. बिहार विधानसभा निवडणुकीपूर्वी सुरू झालेल्या पक्षाच्या या प्रचाराचा अर्थ शोधला जात आहे. भाजपच्या मूळ मतदारांचा एक भाग 'सोशल मीडिया'वर या मोहिमेवर टीका करत असला, तरी काही निवडक घटनांच्या निमित्ताने एका विशिष्ट वर्गाला फुटीरतेच्या मार्गावर नेण्याच्या प्रयत्नांना 'सबका साथ, सबका विकास' या मोहिमेद्वारे रोखले जाऊ शकते, असे पक्षातील सूत्रांचे म्हणणे आहे. राष्ट्रीय हित हा भाजप आणि मोदींचा सर्वात मोठा अजेंडा आहे. भाजप अल्पसंख्याक मोर्चाद्वारे देशातील 32 हजार मशिदी-मदरसे या मोहिमेशी जोडले जाणार असल्याचे सांगितले गेले. गरीब आणि गरजू मुस्लिम कुटुंबांची यादी प्रत्येक मस्जिद किंवा मदरशाद्वारे तयार करुन 'सौगात-ए-मोदी किट'चे वाटप केले गेले. यासाठी अल्पसंख्याक मोर्चाच्या 32 हजार अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. किमान शंभर कुटुंबांना मोदींच्या भेटवस्तूंचे वाटप करण्याची जबाबदारी प्रत्येक अधिकाऱ्याने पेलली. जिल्हास्तरावरही ईद मिलन सोहळ्याचे आयोजन करण्याचे या निमित्ताने पहायला मिळाले. हिंदुत्वाचे राजकारण करणाऱ्या भाजपने गेल्या 11 वर्षांच्या मोदी सरकारच्या राजवटीत तुष्टीकरण न करण्याच्या नावाखाली मुस्लिम मतदारांचा पाठिंबा मिळवण्याचा कोणताही ठोस प्रयत्न केला नव्हता. त्या पार्श्वभूमीवर भाजपचे ताजे भेटवाटप चर्चेचा विषय ठरले.
भाजपच्या तिसऱ्या कार्यकाळात 'सौगात-ए-मोदी'सारखा कार्यक्रम हा मुस्लिम मतदारांमध्ये प्रवेश करून पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न मानला जात आहे. गेल्या काही काळापासून भाजपची मूळ संघटना असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने (आरएसएस) मुस्लिमांबाबत आपल्या वक्तव्यात नरमाई दाखवली आहे. भारताची भूमी स्वतःची मानतो तो हिंदू, अशी व्याख्या भाजपतर्फे अलिकडेच मांडण्यात आली. 'सौगात-ए-मोदी'सारख्या योजनेला जोडून भाजपचा मुस्लिमांबाबतचा दृष्टिकोनही बदलताना दिसत आहे. अलीकडच्या काळात मोदी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहन भागवत हे मशिदींना भेट देऊन भाजप किंवा त्यांचे सरकार विशिष्ट धर्माच्या विरोधात नसून कट्टरतावादाच्या विरोधात असल्याचे सांगण्याचा प्रयत्न करत आहेत. गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये त्यांनी ब्रुनेईच्या भेटीदरम्यान राजधानी बंदर सेरी बेगवान येथील ऐतिहासिक सुलतान उमर अली सैफुद्दीन मशिदीला भेट दिली होती. त्याआधी त्यांनी 2023 मध्ये इजिप्तमधील अल-हकीम मशिदीलाही भेट दिली होती. भागवत यांनी 'इंडिया गेट' जवळील कस्तुरबा गांधी मार्गावर असलेल्या मशिदीलाही भेट देऊन दिल्लीतील सर्व इमामांची भेट घेतली होती. मोदी यांनी यापूर्वी मतपेढीचे राजकारण करणाऱ्यांनी पसमंदा मुस्लिमांना उद्ध्वस्त केले गेले आहे, अशी टीका करत अतिशय गरीब असणाऱ्या या समाजाचे प्रश्न सोडवा, असे आवाहन केले होते. त्यांच्या आवाहनावरून भाजपने आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या पसमांदा मुस्लिम समाजात मोठ्या प्रमाणावर जनसंपर्क अभियान सुरू केले आहे.
दाऊदी बोहरा समाजातील मुस्लिमांनाही जोडण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. मोदी फेब्रुवारी 2023 मध्ये मुंबईतील बोहरा मुस्लिम समाजाच्या कार्यक्रमात सहभागी झाले होते. त्याच समाजाच्या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी ते २०१८ मध्ये इंदूरलाही गेले होते. गुजरात आणि महाराष्ट्रात बोहरा समाजाची लोकसंख्या जास्त आहे. याशिवाय मोदी यांनी नुकतेच उदारमतवादी आणि समतावादी समजल्या जाणाऱ्या सुफी पंथाच्या कार्यक्रमातही भाग घेतला होता. या कार्यक्रमात बोलताना त्यांनी संघासाठी कोणीही अनोळखी नाही, मुस्लिम आमच्यापेक्षा वेगळे नाहीत, ते आमचेही आहेत, असे म्हटले. हा देश जितका आपला आहे, तितकाच त्यांचा आहे. सर्व भारतीयांचा डीएनए सारखाच आहे, उपासना पद्धतीच्या आधारे ते वेगळे करता येत नाहीत, हे त्यांचे उद्गार संघाच्या बदललेल्या मानसिकतेचे लक्षण आहे. देशातील सुमारे शंभर लोकसभा मतदारसंघांमधील मुस्लिम मतदारांची उपस्थिती प्रभावी आहे. पश्चिम बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश आणि केरळमधील अनेक जागांवर मुस्लिम मतदार निर्णायक ठरत आहेत. उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थानसह १८ राज्यांमध्ये पसमांदा मुस्लिमांची लोकसंख्या मोठी आहे, तर देशातील एकूण मुस्लिम लोकसंख्येपैकी दहा टक्के दाऊदी बोहरा समाज आहे. या पार्श्वभूमीवर भाजपच्या 'सौगात-ए-मोदी' या योजनेकडे पहावे लागेल. भाजपला या रणनीतीद्वारे मुस्लिम समाजात शिरकाव करायचा असून विरोधी पक्षाचे आपल्यावरील आरोप चुकीचे आहेत, हे सिद्ध करायचे आहे. बिहार, पश्चिम बंगाल तसेच उत्तर प्रदेशमधील विधानसभा निवडणुकीत या रणनीतीचा फायदा होऊ शकतो, असा विश्वास भाजपला आहे.
मुस्लिम समाजामध्ये भाजपबद्दल असलेला ऐतिहासिक अविश्वास आणि त्याची हिंदुत्ववादी प्रतिमा ही रणनीती कमकुवत करू शकते. रमजान आणि ईदच्या मुहूर्तावर सुरू करण्यात आलेली ही योजना राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरली आहे. भाजप याला समरसता आणि विकासाचा संदेश म्हणत आहे, तर विरोधक निवडणुकीची रणनीती म्हणत आहेत. बिहारच्या निवडणुका जवळ आल्या आहेत. उत्तर प्रदेशमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडणार आहेत.
पुढच्या वर्षी पश्चिम बंगालमध्येही विधानसभेच्या निवडणुका पार पडत आहेत. या तीनही राज्यांमध्ये मुस्लिमांची संख्या जास्त आहे. बिहार आणि उत्तर प्रदेशमध्ये मुस्लिम मतदारांची संख्या १८ टक्के असून पश्चिम बंगालमध्ये ३१ टक्के आहे. त्यामुळे मुस्लिमांना आपलेसे करण्यासाठी ही खेळी खेळण्यात आल्याचा दावा केला जात आहे. भाजप मात्र हा आक्षेप फेटाळून लावताना पंतप्रधान मोदींच्या अकरा वर्षांच्या कार्यकाळात 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास, सबका प्रयास' या सूत्रावर कारभार सुरू आहे; भाजपने केवळ मुस्लिमांना भेट दिलेली नाही, तर सर्वच गरीब घटकांना मदत केली आहे, असा युक्तिवाद केला आहे. भाजपने 'सौगात-ए-मोदी'ची सुरुवात दिल्लीतून केली असली, तरी त्याची सर्वाधिक चर्चा बिहारमध्ये होत आहे. कारण बिहारमध्ये याच वर्षी विधानसभा निवडणुका होणार असून मुस्लिम मतदारांना आकर्षित करण्यासाठी भाजपने ही खेळी केल्याचा आरोप विरोधक करत आहेत. बिहारच्या १८ टक्के मुस्लिम लोकसंख्येपैकी आठ टक्के मतदारांनी २०१५ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये 'एनडीए'ला मतदान केले, तर राष्ट्रीय जनता दल आणि संयुक्त जनता दलाला ७८ टक्के मुस्लिम मते मिळाली. २०१९ पासून समीकरणे बदलली. काँग्रेस आणि राष्ट्रीय जनता दलाची युती झाल्यानंतर २०१९ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडीला मुस्लिमांची सहा टक्के तर राष्ट्रीय जनता दल आणि काँग्रेसच्या युतीला ७७ टक्के मुस्लिम मते मिळाली. २०२० च्या विधानसभा निवडणुकीमध्ये 'एनडीए'ला पाच टक्के तर काँग्रेस-राष्ट्रीय जनता दल युतीला ७६ टक्के मुस्लिम मते मिळाली होती. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये 'एनडीए'ला बारा टक्के मुस्लिम मते मिळाली होती, तर काँग्रेस-राष्ट्रीय जनता दल युतीला ८७ टक्के मुस्लिम मते मिळाली होती. आता 'सौगात ए-मोदी' या भेटीमुळे मुस्लिम मतदार भाजपकडे झुकणार का आणि मुस्लिमबहुल जागांवरही कमळ फुलणार का, हा प्रश्न आहे. गेल्या वर्षी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांना मुस्लिमांमधील मागासांना आपलेसे करण्यासाठी पसमंदा समाजाच्या समस्या जाणून त्यांचे प्रश्न सोडवण्यास सांगितले होते. आता त्यापुढचे पाऊल टाकण्यात आले आहे. उत्तर प्रदेशमधील स्थानिक स्वराज्य संस्था आणि नंतर होणारी विधानसभा निवडणूक तसेच बिहार आणि पश्चिम बंगाल विधानसभेची आगामी निवडणूक आणि तिथल्या मुस्लिमांची संख्या विचारात घेऊन 'सौगात ए मोदी' हा उपक्रम राबवण्यात सुरुवात झाली आहे. या मोहिमेद्वारे भाजप नेमके काय साधतो, हे आता पहायचे.

### खेचाखेची
## दोन पंखे

**सुरेश:** दोन पंखे द्या. एक लेडीज आणि दुसरा जेन्ट्स...

.
.
.

**दुकानदार:** अहो महाशय, पंख्यांमध्ये लेडीज, जेन्ट्स असे काही प्रकार नसतात.

.
.
.

**सुरेश:** असतात तर... एक उषा आणि दुसरा बजाज...!

### वेगळं काही


कोलंबियामधलं एक चर्च मीठाच्या खाणीमध्ये जमिनीच्या २२० किलोमीटर आत बांधण्यात आलं आहे. पाचव्या शतकात हे चर्च बांधण्यात आलं होतं असं म्हटलं जातं. चर्चकडे जाण्याचा मार्ग या खाणीतून जातो. कधी काय होईल याचा नेम नसतो. त्यामुळे या मार्गाला मृत्यूचा सापळा असंही म्हटलं जातं. या चर्चमध्ये फक्त रविवारी प्रार्थना केली जाते. या प्रार्थनेसाठी तीन ते चार हजार लोक उपस्थित असतात. चर्चमध्ये मीठाच्या मूर्ती तयार करण्यात आल्या आहेत. चर्चच्या आत एलईडी दिव्यांची खूपच सुंदर रोषणाई करण्यात आली आहे. चर्चचा मार्ग धोकादायक असला तरी इथे भक्तमंडळी मोठ्या संख्येने येत असतात.

### संगोपन
## सुट्टीचा सदुपयोग करण्यासाठी...

दहावी-बारावीनंतर खालच्या वर्गांच्या परीक्षाही संपतात आणि बच्चेकंपनी हुंदडायला मोकळी होते. यंदा थोड्या उशिरानं सुरू होणाऱ्या सुट्टीचा सदुपयोग करणं गरजेचं असतं. त्यासाठी उपयुक्त ठरतील अशा टिप्स...



❉ उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये मुलांना पोहायला शिकवावं. बऱ्याच मुलांना पाण्याची भीती असते. पालक सोबत असतील तर ही भीती दूर होते आणि मूल लवकर पोहण्यास शिकतं. मुलांना स्विमिंग क्लासला घातलं असेल तर शक्यतो पालकांनी हजर रहावं. ❉ मुलांना मातीत खेळायला आवडतं. या आवडीतून काही सृजनशील छंद जोपासायलाही शिकवता येईल. यासाठी सर्वोत्तम पर्याय म्हणजे बागकाम. रोपट्यांची निगा कशी राखावी, एका बीपासून झाडापर्यंतचा प्रवास कसा होतो हे पाहण्याची ही उत्तम संधी असते. ❉ या दिवसात अनेक वृत्तपत्रांमध्ये माहिती देणारी सदरं सुरू होतात. कात्रणांच्या रुपात त्यांचा संग्रह करण्यास मुलांना शिकवावं. कात्रणांची छानशी चिकटवही करण्यास प्रोत्साहन द्यावं. ❉ मुलांना स्वयंपाकघरात लुडबूड करण्याची सवय असते. त्यामुळे त्यांच्यावर छोट्या-छोट्या कामांची जबाबदारी सोपवावी. यामुळे ते जबाबदार बनतात.




### राशीभविष्य

- **मेष** : वाढत्या खर्चावरुन घरात वाद होतील. नोकरीत वरिष्ठ अडचणी निर्माण करतील. मित्रांची मदत होईल.
- **वृषभ** : आर्थिक आवक साधारण राहील. वाट पहात असलेली पुन्हा दूर जाईल. व्यवहारात सावध रहावं.
- **मिथुन** : गोड बोलणाऱ्यांपासून दूर रहायला हवं. नैराश्य वाढीस लागेल. दुखापतीपासून सावध असावं.
- **कर्क** : आवडत्या माणसांशी संवाद होईल. आर्थिक अडचण दूर होईल. प्रयत्नास यश मिळेल.
- **सिंह** : मित्रांना उसने पैसे देण्याचे टाळावं. कोणावरही अवलंबून राहू नका. धार्मिक कार्यात मन रमवाल.
- **कन्या** : कार्यक्षेत्रात कामाचं महत्त्व वाढेल. ज्येष्ठांचे आशीर्वाद कामी येतील. चीजवस्तू सांभाळाव्या.
- **तूळ** : ताण वाढवणाऱ्या गोष्टी घडतील. मध्यस्थी नुकसानकारक ठरेल. वाढत्या खर्चावर नियंत्रण ठेवावं.
- **वृश्चिक** : उद्योगवाढीच्या नव्या कल्पना यशस्वी होतील. पैसा, प्रसिद्धी मिळेल. प्रतिस्पर्ध्यांवर मात कराल.
- **धनु** : क्रोधावर नियंत्रण ठेवणं आवश्यक. मानसिक आरोग्य जपणं जरुरीचं राहील. मित्रांना दुखवू नका.
- **मकर** : इतरांच्या कोडकौतुकाने भारावून जाल. लेखकांना उत्कर्षाचा दिवस. प्रवास कार्यसाधक होतील.
- **कुंभ** : बोलताना भान ठेवायला हवं. घरात गैरसमजुतीचे वातावरण राहील. काही अपेक्षित लाभ होतील.
- **मीन** : योग्य सहकार्य आणि मार्गदर्शन मिळेल. खर्चावर बंधन घालावं. आत्मविश्वासात वाढ होणार आहे.

### ब्युटी टिप्स
## पाय होतील स्वच्छ

टॅनिंग आणि इतर कारणांमुळे त्वचा काळपट पडते आणि ती पुन्हा पूर्ववत करण्यासाठी बरेच कष्ट पडतात. पण काही घरगुती उपायांमुळे आपण त्वचा पुन्हा उजळवू शकतो. तळपाय, गुडघे, घोटे, टाचा या पायांच्या काळ्या पडणाऱ्या भागांची स्वच्छता करण्यासाठी कामी येणारा एक घटक म्हणजे बेकिंग सोडा. क्षारीय गुणधर्मांमुळे त्वचेच्या स्वच्छतेसाठी याचा मोलाचा उपयोग होतो. तळपायांवर बेकिंग सोड्याने स्क्रब केल्यास अथवा बेकिंग सोड्याची पेस्ट तळपायावर लावल्यास टॅनिंग, पादत्राणांचे व्रण, काळसर डाग निघून जातात आणि त्वचा मऊमुलायम होते. बेकिंग सोड्यामुळे मृत त्वचा दूर होते. सहाजिकच त्वचेतील अशुद्ध तत्त्वं नाहिशी झाल्यामुळे त्वचा कोमल आणि तेजस्वी होते. बेकिंग सोडा, ओटमील आणि खोबरेल तेल ही सामग्री सम प्रमाणात एकत्र करून तयार होणारी पेस्ट भेगाळलेल्या टाचांवर लावा. दहा मिनिटांनंतर ब्रशने स्क्रब करून पाय धुवा. या उपायाने टाचांच्या भेगा कमी होतात, टाचा मऊ-मुलायम आणि गुलाबीसर दिसतात. या लेपाने पायांची दुर्गंधीही नाहिशी होते.

### ८ एप्रिल — दिनविशेष

- २०१३ : ब्रिटनच्या माजी पंतप्रधान मार्गारेट थॅचर यांचे निधन.
- २०१६ : ब्रुसेल्स हल्लाप्रकरणी काही संशयितांना अटक.
- २०१७ : भारताने बांगलादेशला ४.५ अब्ज डॉलरचे कर्ज दिले. दोन्ही देशांदरम्यान २२ करारांवर सह्या.
- २०१८ : भारताने राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या चौथ्या दिवशी एकूण तीन सुवर्णपदके मिळवली. नेमबाज मनू भाकर आणि वेटलिफ्टर पूनम यादवची सुवर्णपदकाला गवसणी.

### महत्त्वाचे काही
## शिका कराटे

हातात कोणतंही शस्त्र नसता कोणी हल्ला केला तर स्वसंरक्षण करता यावं म्हणून अनेक पालक आपल्या पाल्यांना कराटेचा क्लास लावतात. 'कराटे'चा अर्थ रिकामे हात. हातात कोणतंही शस्त्र न घेता लढाई करण्याच्या या पद्धतीला 'कराटे' म्हणतात. या खेळाची सुरुवात सतराव्या शतकात जपानमध्ये ओकिनावा इथे झाली. कराटेचे चार प्रकार जपानमध्ये प्रचलित आहेत. शोटोकान, वाडो-यू, गोजू-यू व शिटो-यू हे ते प्रकार होत. १९१६ च्या सुमारास फुनाकोशी गिजू यांनी जपानमध्ये कराटेचा प्रसार केला. सध्या जगभर कराटेचा प्रसार झाला आहे. या विद्येत प्राविण्य मिळवल्यावर खेळाडूला 'ब्लॅक बेल्ट' ही विशिष्ट पदवी प्रदान करण्यात येते. त्या आधीच्या पायऱ्यांना 'व्हाईट बेल्ट', 'यलो बेल्ट' अशी विविध संबोधनं आहेत. मध्यंतरी काही आशियाई देशांनी फक्त पायांचा वापर करून कराटेमधील एक नवीन शाखा उदयास आणली. या शाखेला 'तायक्वांदो' असं म्हटलं जातं. भारतातही हा प्रकार झपाट्याने लोकप्रिय होत आहे. कोणत्याही वयोगटातील व्यक्ती या खेळात भाग घेऊ शकते. या खेळामुळे शारीरिक आणि मानसिक संतुलन राखलं जातं.

### पंचांग

मंगळवार, ८ एप्रिल २०२५
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
चैत्र शु.११, नक्षत्र : आश्लेषा
चंद्रराशी : कर्क, योग : शूल
सूर्योदय: ६.२९, सूर्यास्त: ६.५२

### फॉरवर्डस

शेवटी अंतीम सत्य हेच आहे... ते सांगताना शायर लिहितो...
पतंग सी है जिंदगी कहाँ तक जाएगी...
रात हो या उम्र, एक ना एक दिन कट ही जाएगी...!

### आरोग्यमंत्र
## बहुगुणकारी...

कारल्यातील गुणकारी तत्त्वांविषयी जाणून घेताना आपल्हीही काही मुद्दे नोंद घ्यावी असे आहेत. आज त्याविषयी माहिती घेऊ...



❉ अंगावर सूज असेल तर सकाळी कारल्याचा रस घेतल्यास फायदेशीर ठरतं. ❉ दमा, सर्दी, खोकला अशा श्वसनमार्गाच्या तक्रारी असतील तर कारल्याचा रस आणि तुळशीच्या पानांचा रस एकत्र करून त्यात मध मिसळून महिनाभर घेतल्यास रोगप्रतिकार शक्ती वाढून हे विकार दूर होतात. ❉ जंत-कृमी झाले असतील तर कारल्यांच्या पानांचा कपभर रस नियमितपणे आठ दिवस घ्यावा. यामुळे सर्व कृमी शौचावाटे पडून जातात. ❉ आम्लपित्ताचा त्रास होत असेल कारलं नियमित सेवन करावं. ❉ कारल्यांच्या पानांचा तीन चमचे रस ग्लासभर ताकातून महिनाभर रोज दुपारी घेतल्यास मूळव्याधीचा त्रास कमी होतो. या सोबत कारल्याची मुळं स्वच्छ धुवून, वाटून त्याचा कोंबावर लेप लावल्यास मूळव्याधीचे कोंब नाहीशी होतात. ❉ खरुज, खाज, नायटे, चट्टे अशा त्वचाविकारांवर कारल्याच्या कपभर रसात चमचाभर लिंबूरस घालून तो उपाशीपोटी सावकाश प्यावा. नियमितपणे असा रस घेतल्यानं रक्तदोष कमी होऊन रक्त शुद्ध होतं आणि पर्यायानं त्वचेचे विकार कमी होतात. ❉ कोवळ्या कारल्यांचे बारीक काप करून ते उन्हामध्ये सुकवून त्याचं बारीक चूर्ण करावं आणि हे चूर्ण मधुमेही रुग्णांनी दररोज सकाळ, संध्याकाळ ५-५ ग्रॅम (अर्धा चमचा) या प्रमाणात नियमितपणे घ्यावं. यामुळे रक्तातील साखर नियंत्रणात राहते.

### वाचा तर खरं

❉ मानसिक किंवा शारीरिक ताणामुळे केस गळू शकतात. तसंच अतिमेहनतीमुळेही केसांची मूळं कमकुवत होऊ शकतात. ❉ प्रदूषित हवेचा परिणाम केसांवर होतो. वातावरणातली धूळ, घाण साचून राहिल्याने केस गळू लागतात. ❉ जंक फूडचं अतिसेवन केस गळतीला कारणीभूत ठरू शकतं. कारण अशा पदार्थांमधून केसांना गरजेचे असलेले पोषक घटक मिळत नाहीत आणि केस गळू लागतात. ❉ अपुरी झोप हे सुद्धा केस गळण्याचं महत्त्वाचं कारण असू शकतं. तरुण मंडळी रात्री जागरण करतात. याचा परिणाम आरोग्यावर होतो. (क्रमशः)

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## At a Glance

### एमआयडीसीला प्रक्रियेचे सांडपाणी

**पिंपरी-चिंचवड :** पिंपरी-चिंचवड शहरातील एमआयडीसीतील उद्योगांना प्रक्रिया केलेले सांडपाणी देण्यात येणार आहे. त्यासाठी स्वतंत्र जलवाहिनी टाकण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. प्रक्रिया केलेल्या पाण्याचा वापर कसा होतो, किती पाणी नदीत सोडले जाते, याची माहिती संकलित ठेवण्यासाठी महापालिकेने सॉफ्टवेअर तयार केले आहे. शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने पाण्याची मागणीही वाढत आहे. शहरासाठी उपलब्ध होणारे पाणी भविष्यात पुरणार नाही. त्यामुळे पाण्याचे पर्यायी स्रोत निर्माण करण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून प्रयत्न केले जात आहेत.

### ११ कोटी चे मेफेड्रोन ड्रग्स जप्त

**मुंबई :** मुंबईमधील अंमली पदार्थांची तस्करी रोखण्याचे आव्हान पोलिसांसमोर दिवसेंदिवस वाढत आहे. मुंबई पोलिसांनी देखील हे आव्हान स्वीकारलं असून, तशी कंबर कसली आहे. असे असले, तरी मुंबईत अमली पदार्थांची तस्करी सुरूच आहे. वसईमध्ये गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत तब्बल ११ कोटी ५८ लाख रुपयांचं मेफेड्रोन ड्रग्स जप्त केलं आहे. नायजेरीयन नागरिकाकडून हे ड्रग्स जप्त केलं असून त्यानं हिंदी सिरिअल, चित्रपटांमध्ये आणि काही साऊथ चित्रपटांमध्ये छोटीशी खलनायकाच्या भूमिका केल्याची माहिती समोर आली आहे.

# ‘जैन मराठी विश्वकोशाची’ निर्मिती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :** जैन अल्पसंख्याक विकास आर्थिक महामंडळ, मुंबई यांच्यावतीने ‘जैन मराठी विश्वकोशाची’ निर्मिती करण्यात येणार आहे. या विश्वकोशात गेल्या पाच हजार वषपिक्षा अधिक काळाच्या पुरातत्त्वीय ते अर्वाचिन इतिहासाचा आलेख दिला जाणार असून या विश्वकोशाद्वारे जैन धर्माच्या अभ्यासकांपासून सामान्य वाचकांना जैन धर्माची तटस्थ माहिती उपलब्ध होणार आहे. जैन धर्माच्या वैश्विक दृष्टीचे सार या कोशात सामावले असून या निमित्ताने भारतीय समाज संस्कृतीचा इतिहास वाचकांसमोर उलगडला जाणार आहे, अशी माहिती जैन अल्पसंख्याक विकास आर्थिक महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

अतिप्राचिन परंपरा लाभलेला जैन धर्म समण संस्कृतीच्या स्थापनेतून सुरु झाला. समण म्हणजे सर्व जीवांकडे समभावाने पाहत अहिंसा व्रत धारण करून नित्यनैमित्तीक जीवनचर्या अवलंबण्याचा मार्ग. पहिले तीर्थंकर ऋषभनाथ यांनी मानवी सभ्यतेच्या विकासाचा पाया रचला. ही परंपरा भगवान महावीर यांनी कळसाला पोहोचवत अनेकांतवादासारख्या वैश्विक सिद्धांताला जन्म दिला. ही जैन तत्त्वज्ञानाची परंपरा आजही आचरणात येत आहे. मौर्य सम्राट संप्रतिने आपल्या सत्ता काळात महाराष्ट्रात स्थिरावलेल्या जैन साधूमुनींच्या विचारांना उत्तेजन दिले. तसेच सातवाहन राजांनीही जैन धर्मास राजाश्रय दिला. यातूनच मराठी भाषा आणि संस्कृतीमध्ये जैन धर्माचे मोठे योगदान राहिले आहे.

महाराष्ट्राची मनोभूमिका तयार होण्यास जैन धर्माचा मोठा हातभार आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त होण्यास सर्वाधिक उपयुक्त ठरलेल्या गाथा सप्तशती या हाल सातवाहनाने संपादित केलेल्या गाथांमध्ये पादलिप्ताचार्यांच्या अनेक गाथांचा समावेश आहे. जैन धर्माचे प्राचिन वाङ्मय प्राकृत भाषेत असून अर्धमागधी, मागधी, शौर्यसेनी, माहाराष्ट्री, तेलगु, तामिळ, कन्नड इ. प्रादेशिक भाषांमध्ये विपुल प्रमाणात सापडते. जैनांनी संस्कृत भाषेचाही उपयोग तत्त्वज्ञान मांडणीसाठी वापरल्याचे दिसून येते.

● जैन धर्माची वैश्विक दृष्टी उलगडणारा ‘जैन मराठी विश्वकोश’ हा बृहत प्रकल्प असून यात आकारविल्हेप्रमाणे जैन धर्मातील २४ तीर्थंकर, १२ चक्रवर्ती, ९ बलभद्र, ६३ शलाकापुरुष, ९ नारायण, प्रतिनारायण तसेच जैन प्राचिन ते अर्वाचिन साहित्य, साहित्यकार, तत्त्वज्ञ, गणधर, बलदेव, पुराणकथा इत्यादींची माहिती समाविष्ट करण्यात येणार आहे. या कोशाच्या निमित्ताने भारतीय समाज संस्कृतीचा इतिहासही वाचकांसमोर उलगडला जाणार आहे. या विश्वकोशातील माहिती तज्ज्ञ संशोधकांकडून खात्री केल्यानंतरच लिखित स्वरुपात प्रकाशनासाठी निवडण्यात येणार आहे. ज्यायोगे जैन मराठी विश्वकोशाची विश्वासार्हता जपली जाईल.

# भटक्या आदिवासींना हॅपी फॅमिली किट्सचे वाटप



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

सामाजिक

**पुणे :** रोटरी क्लब ऑफ खडकी तर्फे आळंदी येथील हनुमान वाडी,आम्बेद्रा,नवी वाडी व डोळवाडी आणि पानशेत येथील रुळेगाव येथील भटक्या आदिवासींना ३००“हॅपी फॅमिली कीट ” “सुखी परिवार सुरक्षित परिवार”चे मोफत वाटप आज रोटरी जिल्हा ३१३१ प्रकल्प अंतर्गत रोटरी जिल्हा ३१३१चे शीतल शहा व रोटरी क्लब खडकीच्या अध्यक्षा सीमा बेडेकर यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी या प्रकल्पाचे सीएसआर पार्टनर फोसेको इंडियाचे प्रतिनिधी लिनस क्रिस्टी, असुंता क्रिस्टी, सचिव दिलीप रणदिवे, मोठे देणगीदार माजी अध्यक्ष सेवानिवृत्त महेश, शालिनी मखीजा, रोटरी क्लब ऑफ खडकी आणि रोटरी पुणे ईस्टचे इतर सदस्य उपस्थित होते.

सीमा बेडेकर म्हणाल्या “या हॅपी फॅमिली किटमध्ये टारपॉलिन, धूररहित चुली, आंघोळीसाठी आणि कपड्यांच्या स्वच्छतेसाठी साबण , पाण्याची बाटली, सॅनिटरी पॅड, प्रथमोपचार किट, बादली इत्यादींचा समावेश आहे, या मुळे आदिवासींचे जीवन सुधारण्यासाठी उपयुक्त ठरेल. रोटरीने फोसेको इंडियाच्या सीएसआर मदतीबद्दल तसेच साई सेवा भक्तांनी कार्यक्रमाचे आयोजन आणि सर्वांसाठी अल्पोपहार आयोजित करण्यास मदत केल्याबद्दल आभार मानले

शितल शहा म्हणाले “ हा हॅपी फॅमिली किट प्रकल्प २०२० पासून गरजूंचे जीवन सुधारण्यासाठी सुरू करण्यात आला.आत्तपर्यंत पुणे आणि रायगडच्या आसपासच्या २००० भटक्या आदिवासीं पर्यंत हि मदत पोहोचली आहे.प्रकल्प राष्ट्रीय स्तरावर नेण्याचा संकल्प आहे.

असुंता क्रिस्टी म्हणाल्या “आधुनिक चुलीचा वापर केल्याने आदिवासींच्या आरोग्य चांगले राहील व अप्रत्यक्षपणे पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होईल.

# मुस्लीम RSS च्या शाखेत येऊ शकतात : भागवत



**वाराणसी :** मुस्लीमांच्या RSS प्रवेशावरून सरसंघचालक मोहन भागवत यांनी मोठे वक्तव्य केले आहे. भागवत यांच्या या वक्तव्यावरून राजकारण आणि समाजकारणात खळबळ उडाली आहे. मोहन भागवत सध्या वाराणसी दौऱ्यावर आहेत. रविवारी त्यांनी शहरातील माळढहिया येथील लाजपतनगर पार्कमध्ये RSS शाखेत उपस्थिती लावली. यावेळी भागवत यांनी हे वक्तव्य केले. संघस्वयंसेवकांशी संवाद असताना एका ज्येष्ठ स्वयंसेवकाने मुस्लीम शेजाऱ्यांना संघात आणू शकतो का? असा सवाल केला. त्यावर जर मुस्लीमांनी स्वतःला औरंगजेबाचे वंशज मानले नाही आणि त्यांनी भारतमातेचा आदर केला तर मुस्लीमदेखील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेत सहभागी होऊ शकतात, असे वक्तव्य भागवत यांनी केले आहे. भागवत म्हणाले की, जो भारतमाता की जय असा घोष करतो, जो भगव्या ध्वजाचा आदर करतो असा कोणताही व्यक्ती RSS च्या शाखेत सहभागी होऊ शकतो. शाखेत जात, धर्म किंवा भाषेवरून भेदभाव केला जात नाही.

# वक्फ दुरुस्ती विरोधात याचिका दाखल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**नवी दिल्ली :** वक्फ दुरुस्ती कायद्याच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात डझनभराहून अधिक याचिका दाखल झाल्या आहेत. या याचिकांवर तातडीने सुनावणी घेण्याची विनंती वरिष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी सरन्यायाधीशांच्या खंडपीठासमोर केली. या सर्व याचिकांवर सुनावणी करण्यासाठी प्रकरण सूचीबद्ध केले जाईल, असे सरन्यायाधीश संजीव खन्ना सोमवारी म्हणाले.

मोहम्मद जावेद (काँग्रेस खासदार) (प्रथम याचिका), खासदार असदुद्दीन ओवेसी (एआयएमआयएम नेते), असोसिएशन फॉर प्रोटेक्शन ऑफ सिव्हिल राइट्स (एनजीओ), अमानतुल्ला खान (आप नेते), मौलाना अर्शद मदनी (जमिअत उलेमा-ए-हिंद), समस्थ केरळ जमियातुल उलेमा, तय्यब खान सलमान (कायद्याचे विद्यार्थी), ए. राजा (द्रमुकचे खासदार), इम्रान प्रतापगढ़ी (काँग्रेस खासदार), ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ बोर्ड, एसडीपीआय, आययूएमएल यांनी वक्फ कायद्याविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या आहेत.

मणिपूरचे आमदार शेख नुरुल हसन यांनीही सांगितले की ते वक्फ सुधारणा कायदा २०२५ ला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देणार आहेत.

दरम्यान, ५ एप्रिल रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी वक्फ दुरुस्ती विधेयकाला मंजुरी दिल्याने त्याचे कायद्यात रुपांतर झाले आहे.

“प्रकरणाचा उल्लेख करण्यासाठी एक प्रणाली उपलब्ध करून देण्यात आली आहे. तुम्ही पत्र किंवा मेल पाठवून प्रकरणाचा तात्काळ सुनावणीसाठी उल्लेख करण्याची विनंती करू शकता. सिब्बल म्हणाले की त्यांनी तसे केले आहे. यावर सरन्यायाधीशांनी सांगितले की, तात्काळ सुनावणीचा विचार केला जाईल, प्रकरण सुनावणीसाठी सूचीबद्ध केले जाईल.
" **— सरन्यायाधीश संजीव खन्ना**

## कारवाईला दिरंगाई कशाला : वडेट्टीवार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मंगेशकर रुग्णालय प्रकरणी चौकशी समितीचा प्राथमिक अहवाल अखेर समोर आला आहे. आम्ही पहिल्या दिवसापासून सातत्याने मागणी करत आलो आहोत या प्रकरणी हलगर्जीपणा करणाऱ्या डॉक्टरांवर गुन्हा दाखल करा. दीनानाथ मंगेशकर रुग्णालय हे धर्मदाय रुग्णालय असूनही रुग्णांकडून पैसे घेऊनच उपचार केले जातात. ही कोणती सेवा? हा कोणता धर्म? डॉक्टरांनी राजीनामे देत जबाबदारी झटकली, आणि आता पळवाट शोधण्याचे काम सुरु आहे! सरकार अजून तरी नक्की कशाची वाट बघत आहे? पुन्हा काही पळवाटा शोधायच्या आहेत की सरळ सरळ क्लिनचीट द्यायची आहे? या प्रकरणातील डॉक्टर असो किंवा रुग्णालय प्रशासन जे कोणी जबाबदार आहेत, त्यांच्यावर गुन्हा दाखल झालाच पाहिजे! असं विजय वडेट्टीवार यांनी म्हटलं आहे.

# परशुराम ट्रस्टचा विस्तार



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** येरवडा: वडगावशेरी मतदारसंघाचे विद्यमान आमदार बापूसाहेब पठारे यांच्या हस्ते नवीन कार्यालयाचे उद्घाटन, परशुराम ट्रस्टचे अध्यक्ष छोटे लाल, उपाध्यक्ष ओम प्रकाश त्रिवेदी, सचिव मिरतुंजय कुमार, संजीव रंजन- वरिष्ठ सदस्य आणि अशोक शर्मा, ज्योती रंजन, अरविंद सिंह, मनोज राय, अनिल शर्मा आणि अनेक पदाधिकारी उपस्थित होते. समाज कल्याण आणि सामुदायिक विकासात योगदान देण्यासाठी ओळखल्या जाणाऱ्या परशुराम ट्रस्टने वाघोली रोडवरील लोहेगाव येथे नवीन कार्यालयाचे उद्घाटन करून एक महत्त्वपूर्ण पाऊल पुढे टाकले आहे. भव्य उद्घाटन समारंभ बापूसाहेब पठारे यांनी उपस्थित राहून ट्रस्टच्या सार्वजनिक सेवेतील समर्पणाचे कौतुक केले.

कार्यक्रमादरम्यान, बापूसाहेब पठारे यांनी समाज मजबूत करण्यासाठी अशा संस्थांचे महत्त्व अधोरेखित केले आणि त्यांच्या चालू उपक्रमांना पाठिंबा देण्याचे आश्वासन दिले. हे नवीन कार्यालय शिक्षण कार्यक्रम, आरोग्य सेवा आणि सामुदायिक उन्नती प्रयत्नांसह विविध धर्मादाय उपक्रमांसाठी एक केंद्र म्हणून काम करेल.

या प्रसंगी बोलताना, श्री के. सी. राय आणि श्री ओम प्रकाश सिंह यांनी समुदाय आणि स्थानिक नेत्यांकडून मिळालेल्या प्रचंड पाठिंब्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. या विस्तारामुळे आम्हाला अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचता येईल आणि मोठा प्रभाव पाडता येईल. सेवा आणि सक्षमीकरणाचे आमचे ध्येय पुढे चालू ठेवण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत, असे ते म्हणाले.

उद्घाटनाला सुनील खांडवे, गोरख खांदवे, राजेंद्र खांदवे आणि बंडू खांदवे सामाजिक कार्यकर्ते आणि समुदाय सदस्य उपस्थित होते

पान १ वरून

## मोहोळांनी घेतला अनोखा अनुभव

यावेळी प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक कृष्णकुमार गोयल, जीतो अपेक्सचे अध्यक्ष विजय भंडारी, बडेकर ग्रुपचे अध्यक्ष प्रवीण बडेकर, जीतो अपेक्सचे संचालक राजेंद्र जैन ,उद्योजक राजेंद्र मुथा, चाकण इंडस्ट्रीजचे अध्यक्ष मोतीलाल सांकला, सनी सांकला, सुनील नहार, जे डब्ल्यु चे संचालक उमेश जोशी,एमआयटीचे उपकुलगुरू डॉ. रवी चिटणीस,पीव्हीजी कॉलेजचे प्राचार्य डॉ. मनोज तरांबळे,यो स्काईजचे संस्थापक संचालक स्क्वॉड्रन लीडर (नि.) अजय परांजपे आणि संचालिका कॅप्टन तृप्ती कर्नावट आदी मान्यवर उपस्थित होते.

## इंधनाचा भडका!

पेट्रोलवरील उत्पादन शुल्क प्रति लिटर १३ रुपये आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात प्रति लिटर १० रुपये गोळा केले जात आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत घट झाल्यामुळे पेट्रोल आणि डिझेलच्या किरकोळ किमतीत कपात अपेक्षित होती. परंतू सरकारने दर कमी करण्याऐवजी कर वाढविला आहे.

## बदलापूर प्रकरणी सरकारला दणका

राज्य सरकारने घेतली होती. त्यावर पोलिसांविरोधात गुन्हा दाखल करण्याचे आदेश या आधीच न्यायालयाने दिले होते. आता या निकालाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्याकरता राज्य सरकारनं केलेली मागणी फेटाळण्यात आली. बदलापूरच्या एका शाळेतील मुलींवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेचा एन्काऊंटर करण्यात आला होता. सुनावणीच्यावेळी त्याला नेण्यात येत असताना मुंब्र्याच्या परिसरात त्याचा एन्काऊंटर करण्यात आला. मात्र हा एन्काऊंटर बनावट असल्याचा अहवाल नंतर समोर आला. त्यानंतर या प्रकरणातील पोलिस अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पोलिस सहआयुक्त गुन्हे यांना या प्रकरणी एसआयटी स्थापन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. अक्षय शिंदेचे वडील अण्णा शिंदे यांनी पोलिसांवर कारवाईची मागणी करत याचिका दाखल केली होती. या घटनेबाबत दंडाधिकारी कोर्टानं पोलिसांच्या कारवाईवर ठपका ठेवला होता. यावर विरोधकांनीही राज्य सरकारवर टीकेची झोड उडवली होती.

## सुधीर मुनगंटीवारांना खडेबोल

स्वतःच्या मोठेपणासाठी रडू नका" अशा शब्दात शोभा फडणवीस यांनी खडे बोल सुनावले आहे. मात्र हे बोलत असताना त्यांचा रोख नेमका कुणाकडे होता हे जारी त्यांनी स्पष्ट केलं नसलं तरी हा टोला भाजपचे माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्याकडेच असल्याची चर्चा सध्या राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

# रावसाहेब दानवेंची खरमरीत टीका



**मुंबई :** बाळासाहेब ठाकरेंची शिवसेना कुठे अन् उद्धव ठाकरेंचा पक्ष कुठे? हा पक्ष पुढील विधानसभा निवडणुकीत दिसणार नाही, अशी टीका भाजपाचे नेते माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी भाजपा स्थापनादिनाच्या आपल्या भाषणातून केली होती. यावर शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी रावसाहेब दानवे यांच्यावर पलटवार करत 2019 च्या लोकसभा निवडणुकीत युती असताना माझ्याविरोधात पैसे वाटणाऱ्यांनी आम्हाला शिकवू नये, अशा शब्दांत फटकारले.

वक्फ बोर्ड सुधारणा विधेयकाच्या विरोधात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या लोकसभा अन् राज्यसभेतील खासदारांनी मतदान केले. त्यानंतर संतापलेल्या भाजपाच्या राज्यातील नेत्यांनी उद्धव ठाकरे आणि त्यांच्या पक्षावर टीकेची झोड उठवली आहे. भाजपाच्या स्थापनादिनाच्या कार्यक्रमात रावसाहेब दानवे यांनी कार्यकर्त्यांना उद्देशून केलेल्या भाषणात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षावर तोफ डागली.

## पालिका आयुक्तांचा आत्महत्येचा प्रयत्न

**लातूर :** लातूर महापालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी शनिवारी (ता. ०५ एप्रिल) रात्री स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. गंभीर जखमी झालेल्या मनोहरे यांच्यावर लातूरमधील खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. पण, मनोहरे यांच्या आत्महत्येच्या प्रयत्नामागचे कारण अद्यापही स्पष्ट होऊ शकलेले नाही. मात्र, त्यांच्या नातेवाईकांनी केलेल्या दाव्यामुळे मोठी खळबळ उडाली आहे.

# ‘नवा शुक्रतारा’च्या १०० व्या कार्यक्रमाला रसिकांचा मोठा प्रतिसाद




**पुणे :** १९६३ साली शुक्रतारा हे गाणे लिहिले गेले असेल, त्या काळी आमचा जन्महीही झाला नव्हता, त्या काळची तरुण पिढी अरुण दातेंची भावगीते ऐकायची, त्यामध्ये रमायची. आम्ही तरुण वयात असताना त्या भावविश्वात आम्हीही रंगलो आता आमची मुले तारुण्यात येत असताना अरुण दाते यांच्या गीतांमधील गोडवा आजही कायम आहे. त्यामुळे अरुण दातेंमुळे तीन पिढ्या या भावगीतांच्या विश्वात रमल्या, अशा भावना खासदार मेधा कुलकर्णी यांनी व्यक्त केल्या. ‘शुक्रतारा’, ‘लाजून ते हसणे...’, ‘झोपाळ्या वाचून झुलायचे...’, ‘या जन्मावर...’ अशी कित्येक गाणी आजही रसिकांच्या मनावर गारुड घालत अरुण दाते यांच्या आठवणी जाग्या करतात, असेही त्यांनी नमूद केले.

स्व. अरुण दाते यांच्या सुमधुर गीतांच्या ‘नवा शुक्रतारा’ च्या १०० व्या कार्यक्रमानिमित्त प्रमुख पाहुण्या म्हणून मेधा कुलकर्णी उपस्थित होत्या, त्यावेळी त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. माणिक निर्मित, अतुल अरुण दाते प्रस्तुत आणि मॅजिस्टिक्स लँडमार्क्स यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला ‘नवा शुक्रतारा’ हा कार्यक्रम आज कोथरूड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे संपन्न झाला. अतुल अरुण दाते, मॅजिस्टिक्स लँडमार्क्सच्या प्रीती पानसे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. १०० व्या ‘नवा शुक्रतारा’ निमित्त आज गायक, संगीतकार मंदार आपटे यांचा विशेष सत्कार देखील करण्यात आला.

अरुण दाते मला मुलगी मानायचे. त्यांच्या आवाजात जेवढा गोडवा होता तेवढाच गोडवा त्यांच्या स्वभावातही होता. त्यांचे वागणे देखील खूप छान असायचे. आज नवा शुक्रताराचे प्रयोग पाहताना अरुण दाते यांच्या आवाजाची, गाण्याच्या गोडव्याची प्रचीती येते, असेही कुलकर्णी यांनी नमूद केले.

बाबांनी शुक्रताराचे तब्बल पावणे तीन हजार कार्यक्रम केले. ‘नवा शुक्रतारा’ हा त्यांच्या याच कार्यक्रमांपुढील १०० कार्यक्रमांचा भाग आहे असे मी मानतो. ‘नवा शुक्रतारा’चा पहिला प्रयोग पुण्यात झाला, १०० वा प्रयोगही पुण्यात होतोय आणि २०० वा प्रयोगही आपण पुण्यातच करू असा विश्वास यावेळी अतुल अरुण दाते यांनी व्यक्त केला.

**MICRO & SMALL ENTERPRISES FACILITATION COUNCIL,C.G.**
**(Estd. Under MSMED Act 2006)**
**Directorate of Industries, Chhattisgarh**
Udyog Bhawan, Ring Road, No. 1,
Telibandha, Raipur (C.G.)

**NOTICE FOR HEARING**

Supplier/Applicant
**M/s Bansal Industries,**
20 A, Second Floor, Shyam Plaza,
Bus Stand, Pandari Bus Stand,
Raipur (C.G.) 492004
Buyer/Non-Applicant :-
**M/s Sileaf Technologies Pvt. Ltd.,**
Adisa Icon (Old Prajcom) NDA Road,
Basement Bavdhan, Pune (M.H.) 411021

The applicant has supplied/provided material/services to Non-applicant whereas Non-applicant has not paid the balance amount of Rs. 1,43,686/-. The applicant has submitted application/reference under section 18(1) of the MSMED Act, 2006 before Micro and Small Enterprises Facilation Council, Chhattisgarh. The Case is fixed for 09-04-2025 at 11:00 am, Directorate of Industries, Udyog Bhawan, Ring Road No. 01, Telibandha, Raipur (C.G.) for hearing. The Non-applicant is hereby intimated to appear on said date for hearing along with neccesarry documents/reply . If Non-applicant fails to appear before council on said date for hearing, the council may pass ex-parte award/order for which the Non-applicant would be responsible himself.

**Assist. Director of Industries**
**MSEFC, Chhattisgarh**

# हज यात्रेपूर्वी मोठा निर्णय



## भारत-पाकिस्तानसह १४ देशांवर व्हिसा बंदी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सौदी अरेबिया :** इस्लामचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सौदी अरेबियाने भारत आणि पाकिस्तानसह जगातील एकूण १४ देशांच्या व्हिसावर तात्पुरती बंदी घातली आहे. सौदी अरेबिया सरकारने घातलेली ही तात्पुरती बंदी व्यवसाय आणि कुटुंब व्हिसासह उमराह व्हिसावरही लागू असेल. या निर्णयामुळे मोठी खळबळ उडाली आहे.

क्राउन प्रिन्स मोहम्मद बिन सलमान यांच्या नेतृत्वाखालील सौदी सरकारने इतर देशांतील लोकांना नोंदणीशिवाय हजमध्ये सहभागी होण्यापासून रोखण्यासाठी ही बंदी घातली आहे. तथापि, ही तात्पुरती बंदी सर्व देशांमध्ये जूनच्या मध्यापर्यंत म्हणजेच यावर्षी हज यात्रा पूर्ण होईपर्यंत लागू राहील. त्यानंतर व्हिसा कार्यक्रम पुन्हा नेहमीप्रमाणे लागू केला जाईल.

सौदी अरेबियाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, परदेशी लोक उमरा व्हिसासाठी १३ एप्रिलपर्यंत येऊ शकतात. १३ एप्रिलनंतर उमराह व्हिसा बंद होईल.

- सौदी अरेबियाचे क्राउन प्रिन्स मोहम्मद बिन सलमान यांनी गेल्या वर्षी हजारो लोकांचा मृत्यू लक्षात घेऊन यावर्षी व्हिसा बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे.
- गेल्या वर्षी हज यात्रेदरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत १,००० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला होता.
- मृत्युमुखी पडलेल्यांपैकी बहुतेक जण अनधिकृत हज यात्रेकरू होते. अशा परिस्थितीत यावर्षी नोंदणी नसलेल्या हज यात्रेकरूंना रोखण्यासाठी ही व्हिसा बंदी लागू करण्यात आली आहे.



> प्रवास नियम शिथिल करण्यासाठी ही तात्पुरती व्हिसा बंदी लागू करण्यात आली आहे. यामुळे हज यात्रेदरम्यान प्रवाशांची सुरक्षितता वाढेल आणि प्रवास अत्यंत आरामदायी होईल.
>
> — **सौदी अरेबिया** परराष्ट्र मंत्रालय

### व्हिसा बंदीमध्ये कोणते देश?

- हज यात्रा सुरळीत पार पडावी यासाठी सौदीचे क्राउन प्रिन्स मोहम्मद बिन सलमान यांनी १४ देशांसाठी व्हिसा नियम बदलले. सौदी अरेबियाने ज्या देशांवर व्हिसा बंदी घातली आहे त्यात भारत, पाकिस्तान, बांगलादेश, इजिप्त, इंडोनेशिया, नायजेरिया, इराक, जॉर्डन, अल्जेरिया, सुदान, इथिओपिया, ट्युनिशिया आणि येमेन यांचा समावेश आहे.

## रत्नागिरीत ब्राऊन शुगरसदृश पदार्थासह एकास अटक



**रत्नागिरी :** शहरातील जायस्तंभ येथे रविवारी दुपारी गस्त घालत असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पाथकाने ब्राऊन शुगरसदृश पदार्थ व दुचाकीसह एकाला ७७ हजार ५०० रुपयांच्या मुद्देमालासह ताब्यात घेतले. अरमान आदिल अशरफ शेख (३०, रा. गोळाप सडा, रत्नागिरी) असे ताब्यात घेण्यात आलेल्या संशयिताचे नाव आहे. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पथक रामनवमी उत्सवाच्या अनुषंगाने शहरात पेट्रोलिंग करत होते. तेव्हा जयस्तंभ येथील खाना खजाना हॉटेलजवळ एक तरुण दुचाकीसह संशयित हालचाली करीत असताना आढळला. पथकाने त्याची चौकशी केली. त्याने समाधानकारक उत्तरे न दिल्याने झडती घेतली असता आदिल शेखकडे असलेल्या पिशवीमध्ये ब्राऊन शुगरसदृश्य अमली पदार्थाच्या १५ पुड्या व इतर साहित्य मिळून आले. त्याच्या विरोधात रत्नागिरी शहर पोलीस ठाणे येथे एन.डी.पी.एस. अॅक्ट ८ (क) २२ (ब) प्रमाणे दाखल करण्यात आला असून पुढील तपास रत्नागिरी शहर पोलिस ठाणे करीत आहे. ही कामगिरी पोलीस अधीक्षक धनंजय कुलकर्णी, अपर पोलिस अधीक्षक जयश्री गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नितीन ढेरे, सहा. पोलीस निरीक्षक प्रमोद वाघ, पोलीस हेड कॉन्स्टेबल शांताराम झोरे, बाळू पालकर, दीपराज पाटील व गणेश सावंत यांनी केलेली आहे.

## कांचा गचिबोवली जंगल वाद; सुनावणी पुढे ढकलली

**हैदराबाद :** तेलंगणा उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने सोमवारी कांचा गचिबोवली जंगलाच्या कथित विनाश प्रकरणाची सुनावणी सध्यासाठी पुढे ढकलली. तथापि, कार्यवाहक मुख्य न्यायाधीश सुजॉय पॉल आणि न्यायमूर्ती रेणुका यारा यांच्या खंडपीठाने राज्य, त्यांच्या महसूल, वन आणि पोलिस शाखांना पुढील सुनावणीच्या तारखेला २४ एप्रिलपर्यंत त्यांचे प्रतिवाद दाखल करण्याचे निर्देश दिले. टीजीआयआयसी द्वारे विकसित होणाऱ्या राज्याच्या महत्त्वाकांक्षी आयटी इन्फ्राहबसाठी कांचा गचिबोवलीच्या सर्वेक्षण क्रमांक २५ मधील ४०० एकर जमीन मोकळी करण्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणाऱ्या वाता फाउंडेशन , एचसीयू स्टुडंट्स युनियन आणि इतरांनी दाखल केलेल्या जनहित याचिकांवर खंडपीठ सुनावणी करत होते. मोठ्या प्रमाणात झालेल्या कथित विनाशाबद्दल माहिती मिळाल्यानंतर, सर्वोच्च न्यायालयाने राज्यावर नाराजी व्यक्त केली आणि संपूर्ण प्रक्रियेला स्थगिती दिली. ते १६ एप्रिल रोजी पुन्हा या प्रकरणाची सुनावणी करणार आहे आणि डीम्ड वनांशी व्यवहार करताना वन कायद्यांतर्गत निर्धारित प्रक्रिया आणि सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांचे पालन केले आहे का यावर राज्याकडून उत्तर मागितले आहे.

## पश्चिम बंगालसह देशात रामनवमी उत्साहात



**कोलकता :** पश्चिम बंगालसह देशभरात विविध राज्यांत रामनवमी उत्साहात साजरी करण्यात आली. राजधानी नवी दिल्ली, अहमदाबाद, भोपाळ, लखनौसह विविध महानगरांत रामनवमीचे कार्यक्रम आयोजित केले होते. पश्चिम बंगालमध्ये रामनवमीच्या उत्सवात अडथळा येऊ नये यासाठी सुरक्षा वाढविण्यात आली होती. कोलकात्यामध्ये साठहून अधिक रॅलीचे आयोजन करण्यात आले आणि सुव्यवस्थेसाठी चार ते पाच हजार पोलिस कर्मचारी तैनात करण्यात आले होते. राज्य भाजप अध्यक्ष सुकांत मजूमदार यांनी राज्य सरकारने उत्सवात कोणताही अडथळा आणू नये, अशी अपेक्षा व्यक्त केली होती. मिरवणुक अडविण्याचा कुठलाही प्रयत्न सहन केला जाणार नाही, असाही इशारा त्यांनी तृणमूल काँग्रेस सरकारला दिला होता. विरोधी पक्षनेते सुवेंदु अधिकारी यांनी नंदीग्राम मतदारसंघात राम मंदिराच्या भूमिपूजन सोहळ्यात सहभाग घेतला. तसेच हावडा आणि पूर्व मेदिनीपूर जिल्ह्यांमध्येही रामनवमीच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

## कामराने घेतली मुंबई उच्च न्यायालयात धाव

**मुंबई :** स्टॅण्डअप कॉमेडियन कुणाल कामरा आणि राजकीय वाद पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहेत. काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर विडंबनात्मक गाणं सादर करून वादात अडकलेल्या कामराविरोधात आता एफआयआर दाखल करण्यात आलेला असताना, कामराने आता थेट मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. कामराने मुंबई पोलिसांनी दाखल केलेल्या एफआयआरविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करत, ती एफआयआर रद्द करण्याची मागणी केली आहे. या याचिकेवर आज मंगळवारी तातडीची सुनावणी होणार आहे.

# टॅरिफ धोरणाचा फटका..अदानी ते अंबानींपर्यंत

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प पुन्हा सत्तेत आल्यावर त्यांनी आयात शुल्कात (टॅरिफ) केलेल्या वाढीचा परिणाम आता जागतिक अर्थव्यवस्थेवर स्पष्टपणे जाणवू लागला आहे. याचा थेट फटका भारतासह जगभरातील अब्जाधीशांच्या संपत्तीलाही बसला आहे. शेअर बाजारातील घसरणीमुळे भारतातील सर्वाधिक श्रीमंत व्यक्तींच्या संपत्तीत एकूण १०.३ अब्ज डॉलर इतकी घट झाली आहे.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** एका आकडेवारीनुसार, सर्वाधिक नुकसान मुकेश अंबानी यांना झाले असून, त्यांच्या संपत्तीत ३.६ अब्ज डॉलर इतकी घट झाली आहे. आता त्यांची एकूण संपत्ती ८७.७० अब्ज डॉलर इतकी राहिली आहे.

गौतम अदानी यांच्या संपत्तीत ३ अब्ज डॉलर घट होऊन ती ५७. ३ अब्ज डॉलर झाली आहे. सावित्री जिंदल आणि कुटुंबीयांच्या संपत्तीत २.२ अब्ज घसरण झाली असून, त्यांची संपत्ती आता ३३.९ अब्ज डॉलर आहे. तसेच, शिव नाडर यांना १.५ अब्ज डॉलरचा तोटा झाल्याचे नोंदवले गेले असून, त्यांची संपत्ती ३०.९० अब्ज डॉलर इतकी झाली आहे.

फक्त प्रसिद्ध गुंतवणूकदार वॉरेन बफे हे अपवाद ठरले असून, इतर सगळ्या प्रमुख उद्योगपतींच्या संपत्तीत मोठी घसरण झाली आहे: वॉरेन बफे यांच्या संपत्तीत मात्र यंदा १२.७ अब्ज डॉलरची वाढ झाली असून, त्यांची संपत्ती सध्या १५५ अब्ज डॉलरवर पोहोचली आहे.



### वॉल स्ट्रीटवरही मोठा फटका, ८ ट्रिलियन डॉलरचे नुकसान

- ट्रम्प यांच्या टॅरिफ वाढीमुळे अमेरिकेतील शेअर बाजारही हादरला असून, वॉल स्ट्रीटवर ८ ट्रिलियन डॉलरहून अधिक संपत्तीचे नुकसान झाले आहे. यातील तब्बल ५ ट्रिलियन डॉलरचे नुकसान केवळ गेल्या २ ट्रेडिंग सत्रांमध्ये झाले आहे. गेल्या १०० वर्षांतील ही सर्वात मोठी टॅरिफ वाढ मानली जात आहे.

### जगभरातील अब्जाधीश देखील तोट्यात; फक्त बफे फायदेशीर

- इलॉन मस्क (टेस्ला, स्पेसएक्स) – १३० अब्ज डॉलर घट (संपत्ती: ३०२ अब्ज डॉलर)
- जेफ बेझोस (अमेझॉन) – ४५.२ अब्ज डॉलर घट (संपत्ती: १९३ अब्ज डॉलर)
- मार्क झुकरबर्ग (मेटा) – २८.१ अब्ज डॉलर घट (संपत्ती: १७९ अब्ज डॉलर)
- बर्नार्ड अर्नाल्ट (LVMH) – १८.६ अब्ज डॉलर घट (संपत्ती: १५८ अब्ज डॉलर)
- बिल गेट्स – ३.३८ अब्ज डॉलर घट (संपत्ती: १५५ अब्ज डॉलर)



## नागपूर बनलं 'हॉट स्पॉट'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नागपूर :** अवकाळी पावसाने हजेरी लावल्यानंतर आता उन्हाच्या चटका वाढलाय. एप्रिल महिना सुरू होताच राज्यातील बहुतांश भागात अवकाळी पावसाने हजेरी लावली होती. मध्य भारतापासून दक्षिणेपर्यंतच्या अंतर्गत भागात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला होता. बंगालच्या उपसागरावरून बाष्पीयुक्त वारे वाहू लागल्यानं राज्यात अवकाळी पावसाने जोर धरला होता. मात्र आता राज्यात उन्हाचा चटका वाढलाय.

विदर्भातील तापमान येत्या दोन तीन दिवसात ४४ अंश सेल्सिअसच्यावर जाणार असल्याची माहिती हवामान विभागाने दिली आहे. विदर्भात सध्या सामान्य तापामानापेक्षा तीन अंश सेल्सिअस जास्त तापमान आहे. विदर्भातील अनेक शहरात उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

### पुढील दोन ते तीन दिवस अधिक तापमानाचे

- उत्तरेकडून उष्ण वारे येण्यास सुरुवात झाल्याने राज्यातील तापमान वाढलं आहे. अकोल्यात सर्वाधिक ४३.२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद करण्यात आलीय. मागील दोन दिवसांपासून राज्यातील अनेक शहरातील तापमान ४० अंशाच्यावर गेले आहे. पुढील दोन ते तीन दिवसांत राज्यातील अनेक भागात कमाल तापमानात २ ते ३ अंश सेल्सिअस वाढ होण्याची शक्यता आहे.

## 'कुनो'मधील कर्मचाऱ्यांवर कारवाई

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मध्यप्रदेश :** देशातील सर्वच राज्यांमध्ये उन्ह्याचे चटके वाढू लागले आहेत. तापमान वाढीने सर्वसामान्यांची होरपळ होत आहे. अशाच मुक्या प्राण्यांचेही भयंकर हाल होताना दिसतात. अशीच पाण्या वाचूनची प्राण्यांची होणारी तडफड मध्य प्रदेशमधील कुनो राष्ट्रीय उद्यानातील कर्मचाऱ्याला पाहवली नाही. त्याने चित्त्यांना पाणी पाजले. मात्र नियम उल्लंघन प्रकरणी वनविभागाने त्याला नोकरीवरुन कमी केले आहे.कुनो राष्ट्रीय उद्यानात चालक म्हणून सत्यनारायण गुर्जर नोकरी करत होता. त्याने चित्त्यांना पाणी देतानाचा व्हिडिओ शूट केला. यामध्ये चित्त्याचा मित्र सत्यनारायण गुर्जर चित्त्यांना पाणी देताना दिसत आहे. रेंज नेकेडरने हा व्हिडिओ बनवला आणि तो व्हायरल केला. वन विभाग या प्रकरणाची चौकशी करत आहे आणि इतर कर्मचाऱ्यांवरही कारवाई होऊ शकते.

सत्यनारायण गुर्जर चित्त्यांना पाणी देतानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी याला नियमांचे उल्लंघन मानले आहे.



मादी चित्ता ज्वाला तिच्या चार पिलांसह पाणी पिताना दिसत आहे. देखरेख पथकातील एक सदस्य त्यांना 'चला...' म्हणतो आणि प्लेटमध्ये पाणी ओततो. यानंतर ज्वाला तिच्या मुलांसह पाणी पिण्यासाठी येतात. लोकांना हा व्हिडिओ खूप आवडला आहे.

# नेवासात मोकाट कुत्र्यांचा हैदोस; कारवाई ची मागणी




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नेवासा :** नेवासा शहरात मोकाट कुत्र्यांचा उपद्रव वाढल्याने नागरिक हैराण झाले आहेत. रविवारी आठवडा बाजाराच्या दिवशी समाधान लॉजजवळ एका मोकाट कुत्र्याने ८ ते १० जणांना चावा घेतल्याने खळबळ उडाली. या घटनेनंतर समर्पण फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. करणसिंह घुले यांनी नगरपंचायतीकडे तातडीने कारवाईची मागणी केली आहे. मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा त्यांनी प्रभारी मुख्याधिकाऱ्यांना दिला आहे.

नेवासा नगरपंचायत हद्दीत मोकाट कुत्री, डुक्कर आणि गाढवांचा सुळसुळाट झाला आहे. याबाबत नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून कोणतीच ठोस पावले उचलली गेली नाहीत. डॉ. घुले यांनी आरोप केला की, बाहेरून कुत्री आणून शहरात सोडली जातात, तरीही नगरपंचायत प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष आहे.

शिवाय, शहरातील दोन्ही पुलांजवळ खराब मांस आणि प्राण्यांचे अवशेष टाकले जात असल्याने कुत्री आणि डुकरांची गर्दी वाढते. यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात तर आहेच, पण रस्त्यावरील अपघातांनाही ही जनावरे कारणीभूत ठरत आहेत.

डॉ. करणसिंह घुले यांनी निवेदनात म्हटले आहे की, “मोकाट कुत्री, डुक्कर आणि गाढवांचा तातडीने बंदोबस्त करावा, तसेच पुलांजवळ टाकल्या जाणाऱ्या घाणीवर नियंत्रण आणावे. अन्यथा आम्हाला तीव्र आंदोलन करावे लागेल.” या घटनेमुळे नेवासेकरांमध्ये संतापाचे वातावरण आहे, आणि प्रशासन काय पावले उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

अनेक ठिकाणी कुत्र्यांच्या हल्ल्यांमध्ये मोठी वाढ झाली आहे. शहरात मोकाट कुत्र्यांच्या वाढत्या संख्येमुळे रस्त्यांवर फिरणाऱ्या नागरिकांना त्रास होत आहे. लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना विशेष धोका निर्माण झाला असल्याने मोकळेपणाने सार्वजनिक ठिकाणी फिरताना भीतीचे वातावरण आहे. नव्या निर्बिजीकरण मोहिमेमुळे या समस्येवर मोठ्या प्रमाणावर नियंत्रण मिळेल.

यासाठी डॉ. करणसिंह घुले यांनी नगरपंचायतीला आंदोलनाचा इशारा दिल्याने आता नगरपंचायती समोर आव्हान आहे.

# विमानतळाला जमीन द्यायचीच नाही

## पुरंदरमधील शेतकऱ्यांनी पुकारला एल्गार, प्रशासनाबरोबरची चर्चा निष्फळ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** आम्हाला तुमचे पैसे नकोत, आम्हाला आमची जमीन प्यारी आहे. ज्यांना विमानतळ प्रकल्प करायचा आहे त्यांनी स्वतःच्या जागेत करावा, नाही तर आम्हाला तुमची जागा द्या आणि नंतर विमानतळ करा. तोपर्यंत आमच्या जमिनीत कोणालाही पाय ठेवून देणार नाही. अशा प्रकारचा एल्गार करीत विमानतळ प्रकल्प बाधित शेतकऱ्यांनी आपला विरोध जाहीर केला. जोपर्यंत विमानतळ रद्द केल्याची अधिसूचना निघत नाही तोपर्यंत आमचा लढा सुरूच राहणार असा निर्धार केला. त्यामुळे प्रांताधिकारी वर्षा लांडगे यांना रिकाम्या हाताने परतावे लागले.

पुरंदर तालुक्यातील वनपुरी, उदाचीवाडी, कुंभारवळण, एखतपूर, मुंजवडी, पारगाव, खानवडी आदी सात गावात विमानतळ प्रकल्पाची घोषणा करण्यात आली असून यासाठी २८३२ हेक्टर क्षेत्र संपादित केले जाणार आहे. विमानतळ प्रकल्प क्षेत्रातील गावे औद्योगिक क्षेत्र म्हणून शासनाने जाहीर केली. तसेच भूसंपादनाचा पुढील टप्पा गाठण्याच्या दृष्टीने गावोगावी अधिकारी शेतकऱ्यांशी संवादच्या माध्यमातून ड्रोन सर्व्हे करण्याच्या प्रयत्नात आहे. तसेच ३२ ग चा आदेश निघाल्यानंतर सात बारा वरती शिक्के मारण्याची प्रक्रिया होणार आहे. त्यामुळे विमानतळ प्रकल्प नकोच अशी घोषणा सात गावांतील शेतकऱ्यांनी सासवड मधील प्रशासकीय कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरु केले आहे. तसेच कोणत्याही परिस्थतीत आंदोलन मागे घेणार नसल्याचे सांगितले आहे. उपोषण सुरु असताना शुक्रवारी तहसीलदार विक्रम राजपूत यांनी उपोषण कर्त्या शेतकऱ्यांची भेट घेवून आंदोलन मागे घेण्याची विनंती केली, मात्र आमच्या भावना जोपर्यंत शासनापर्यंत पोहोचत नाहीत. तसेच शासन आमची दखल घेणार नाही तोपर्यंत आमचा लढा सुरूच राहील असे शेतकऱ्यांच्या वतीने सांगण्यात आले होते.

त्यानंतर रविवारी दि. ६ रोजी पुरंदरच्या प्रांताधिकारी वर्षा लांडगे आणि भोर उपविभागीय पोलीस अधिकारी तानाजी बरडे यांनी उपोषण करणाऱ्या शेतकऱ्यांची भेट घेवून आंदोलन मागे घेण्याची विनंती केली. मात्र उपस्थित सर्वच शेतकरी आक्रमक होवून आम्हाला कोणत्याही परिस्थितीत जमीन द्यायची नाही.

ज्यांना विमानतळ प्रकल्प करायचा आहे त्यांनी स्वतःच्या जागेत करावा नाही तर आम्हाला तुमची जागा द्या आणि नंतर विमानतळ करा तोपर्यंत आमच्या जमिनीत कोणालाही पाय ठेवून देणार नाही. अशा प्रकारचा एल्गार करीत विमानतळ प्रकल्प बाधित शेतकऱ्यांनी आपला विरोध जाहीर केला.



सासवड येथे विमानतळ प्रकल्प बाधित शेतकऱ्यांशी चर्चा करताना प्रांताधिकारी वर्षा लांडगे आणि इतर.)

- विमानतळ प्रकल्प बाधित शेतकऱ्यांनी प्रांताधिकार्यांना दिलेल्या मागण्या याप्रमाणे.
- विमानतळ प्रकल्प बाधित गावांचा करण्यात येणारा ड्रोन सर्व्हे तातडीने थांबवावा.
- विमानतळ प्रकल्पामुळे गावातील सर्व फळबागा नष्ट होणार असून त्यावरील जीवन उध्वस्त होईल.
- प्रकल्पामुळे शेतकरी भूमिहीन आणि बेघर होतील. यासह विविध मागण्या दिल्या आहेत.

प्रांताधिकारी वर्षा लांडगे यांनी शेतकऱ्यांच्या सर्व समस्या ऐकून घेतल्या तसेच तुमच्या मागण्या लेखी स्वरुपात द्याव्यात त्या जिल्हाधिकारी कार्यालय मध्ये तातडीने पाठविण्यात येतील असे सांगितले. त्या नंतर उपस्थित सर्व प्रकल्प बाधित गावच्या शेतकऱ्यांनी आपल्या हरकती आणि मागण्या प्रांताधिकारी वर्षा लांडगे यांच्याकडे लेखी स्वरुपात सुपूर्द केल्या.



## ढोकसांगवीत अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ

**कारेगाव :** टाळ, मृदूंग व ज्ञानोबा तुकोबाच्या गजरात श्री क्षेत्र ढोकसांगवी, ता.शिरुर येथे श्रीराम नवमी जन्मोत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहास आजपासून उत्साहात प्रारंभ झाला आहे. यंदा २१ वे वर्ष असलेल्या या सप्ताह कालावधीत ज्ञानेश्वर ग्रंथ पारायण, काकड आरती, प्रवचन, हरिपाठ, हरी किर्तन व हरी जागर आदि भरगच्च धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. उत्साही युवा शक्तीच्या माध्यमातून कलियुगाच्या या भयाण प्रसंगाला सामोरे जाण्यासाठी संत विचाराची समाजाला आज आवश्यकता आहे,याकरिता अखंड हरिनाम सप्ताह व संत संगती हे शस्त्र आणि शास्त्र आहे, याकरिता या नाम यज्ञात आपण तन, मन व धनाने सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले होते,या हरिनाम सप्ताहाचे आयोजन समस्त ग्रामस्थ मंडळी यांनी केले आहे.सोमनाथ बाबा हे ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे व्यासपीठ चालक आहेत. या सप्ताह कालावधीत ह.भ.प.भास्कर महाराज सरोदे, मेघा महाराज पाचंगे,चंद्रकांत महाराज श्रीमंत, ठकाराम महाराज मलगुंडे व विष्णू महाराज पोंदाळ यांची प्रवचने तर ह.भ.प.शिवाजी महाराज कोकणे, रामायणाचार्य संतोष महाराज कौठाळे,रमेश महाराज तांबडे, रुपाली महाराज सवणे, वैष्णवी महाराज टेंगले व विकास महाराज देवढे यांची हरिकिर्तने तर शनिवारी, दि.१२ रोजी हनुमान जयंतीच्या दिवशी मधुकर महाराज शिंगाडे यांच्या काल्याच्या कीर्तनाने या सप्ताहाची सांगता होणार आहे. सप्ताह कालावधीत उपस्थित भाविकांना कीर्तनानंतर महाप्रसादाचे वाटप केले जाणार असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.



## जेजुरीत महाआरोग्य शिबिराला मोठा प्रतिसाद

**जेजुरी :** श्री ज्ञानयोग सेवा ट्रस्ट, जेजुरी ग्रामीण रुग्णालय समर्थ युवा फाउंडेशन व जेजुरीकर श्रीराम मंदिर यांच्या वतीने श्रीराम नवमी उत्सव व जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ६७२ रुग्णांची आरोग्य तपासणी झाली. या आरोग्य मेळाव्यामध्ये रक्तातील साखर, कोलेस्ट्रॉल इत्यादी तसेच रक्तदाब तपासणी, डोळ्यांचे तपासणी, मोफत चष्मे वाटप, दातांची तपासणी, महिलांसाठी मॅमोग्राफी म्हणजे कर्करोग निदान तपासणी करण्यात आली. जेजुरी मध्ये पहिल्यांदाच सुमारे १३,५०० रुपयांच्या तपासण्या पूर्णपणे मोफत करण्यात आल्या असल्याचे आयोजक डॉ राजेंद्र खेडेकर यांनी सांगितले. दिनांक ६ रोजी २७२ रुग्णांनी व दिनांक ७ रोजी ४०० रुग्णांनी या शिबिरात तपासणी केली. माजी आमदार संजय जगताप, जेजुरी पालिकेचे मुख्याधिकारी चारूदत्त इंगुले, ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक डॉ प्रताप साळवे, अ‍ॅड मंगेश जेजुरीकर, जेजुरी उद्योजक संघाचे कार्याध्यक्ष रवींद्र जोशी, माजी नगरसेवक सचिन सोनवणे, अजिंक्य देशमुख, सुशील राऊत, अनिल पोकळे, हरिभाऊ लांघी आदींनी या शिबिराला भेट देऊन या उपक्रमाचे कौतुक केले. या महाआरोग्य शिबिरात समर्थ युवा फाउंडेशन अध्यक्ष राजेश पांडे, व्यवस्थापक सुनील पांडे, महेश सकपाळ, डॉ. तन्मयी देशपांडे, डॉ. प्रियंका मिसाळ, डॉ. प्रियंका पवार, डॉ अनघा थोरात, डॉ. प्रिया कर्डे, डॉ. पायल धावले, डॉ. विजया जाधव, दिपक ओव्हाळ, अनिकेत कांगने यांनी सहकार्य केले.

## ड्रीम्स युवाचे सामाजिक उपक्रम पर्यावरणपूरक



**उरुळी कांचन :** ड्रीम्स युवा सोशल फाउंडेशन संचालित उरुळी कांचन ग्राम स्वच्छता अभियान ग्रुप घेत असलेले वेगवेगळे सामाजिक उपक्रम समाज उपयोगी व पर्यावरण पूरक असून त्याला मिळणारा प्रतिसाद हा त्यांच्यावरील विश्वासाचे प्रतीक आहे असे प्रतिपादन ज्येष्ठ नेते प्रा. के. डी. कांचन यांनी केले ते येथे ड्रीम्स युवा सोशल फाउंडेशनने आयोजित केलेल्या मोफत महाआरोग्य शिबिराचे उदघाटन करताना बोलत होते. जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधत संतोष चौधरी यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या सुमारे १५० सभासदांच्या ग्रामस्वच्छता अभियान ग्रुपने या मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र उरुळी कांचन, निरामय हॉस्पिटल, उषाकिरण हॉस्पिटल,साने गुरुजी आयुर्वेदिक महाविद्यालय,एच. व्ही. देसाई हॉस्पिटल,प्राईम लॅब,शीतल होमिओपॅथी हॉस्पिटल, डॉ बुरगुटे डोळ्यांचा दवाखाना, डॉ समर्थ हॉस्पिटल (ई. एन.टी), डॉ मयूर डेंटल स्पेशालिटी क्लिनिक,एकात्मिक कर्करोग उपचार व संशोधन केंद्र, वरदविनायक हॉस्पिटल आणि हिमालय हॉस्पिटल अशा एकूण १३ आरोग्य संस्थांनी सहभाग घेतला. १२७६ लाभार्थ्यांनी याचा लाभ घेतला. याप्रसंगी प्रा. के. डी. कांचन, सरपंच अमित कांचन,आरोग्यदूत जितेंद्र सातव,सचिन सरवदे,राजाराम कांचन,महादेव कांचन, देविदास भन्साळी, प्राचार्य भारत भोसले, संभाजी कांचन,राजेंद्र टिळेकर,सुनील जगताप,संतोष ह. कांचन यांचे सह अनेक मान्यवर व सहभागी वैद्यकीय संस्थांचे डॉक्टर उपस्थित होते.

# जिमा -जिसा संघर्ष पेटला

## कारखानदार डॉ कुटे यांनी बदनामी केल्याने शेकडो तरुणांनी केला निषेध




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** जेजुरी औद्योगिक वसाहतीमधील उद्योजक संघटनेचे अध्यक्ष (जिमा) डॉ. रामदास कुटे यांनी ठेकेदारांच्या जिसा संघटनेवर ब्लॅकमेलिंग करणे, खंडणीची पूर्वतयारी तसेच कारखानदारांना गेटवर जाऊन धमकावण्याचे प्रकार करीत असल्याचा आरोप पत्रकार परिषदेत केल्यानंतर त्याचे तीव्र पडसाद उमटले डॉ. कुटे यांच्या वक्तव्याचा निषेध करत जिसा संस्थापक सुरेश उबाळे, अध्यक्ष संदीप जगताप यांच्या नेतृत्वाखाली सुमारे १०० हून अधिक भूमीपुत्रांनी रविवारी (दि. ६) पोलीस ठाण्यावर मोर्चा काढत बिनबुडाचे व खोटे आरोप करणाऱ्या जिमा अध्यक्ष डॉ कुटे यांच्यावर बदनामी, मानहानीचा गुन्हा दाखल करा, अशा आशयाचा तक्रार अर्ज सहा. पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे यांना देण्यात आला.

शनिवारी (दि. ५) जिमा संघटनेचे अध्यक्ष उद्योजक डॉ. कुटे यांनी पत्रकार परिषद घेऊन कारखान्यांना विविध सेवा पुरविणाऱ्या ठेकेदारांची जिसा संघटनेवर गंभीर आरोप करत औद्योगिक वसाहतीमध्ये विनाकारण फिरकू देणार नाही, असा सज्जड दमवजा इशारा दिला होता. प्रसार माध्यमांवर हे वृत्त प्रसारीत होताच जिसा संघटनेचे पदाधिकारी प्रचंड संतप्त झाले. शहरातूनही तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या. गेल्या दहा वर्षांत आम्ही कधीही कोणत्याही कारखानदाराला धमकावले नाही. किंवा कामासाठी दबाव टाकला नाही तसेच पैशांची मागणी केली नाही. त्याचे पुरावे देऊन आरोप सिद्ध केले, तर आमच्यावर गुन्हे दाखल करावेत. येथील कारखानदार, कामगार आणि सेवा पुरविणारे ठेकेदार यांच्या समस्या, अडीअडचणी सोडविण्यासाठी आम्ही जेजुरीकर ग्रामस्थ सक्षम आहोत, असे संदीप जगताप यांनी सांगितले. तर डॉ. कुटे यांच्या कंपनीमध्ये काय व कोणत्या सोयी सुविधा दिल्या जातात, त्यांचे येथे प्लॉट किती आहेत? याचीच चौकशी करण्याची मागणी करणार असल्याचे संस्थापक सुरेश उबाळे यांनी सांगितले. यावेळी संपत कोळेकर, महेश उबाळे, विक्रम फाळके, अक्षय जगताप,आप्पा चौंडकर, विनायक कुडाळकर, लहू शिंदे, उमेश जगताप, प्रशांत गायकवाड, हरिभाऊ पवार, विकास पवार, मयूर लाखे, नजीर शेख, अभिजित काकडे, विजय पवार आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बुधवारी उद्योगमंत्र्याबरोबर बैठक

- डॉ.रामदास कुटे यांची येथे मनमानी सुरू असून ते कोणालाही न जुमानता बेछूट व खोटेनाटे आरोप करून येथील वातावरण दूषित करत आहेत त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो त्या अनुषंगाने उद्योगमंत्री उदय सामंत यांची भेट घेऊन चर्चा करणार असल्याचे जिसा संघटनेच्या पदाधिकऱ्यांनी सांगितले.

## सासवड पोलीस ठाण्यात बेवारस वाहने



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** सासवड पोलीस ठाण्यामध्ये विविध घडलेल्या घटनांमध्ये अनेक दुचाकी पडून आहेत. अशी वाहने संबंधित मूळ मालकांनी नेण्यासाठी पोलीस ठाण्याच्या वतीने पूर्ण प्रयत्न केले जात असून अनेक वाहने मालकांनी स्वतःहून नेली आहेत. त्याचप्रमाणे अनेक मालकांना शोधून वाहने नेण्यासाठी अनेकवेळा विनंती केली. मात्र, त्यांच्याकडून प्रतिसाद आला नाही. त्यामुळे अशा बेवारस वाहनांचा लवकरच लिलाव करण्यात येणार असल्याची माहिती पोलीस निरीक्षक ऋषिकेश अधिकारी यांनी दिली आहे.

अपघात, चोरी आणि इतर घटनांमध्ये अनेक दुचाकी सासवड पोलीस ठाण्यात आल्यानंतर त्या वर्षानुवर्षे पोलीस ठाण्याच्या आवारात तशाच पडून आहे. त्यामुळे इतर वाहने पार्किंग करताना अनेक अडचणी येत आहेत. म्हणून वर्षानुवर्षे पडून राहिल्याने वाहने भंगारात जमा होण्याची शक्यता आहे. मात्र, यातील अनेक वाहने सुस्थितीत असल्याने त्यांचा दैनंदिन वाहतुकीसाठी त्यांचा उपयोग करणे शक्य आहे. म्हणून अशा वाहनांचा लिलाव करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सासवड पोलीस ठाण्यात लावण्यात आलेल्या वाहनांपैकी अनेक वाहने संबंधित मालकांना शोधून देण्यात आलेल्या आहेत. अद्याप सुमारे १७ दुचाकी गाड्या बेवारस स्थितीत पडून राहिल्या आहेत. याबाबत परिवहन विभागाकडून माहिती घेऊन संबंधित मालक शोधून त्यांना पत्र व्यवहारही केला.

मात्र, अद्याप प्रतिसाद मिळाला नाही. यामध्ये हिरोहोंडा, कावासाकी, बुलेट सुझुकी, स्प्लेंडर, बजाज डिस्कव्हर, बॉक्सर, पॅशन, सीडी डिलक्स, होंडा शाईन, अशा विविध प्रकारच्या गाड्यांचा समावेश आहे. अशी माहिती सहायक महिला पोलीस फौजदार संगीता राणे यांनी दिली.

## धामणी येथे किर्तनाने भाविक झाले मंत्रमुग्ध

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** धामणी (ता. आंबेगांव) येथील पुरातन राम मंदिरात रामनवमीनिमित्त धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करुन पंचक्रोशीतील भाविकांच्या व ग्रामस्थाच्या उपस्थितीत, श्रीरामजन्म सोहळा भक्तिमय व उत्साही वातावरणात रविवारी (दि. ६) साजरा करण्यात आला.

सोळाव्या शतकात संतश्रेष्ठ जगतगूरु संत तुकाराम महाराज यांच्या हस्ते येथील श्रीराम,लक्ष्मण व सितामाई यांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना झालेली असल्यामुळे येथील श्रीराम मंदिरात रामजन्म सोहळ्यासाठी वारकरी सांप्रदाय वारकऱ्यांची व पंचक्रोशीतील भाविकांची व ग्रामस्थांची मोठी गर्दी होते. पहाटे देवस्थानाचे मुख्य पुजारी मधुकर महाराज क्षिरसागर व मुकुंद क्षिरसागर यांच्या हस्ते पंचामृताने श्रीराम लक्ष्मण सितामाईच्या मूर्तींना अभिषेक करण्यात आला. त्यानंतर या सर्वांगसुंदर देखण्या मूर्तींना वस्त्रालंकार घालण्यात आले. त्यानंतर महाआरती होऊन मंदिर भाविकांना दर्शनासाठी खुले करण्यात आले.

पहाडदरा, शिरदाळे, जारकरवाडी, खडकवाडी येथील भाविकांनी मोठी गर्दी केली होती. सकाळी दहा वाजता रामायणाचार्य ह.भ.प.विठ्ठल महाराज ढवळे (जालना) यांचे रामजन्माचे किर्तन झाले. किर्तनाला साथ देण्यासाठी आळंदी येथील ज्ञानेश संजीवन वारकरी शिक्षण संस्थेचे प्रमुख ह.भ. प.गणेश महाराज गलांडे, हनुमान महाराज खवल, बालगायक कृष्णा गलांडे ,मृदुंगाचार्य कृष्णराव ढवळे व त्यांच्या संस्थेतील वारकरी सामील झालेले होते.



# कऱ्हेकाठच्या सासवड येथील पुरातन राम मंदिरात राम जन्मोत्सव



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** सरदार जयसाहेब पुरंदरे यांच्या मालकीच्या सासवडच्या कऱ्हे काठावरील पुरातन राम मंदिरात श्री रामनवमी जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. महापुजा, ह भ प अभय महाराज जगताप यांचे प्रवचन शंखनाद, भाविकांनी केलेली पुष्पवृष्टी, ओंकार निरगुडे यांचे पाळणा गायन, महाआरती, सुंठवडा वाटप अशा स्वरुपातील या कार्यक्रमास शहरातून मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. जयसाहेब पुरंदरे, जगदीश पुरंदरे, सायंतारा पुरंदरे ,अविनाश पुरंदरे, उज्वल किर्लोस्कर व पुरंदरे कुटुंबीय या प्रसंगी उपस्थित होते.

रामचंद्र भैरवकर यांचे संबळ वादन, कला दिग्दर्शक संदिप इनामके यांनी केलेली मंदिराची सुरेख सजावट यामुळे या सोहळ्याची रंगत वाढली. संध्या पुरंदरे, आशा किर्लोस्कर, रजनी पुरंदरे, मेघा सांडुर, शोभा राऊत यांनी पाळण्याची दोरी हलवून आत्याची भूमिका पार पाडली. सर्व भाविकांना सुंठवडा, लाडू व हरबऱ्याच्या घुगऱ्याचे वाटप करण्यात आले.

अ‍ॅड अण्णासाहेब खाडे, अरुणआप्पा जगताप, शाम महाजन महेश जगताप, अरविंद देशमुख, नितीन पवार, मोहनअप्पा जगताप, सुनिल कामठे, बबनभाऊ टकले, कौशिक पुरंदरे धनश्री लोमटे, नुतन गोसावी, कुमार मेरूकर, रवि चौबे, अमित पवार, गीता खंडकर,प्रकाश ढवळे ,सत्यभामा म्हेत्रे, डॉ विनायक खाडे,पांडुरंग गायकवाड , परशुराम देशमुख डॉ मनीषा खाडे यांसह अनेक भाविक मंडळी या प्रसंगी उपस्थित होती.

दरम्यान सुमारे तीनशे वर्षे पुरातन अशा शहरातील बुधकर राम मंदिरात देखील उत्साहात जन्म सोहळा पार पडला. रघुनाथ खळदकर यांनी येथे सर्व धार्मिक विधी पार पाडले. भाविकांना सुंठवडा, केळी व कैरी पन्ह्याचे वाटप करण्यात आले. अशोक बेलसरे, सीताराम, खळदकर, जगदीश खळदकर, चैतन्य खळदकर, प्रताप शेडगे, व्यंकटेश शेडगे आदींना येथे व्यवस्था पाहिली. दोन्ही मंदीरात दर्शनाला भाविकांनी गर्दी केली होती.

# श्रींचे राजबिंडे वैभवी रूप

## श्रीराम जन्मोत्सव दिनी रामाची पालखी ग्राम प्रदक्षिणा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी** : श्री ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधीवर चंदन उटी तून 'श्रीं'चे राजबिंडे रूप शिंदेशाही पगडी अवतारातील वैभवी रूप अभिजित धोंडफळे आणि सहकारी यांनी आळंदी मंदिरात परिश्रम पूर्वक साकारले. श्रींचे लक्षवेधी रूप पाहण्यासह व दर्शनास भाविक नागरिकांनी मंदिरात गर्दी केली. आवेकर भावे श्रीरामचंद्र संस्थान आळंदीसह परिसरात श्री रामजन्मोत्सव विविध धार्मिक कार्यक्रमांनी परंपरेने हरिनाम जयघोषात साजरा झाला.

माऊली मंदिरातील प्रथा परंपरांचे पालन करीत गुढी पाडव्यापासून श्रींचे समाधीवर चंदन उटी लेप लावण्यास सुरुवात होते. रामनवमी निमित्त संजीवन समाधीवर आकर्षक वस्त्रालंकार, पुष्पसजावट करून श्रीचे वैभवी रूप साकारण्यात आले. श्री नरसिंह सरस्वती स्वामी महाराज मंदिरात श्रीक्षेत्रापाध्ये श्रीचे पुजारी माजी नगराध्यक्ष सुरेश गांधी,सुधीर गांधी व गांधी परिवाराने चंदनउटीतून परिश्रमपूर्वक श्रींचे वैभवी रूप साकारले. हजेरी मारुती मंदिरात भजन सेवाही उत्साहात झाली.

दरम्यान आळंदी मंदिरात राम नवमी निमित्त देवस्थानचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजन नाथसाहेब, विश्वस्त विधितज्ञ राजेंद्र उमाप, विश्वस्त व पालखी सोहळा प्रमुख भावार्थ देखणे, व्यवस्थापक माऊली वीर उपव्यवस्थापक तुकाराम माने, ज्ञानेश्वर पोंदे आदीचे उपस्थितीत आणि मार्गदर्शनात धार्मिक कार्यक्रम झाले. आळंदी मंदिरात भाविक, नागरिक, साधक यांनी श्रीचे दर्शनास गर्दी केली. मुख्य व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर यांनी संस्थांनच्या प्रथा प्रमाणे मंदिरात राम नवमीचे धार्मिक महत्व ओळखून नियोजन केले.

राम नवमी निमित्त माऊली मंदिरात प्रथा परंपरांचे पालन करीत रामजन्मोत्सवास उत्साहात सुरुवात झाली. यात मंदिरात प्रथम घंटानाद, काकडा, श्रींना पवमान अभिषेक, दुधारती,चोपदार यांचे वतीने गुढी पूजन झाले. चंदन उटी निमित्त भाविकांना श्रींचे पादुका दर्शन कारंजा मंडपात सुरु होते. उटी नंतर दर्शनास पंखा मंडपात सुरुवात झाली. यानंतर सहाचे सुमारास चंदन उटी दर्शन खुले झाले. श्रीरामजन्मोत्सवा निमित्त श्रीना वैभवी पोशाख करण्यात आला. विना मंडपात मानकरी संतोष मोझे यांचे वतीने शरद महाराज बंड यांची कीर्तन सेवा झाली. जन्मोत्सव कीर्तन-पाळणा, आरती, महानैवेद्य, सुंठवडा प्रसाद वाटप, मानकरी यांना नारळ प्रसाद वाटप करण्यात आला.

या प्रसंगी प्रमुख विश्वस्त योगी निरंजननाथ, मालक बाळासाहेब पवार, मानकरी, वेदांत चोपदार आदी उपस्थित होते. जन्मोत्सव नंतर श्रीचे दर्शन खुले करण्यात आले. दुपारी अडीच सुमारास श्रीनां वैभवी शिंदेशाही चंदन उटी निमित गाभारा भाविकांना दर्शनास बंद करून कारंजा मंडपात श्रीचे पादुका दर्शन सुरु करण्यात आले.

आवेकर-भावे श्री राम मंदिर संस्थांनचे वतीने उत्साहात श्री रामाची पालखी माऊली मंदिर प्रदक्षिणा आणि नगर प्रदक्षिणा झाली. श्री राम पालखीचे मंदिरात स्वागत करून नारळ प्रसाद देण्यात आला. श्रीनां धुपारती झाल्यानंतर रात्री मानकरी संतोष मोझे यांचे वतीने जागर झाला.

मंदिरात व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर, तुकाराम माने, श्रीधर सरनाईक, श्रीचे चोपदार बाळासाहेब रणदिवे, राजाभाऊ रंधवे, संजय लवांडे, संजय रणदिवे, महेश गोखले आदींनी मंदिरात विविध विभागात तसेच भाविकांचे दर्शनाचे नियोजन केले. येथील श्री संत गोरोबा काका मंदिरात श्रीराम नवमी निमित्त श्री संत गोरोबा काकांचे वंशपरंपरागत पुजारी किशोर दाते, किरण दाते, बल्लाळेश्वर वाघमारे यांनी परिश्रम पूर्वक चंदन उटी अवतार साकार केला. आळंदी वारकरी शिक्षण संस्थेत परंपरेने प्रसाद वाटप उत्साहात झाले.



### मरकळ येथे श्रीगुरुदेवदत्त प्रतिष्ठान तर्फे रामजन्मोत्सव साजरा

● मरकळ येथील श्री पंचलिंग श्रीगुदेवदत्त प्रतिष्ठानचे वतीने रामनवमी निमित्त विविध धार्मिक कार्यक्रम उत्साहात झाले. यात श्रींची पूजा, आरती, अभिषेक, हरिनाम गजरात भजन झाली. श्री पंचलिंग श्रीगुदेवदत्त प्रतिष्ठान प्रमुख विश्वस्त ताई माऊली महाराज यांचे मार्गदर्शना खाली राम जन्मोत्सव उत्साहात साजरा झाला. श्री केशवराज देवस्थान, मरकळ ग्रामस्थ यांचे वतीने जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी वारकरी साधक, विद्यार्थी, मरकळ ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आल्याचे रोहिदास कदम यांनी सांगितले.

### आळंदीत रामजन्मोत्सव उत्साहात साजरा

● येथील आवेकर-भावे श्री रामचंद्र संस्थानच्या श्री राम मंदिरात रामजन्मोत्सवास प्रथा परंपरांचे पालन करीत राम नवमी वार्षिक उत्सव साजरा झाला. या निमित्त गुढी पाडवा ते राम नवमी या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रम हरिनाम गजरात झाले. श्रीराम मंदिरात श्रीराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. श्रीराम नवमी निमित्त मंदिराला विद्युत रोषणाई करण्यात आली होती. श्रीराम मंदिरात आकर्षक मोगऱ्याचे फुलांची सजावट करण्यात आली होती. सकाळी श्रींची पूजा,अभिषेक करण्यात आला. श्रीराम मंदिरात भाविकांनी पुष्पवृष्टी करत जन्मोत्सव साजरा केला. भाविकांना श्रींचा प्रसाद वाटप करण्यात आला. श्री राम मंदिरातील श्रींचे जन्मोत्सव सोहळ्याचे यशस्वीते साठी संस्थांचे अध्यक्ष प्रमुख विश्वस्त संजय आवेकर, बिपीन चोभे, सुनील भदे, गजानन काळे, रघुवीर ओक, तन्मय चोभे, नरहरी महाराज चौधरी आदींनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी रामकृष्ण महाराज वारकरी शिक्षण संस्थेचे विध्यार्थी श्री रामरायांचे पालखी मिरवणुकीत सहभागी झाले होते. यासाठी अध्यक्ष मोहन महाराज शिंदे यांनी परिश्रम घेतले. या प्रसंगी विश्वस्त बिपीन चोभे, गणेश गरुड, किरण येळवंडे, नरहरी महाराज चौधरी, लक्ष्मण मेदनकर आदींसह पदाधिकारी मान्यवर, वारकरी भाविक उपस्थित होते.




## जेजुरीत भाजपाचा वर्धापन दिन साजरा

**जेजुरी** : भारतीय जनता पार्टीचा स्थापना दिन तसेच प्रभू श्रीराम नवमी निमित्त भारतीय जनता पार्टी जेजुरी शहर कार्यालयात भाजपाचे नेते सुनिल पांडे, मार्तंड देवसंस्थानचे विश्वस्त पोपटराव खोमणे यांच्या हस्ते प्रभू श्रीरामांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले, तसेच भाजपाचा झेंडा फडकवून वंदन करण्यात आले. यावेळी जेजुरी शहर अध्यक्ष गणेश भोसले यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. भटक्या विमुक्त आघाडीचे पुणे जिल्हाध्यक्ष रवींद्र खोमणे, चंद्रकांत जगताप, कल्पेश सूर्यवंशी, रविंद्र कोशे, सचिन मोरे, सचिन कापडे, प्रितम खोमणे पाटील, सागर खोमणे, सोमनाथ मदने, तसेच अर्चना पोकळे, संपदा खोमणे, सुमती पुजारी, प्रिती पवार, सविता घोडके, संगिता बोडरे, रंजना खोमणे, वर्षा कोशे व इतर पदाधिकारी उपस्थित होते. सुत्रसंचालन रवींद्र खोमणे यांनी, तर आभार रवींद्र कोषे यांनी मानले.

## खडकवाडी-नाथनगर येथे श्री भैरवनाथ यात्रा उत्सवाचे आयोजन

**लोणी-धामणी** : खडकवाडी-नाथनगर (ता. आंबेगाव) येथील श्री भैरवनाथ यात्रा उत्सव गुरूवार (दि. १०) ते शुक्रवार (दि. ११ ) असे दोन दिवस संपन्न होणार आहे. गुरुवार रोजी ७ ते ८ वाजता श्रीची महापूजा, हारतुरे, मांडव डहाळे व अभिषेक, सकाळी ८ ते सायंकाळी ७ वाजता बैलगाडांच्या भव्य जंगी शर्यती, रात्री ९ ते १० वाजता पालखी मिराणूक, रात्री १० ते ४ वाजता ज्ञानेश्वर प्रासादिक भजन मंडळ यांचा संगीत भजनाचा कार्यक्रम होईल. रात्री दहा वाजता निलेशकुमार अहिरेकर सह रूपाली पुणेकर यांचा लोकनाटय तमाशाचा कार्यक्रम होईल. बैलगाड्यांसाठी भव्य इनाम असून एकूण इनाम ३,५१,५५५/- रुपये आहे. मंगळवारी सकाळी ८ ते १२ वाजता टोकन काढले जाणार आहेत. त्यासाठी टोकन फी ५००/ रुपये असून ती परत केली जाणार नाही. शुक्रवारी सकाळी ९ ते १२ वावजा वरील तमाशाचा हजेरीचा कार्यक्रम होईल. तसेच दुपारी ४ ते ६ वाजत कुस्त्यांचा जंगी आखाडा होईल. यात्रा उत्सवाचे आयोजन नियोजन समस्त ग्रामस्थ मंडळी खडकवाडी-नाथनगर यांनी केले आहे, असे येथील ग्रामस्थांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# हरहर महादेवने आसमंत दुमदुला

## मानाच्या संत तेल्या भुत्याच्या कावडीचे शिखर शिंगणापूर कडे शाही प्रस्थान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड** : सासवड येथील प्रथम मानाच्या संत तेल्या भुत्याच्या कावडीने रामनवमीच्या दिवशी रात्री शिखर शिंगणापूर कडे शाही प्रस्थान केले.

सासवड येथील शिवालयाच्या लगत असलेल्या दत्तमंदिरासमोर काकडीची माजी आमदार संजय जगताप यांच्या हस्ते आरती करण्यात आली, आरती होताच हलगीचा सुर, मंजुळ सनईच्या सूरांनी ठेका धरला. त्यातच फटाक्यांची आतिषबाजी झाली. संपुर्ण आसमंत उजळून निघाला. शिवशंभो हरहर महादेव गर्जनानी आसमंत दुमदुला. कावडीचे महाराज कैलास महाराज कावडे अग्रभागी ऊभे राहिले. कावड डोक्यावर घेऊन नाचत लक्ष्मीआई मंदिराजवळ गेली. या ठिकाणी देवदर्शन झाल्यावर जुन्या भैरवनाथ मंदिरा समोर कावड या ठिकाणी देवदर्शन करून कावड पारंपरिक रितीरिवाजा प्रमाणे तेल्या भुत्याच्या समाधी जवळ आली. या ठिकाणी कावडीने पाच प्रदक्षिणा घातल्या. दर्शन करून कावडीने शिखर शिंगणापूर कडे पायीवारीसाठी प्रस्थान केले.

दरम्यान या कावडी बरोबर हजारो शिवभक्त कावडीचे दर्शन घेऊन पायी चालत प्रवास करत शिखर शिंगणापूर कडे जात असतात. अत्यंत अवघड असलेल्या मुंगी घाटात फक्त मानवी साखळीच्या सहाय्याने कावड चढवली जाते. एक एक टप्पा पार करताना शिवभक्त आपल्या भक्ती-शक्तीच्या जोरावर ही अवजड कावड पारंपरिक पद्धतीने वर चढवतात. हा नयनरम्य सोहळा पहाण्यासाठी लाखो भाविक मोठ्या संख्येने डोंगर कपारीत बसलेले असतात. सर्वात शेवटी व कोणत्या प्रकारचा दोर न लागता फक्त मानवी साखळीच्या सहह्याने कावड पारंपरिक पद्धतीने चढवली जाते. हा सोहळा अत्यंत नयनरम्य असा असतो.

दरम्यान कावडीला निरोप देण्यासाठी संजय जगताप यांच्यासह, गाव पाटील संग्राम जगताप, माजी नगराध्यक्ष मार्तंड भोंडे, माजी नगरसेवक अजित जगताप, सुहास लांडगे, हरुनभाई बागवान, संतोष खोपडे, आजी माजी नगराध्यक्ष, नगरसेवक व विविध विभागाचे अधिकारी पदाधिकारी, भाविक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## कोरेगाव भिमा सोसायटीच्या चेअरमनपदी प्रवीण गव्हाणे बिनविरोध

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर** : कोरेगाव भिमा, ता. शिरुर येथील विविध विकास कार्यकारी सहकारी सोसायटी नंबर २ च्या चेअरमनपदी प्रवीण बाबुराव गव्हाणे यांची बिनविरोध निवड करण्यात आली असल्याने कोरेगाव भीमाच्या इतिहासात प्रथमच सर्वात कमी वयाचे चेअरमन सोसायटीला मिळाले आहे.

कोरेगाव भिमा येथील विविध विकास कार्यकारी सहकारी सोसायटी नंबर २ चे चेअरमन चेअरमन अशोक गव्हाणे यांनी राजीनामा दिल्याने रिक्त चेअरमन पदासाठी निवडणूक निर्णय अधिकारी दिपक वराळ यांच्या नियंत्रणाखाली चेअरमन पदाची निवडणूक घेण्यात आली.



दरम्यान चेअरमनपदी प्रवीण बाबुराव गव्हाणे यांची बिनविरोध निवड झाल्याने ज्येष्ठ नेते आबासाहेब गव्हाणे व माजी सरपंच राहुल गव्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली बिनविरोध निवडीची परंपरा कायम राहिल्याचे दिसून आले. यावेळी माजी चेअरमन पंडित फडतरे, अशोक गव्हाणे, अनिल गव्हाणे, नागेश गव्हाणे, माजी व्हाईस चेअरमन सारिका गव्हाणे, संभाजी गव्हाणे, रामदास कांबळे, संचालक अशोक नाबगे, महादेव फडतरे, बाळासाहेब वाडेकर, डिंग्रजवाडीचे माजी उपसरपंच मधुकर गव्हाणे, बारीकराव गव्हाणे, बापूसाहेब गव्हाणे, संस्थेचे सचिव मधुकर कंद, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सतीश गव्हाणे, सामाजिक कार्यकर्ते मछिंद्र गव्हाणे यांसह आदी पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

## भानुदास शिंदे यांची रयत क्रांतीच्या प्रवक्तेपदी निवड



**पारगांव** : रयत क्रांती संघटनेचे माजी मंत्री आमदार सदाभाऊ खोत यांनी भानुदास शिंदे यांना पत्र देऊन रयत क्रांती संघटनेच्या राज्य प्रवक्ते व प्रदेश सोशल मीडिया अध्यक्षपदी नेमणूक केली. भानुदास शिंदे हे पंचवीस वर्षांपासून शेतकरी चळवळीत काम करत असून नुकत्याच पार पडलेल्या विधानसभेपूर्वी त्यांनी शरद पवार यांच्या उपस्थितीमध्ये राष्ट्रवादी पक्ष शरद पवार गटामध्ये प्रवेश केला होता. परंतु अवघ्या सहा महिन्यात भानुदास शिंदे यांनी पुन्हा रयत क्रांती संघटनेमध्ये प्रवेश केला आहे. भानुदास शिंदे यांनी संघटनेमध्ये पुन्हा प्रवेश केल्यामुळे त्यांचे स्वागत व अभिनंदन करण्यात येत आहे. भविष्य काळामध्ये शेतकऱ्यांसाठी व समाजासाठी अखंडपणे काम करत राहणार असून, शासनाच्या योजना शेतकऱ्यांपर्यंत व शेतकऱ्यांचे प्रश्न शासन दरबारी मांडण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे भानुदास शिंदे यांनी सांगितले.

# आंबेगाव तालुक्यातील टँकरने पाणीपुरवठा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी** : आंबेगाव तालुक्यात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असून पंचायत समितीच्या वतीने तालुक्याच्या पूर्व भागतील दुष्काळ ग्रस्त गावांना पाण्याचे टँकर सुरू करण्यात आले आहेत. पाण्याचे टँकरने काही गावांमध्ये विहिरीमध्ये पाणी पुरवठा केला जात असून, काही गावांमध्ये हौद किंवा टाक्यांमध्ये पाणी टाकले जाते.



तालुक्याच्या पूर्व भागात लोणी, धामणी, शिरदाळे, पहाडधरा, वडगावपीर, मांदळवाडी या सहा गावांना दरवर्षी मार्च, एप्रिल, मे महिन्यात टँकरने पाणीपुरवठा केला जात असतो. या भागात पुरेसे माती बंधारे, सिमेंट बंधारे नसल्याने व पुरेसा पाऊस पडत नसल्याने पाणी टंचाई निर्माण होते. तालुक्याच्या पूर्व भागात म्हाळसाकांत पाणीपुरवठा योजनेच्या माध्यमातून कायमस्वरूपी पाणीपुरवठा होण्यासाठी पाणी आणणार, असे आश्वासन प्रत्येक निवडणुकीत लोकप्रतिनिधी देत असतात. परंतु वीस ते पंचवीस वर्षांत वरील ग्रामस्थांना आश्वासनाशिवाय काहीच मिळाले नाही. पूर्व भागातील गावांना पंचायत समितीच्या वतीने पाण्याचा टँकर सुरू केले आहेत. पण तेही वेळेत येत नसल्याचे नागरिकांच्या तक्रारी आहेत.

सध्या मोठ्या प्रमाणात उन्हाची तीव्रता अधिक वाढली तर टँकरची संख्या वाढवावी लागणार आहे. सध्या टँकरच्या माध्यमातून पाणी पुरवले जात असले, तरी मात्र जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी चारा छावण्या सुरू कराव्या लागतील. कारण या परिसरात एक महिना झाला, हिरवा चारा संपला आहे. त्यामुळे या परिसरातील शेतकऱ्यांना खेड, शिरूर व आंबेगाव तालुक्यातील बागायत पट्ट्यात जाऊन चढ्या दराने हिरवा चारा विकत आणावा लागत आहे.



श्रीराम रामनवमी निमित्त जेजुरीत आकर्षणाचा विषय ठरलेले श्रीराम रूपातील ही बालिका. (छायाचित्र - विजयकुमार हरिश्चंद्रे.)

## अज्ञात वाहनाच्या धडकेत इसम ठार

**शिक्रापूर** : कोरेगाव भीमा, ता. शिरुर येथील डिंग्रजवाडी फाटा येथील पुणे नगर महामार्गावरुन यादव आडे हे त्यांच्या ताब्यातील नवीन विना नंबर दुचाकीहून नगर बाजूकडे जात असताना, पाठीमागून आलेल्या अज्ञात कारची धडक बसून, रस्त्यावर पडल्याने यादव गंभीर जखमी झाले. दरम्यान नागरिकांनी त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले असता, यादव ताराचंद आडे (४०, सध्या रा. सणसवाडी ता. शिरुर, मूळ रा. पाथरी ता. पांढरवडा जि. यवतमाळ) यांचा मृत्यू झाला. याबाबत विशाल बाबूलाल पवार (३२, रा. चेअरमन वस्ती सणसवाडी ता. शिरुर) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी अज्ञात कार चालकावर गुन्हा दाखल आहे.

## आरती सतिश खाडे यांचे निधन

**सासवड** : येथील आरती सतिश खाडे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, सासु, दिर, जाऊ असा परिवार आहे. सोपाननगर येथील व्यावसायीक कैलास खाडे यांच्या त्या वहीनी होत. त्यांच्या निधनाने सोपाननगर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



# परिंचे येथे फुलांची उधळण करत राम नवमी साजरी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड** : येथील प्राचीन राम मंदिरात दुपारी बारा वाजता फुलांची उधळण करत पारंपारिक पाळण्याचे गायन करून राम नवमी साजरी करण्यात आली. यावेळी ग्राम पुरोहित दिपक गोडबोले यांनी रामरक्षा स्तोत्र, पुरुषसूक्त, श्री सुक्त म्हणून अभिषेक करण्यात आले. दर्शनासाठी आलेल्या भाविकांना महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

राम नवमी निमित्त पहाटे पाच वाजता समस्त दुधाळ परिवार यांच्या हस्ते उत्सव मूर्तींची महापूजा करण्यात आली. सकाळी दहा वाजता राऊतवाडी येथील श्रीनाथ भजनी मंडळाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. दुपारी साडेबारा वाजता भाविकांनी फुलांची उधळण करत राम जन्मकाळ साजरा केला. फुलांनी सजवलेल्या पाळण्यात बाळाला ठेवून श्रीराम नामकरण करण्यात आले. यावेळी माया गुरव, दादा गोंधळी, स्वाती दुधाळ, निलम दुधाळ, कल्पना जाधव, ज्योती गुरव, छाया कदम यांनी पारंपरिक राम नवमीच्या पाळण्याचे गायन केले. राम नामाचा गजर करत महिला भाविकांनी प्रभू श्रीराम यांच्या पाळण्याचे दर्शन करण्यासाठी गर्दी केली होती.

साडेबारा वाजता अनिल दुधाळ, राजेंद्र दुधाळ, प्रकाश मोरे,बाळासाहेब जाधव, हनुमंत सोळसकर, यांनी महाआरती करून सुंठवडा व भिजवलेली चणाडाळ वाटून राम जन्मकाळ साजरा केला.शामकांत जाधव, गणेश दुधाळ, रविंद्र दुधाळ आदी भाविक उपस्थित होते. राम नवमी उत्सव साजरा करण्यासाठी राजेंद्र दुधाळ, मिलिंद दुधाळ,मनोज दुधाळ, सावता दुधाळ, संतोष दुधाळ, अनिल दुधाळ यांनी अथक परिश्रम घेतले.

# जोश

# अपंगत्वावर त्याने केली मात

स्वतः एखाद्या गंभीर व्याधीने ग्रस्त असूनही त्या व्याधीने ग्रस्त असलेल्या इतर रुग्णांच्या मदतीला धाऊन जाणारे फार कमी प्रमाणात आढळतात. डॉ. आदित्य लोहिया अशा व्यक्तींपैकीच एक. 'सेरेब्रल पाल्सी' हा अपंगत्व देणारा गुंतागुंतीचा विकार मानला जातो. मात्र या व्याधीने ग्रस्त असूनही इच्छाशक्तीच्या जोरावर डॉ.आदित्य लोहिया यांनी एक आदर्श निर्माण केला आहे.

**एखादं शारीरिक व्यंग असण्याचा परिणाम मानसिकतेवरही सातत्याने होत असतो. दैनंदिन कामांमध्ये व्यत्यय आणणाऱ्या व्याधी समाजापासून रुग्णांना दूर नेतात. पण अगदी हातावर मोजण्याइतक्या व्यक्ती या व्याधींना न जुमानता समाजाचा एक महत्त्वाचा भाग होतात. डॉ. आदित्य यांची कहाणीही अशीच काहीशी आहे. जाणून घेऊ या त्यांचा प्रेरणादायी प्रवास...**



आदित्यचा जन्म २५ ऑक्टोबर १९९७ रोजी महाराष्ट्रातील अकोला येथील एका मध्यमवर्गीय व्यापारी कुटुंबात झाला. येथूनच त्याने प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर आदित्यने आरएलटी कॉलेज ऑफ सायन्सेसमधून उच्च माध्यमिक शिक्षण घेतले. त्यानंतर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून एमबीबीएस पदवी पूर्ण केली. आदित्य सध्या नागपूरच्या इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून रेस्पिरेटरी मेडिसिनमध्ये पदव्युत्तर शिक्षण घेत आहे.

आदित्य आई-वडिलांमुळेच तो आज इथे असल्याचे सांगतो. आज तो स्वत: सर्वकाही करू शकतो. आदित्यने त्याच्यासारख्या अनेक मित्रांनाही मदत केली आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे आज नाशिक येथील महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विविध सुविधा उपलब्ध आहेत.

त्याच्या पुढाकाराने दिव्यांग विद्यार्थ्यांना तासाला २० मिनिटे अतिरिक्त वेळ दिला जाऊ लागला. शिवाय अतिरिक्त वेळेत प्रमाणपत्रेही दिली जाऊ लागली. ती संपूर्ण शिक्षण कालावधीत वैध राहण्याची व्यवस्था झाली. याशिवाय दिव्यांग विद्यार्थ्यांना त्यांच्या घराजवळ परीक्षा केंद्र उपलब्ध करून देण्याची मागणीही आदित्यने केली आहे. खेरीज अपंग विद्यार्थी त्यांचे उपचार सहज आणि पूर्णपणे पूर्ण करू शकतील, यासाठी त्यांना काही मिनिटे विश्रांती देण्याविषयीही त्याची मागणी आहे. आदित्यच्या प्रयत्नांमुळे आज दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर एक विशेष क्षेत्र तयार करण्यात आले आहे ज्यामध्ये सर्व नियम उपलब्ध आहेत. त्याने महाराष्ट्रातील विविध शासकीय शैक्षणिक महाविद्यालयांना भेटी देऊन अपंग विद्यार्थ्यांच्या समस्या जाणून घेतल्या. एवढेच नाही तर एम्सच्या पूर्वपरीक्षेसाठी अतिरिक्त वेळ न मिळण्याबाबत त्यांनी एम्सला जाणीव करून दिली. त्यानंतर एम्सने दिव्यांग व्यक्ती, सीसीडी आयुक्त यांना पत्र दिले आणि पुन्हा परीक्षा घेण्यात आली. पोस्ट ग्रॅज्युएशन करत असताना, आदित्य त्याच्यासारख्या मित्रांसाठी एक योग्य आणि नेहमीच उपयुक्त सहकारी म्हणून काम करतो. आदित्य अपंगांच्या समस्या समजून घेऊन त्या सोडवण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळेच या अचिव्हरला मिळालेला पुरस्कार रास्त म्हणावा लागेल.

अचिव्हर

# अपेक्षांनुसार निर्णय घ्या

मॅच मेकिंग

अनेकांप्रमाणे मीही डेटिंग ॲप्सचा नियमित वापर करते. माझ्या जीवलग मैत्रिणीचं नुकतंच लग्न झालं असून डेटिंग ॲपच्या माध्यमातूनच तिला तिचा जोडीदार गवसला. गेल्या वर्षभरापासून माझा डेटिंग ॲप्सवर वावर आहे. मात्र अजूनही मला योग्य मुलगा मिळालेला नाही. इथे कोणालाही नात्यात अडकायचं नाही. यामुळे मला अनेक प्रश्न पडतात. माझ्या या ॲप्सकडून अवास्तव अपेक्षा आहेत का, माझी मैत्रीण नशीबवान ठरली की माझ्यातच काही दोष आहेत. मला मार्गदर्शन करा.



**उत्तर :** सध्याच्या काळात डेटिंग ॲप्स मोठ्या प्रमाणावर वापरली जात आहेत. अशा ॲप्सच्या काही चांगल्या तर काही वाईट बाजू असतात. प्रत्येक जण आपल्या गरजेनुसार त्यांचा वापर करतो. डेटिंग ॲप्सवर भेटलेल्या लोकांनी लग्न केल्याचं फारसं ऐकिवात नाही. काही अपवाद असले तरी अशी नाती यशस्वी होण्याची शक्यता तशी कमीच असते. त्यातच आपल्या अपेक्षांवर बरंच काही अवलंबून असतं. या ॲप्सकडून तसंच भविष्यातल्या नात्याकडून तुला नेमकं काय हवं आहे ते समजून घे. त्यानुसार ॲप्सची निवड कर. यावर भेटलेल्या मुलांशी मोकळेपणाने बोल. त्यांना अपेक्षा सांग. मात्र चांगला जोडीदार मिळवण्यासाठी फक्त या ॲप्सवर अवलंबून राहू नको.

# प्रयोग करून बघा

फॅशन पॅशन

दोस्तांनो, तुम्ही मुलं काळ्या, पांढऱ्या किंवा फारतर ब्राउन रंगाचे बूट घालता. स्पोर्टस शूज घेताना काळ्या किंवा पांढऱ्या रंगाला पसंती दिली जाते. हे रंग कोणत्याही प्रकारच्या कपड्यांसोबत शोभून दिसत असले तरी पादत्राणांमध्येही थोडी व्हरायटी असायला हवी. कपड्यांप्रमाणेच पादत्राणांच्या बाबतीतही काही प्रयोग करता येतील. नेहमीच्या काळ्या, पांढऱ्या रंगांऐवजी काही हटके रंगांना पसंती देता येईल. पादत्राणांच्या अशाच काही पर्यायांविषयी...

✻ व्हॉयलेट किंवा पर्पल रंगाचे स्लीप ऑन्स हा खूप चांगला पर्याय आहे. त्यातच ही पादत्राणं हँड पेंटेड किंवा हातांनी रंगवलेली असतील तर अधिक उत्तम. ही पादत्राणं कोणत्याही प्रसंगाची शान ठरतील. निळी जीन्स, फिकट गुलाबी किंवा पांढरा शर्ट आणि पर्पल स्लीप ऑन्स हे कॉम्बिनेशन हटके दिसेल.

✻ रंगीबेरंगी किंवा निऑन रंगाचे स्पोर्टस शूज घेता येतील. स्ट्रेट फिट ब्लॅक चिनोज, पांढरा शर्ट त्यावर फेदोरा हॅट आणि निऑन स्पोर्टस शूज अशा पेहरावात तुम्ही भाव खावून जाल.

✻ मरून रंगाचे शूज किंवा मोजडी कॅरी करता येतील. हा गडद आणि लक्षवेधी रंग उठून दिसेल. या मोजडींवर थोडं नक्षीकाम असेल तर उत्तम. ही पादत्राणं पांढऱ्या किंवा फिकट रंगाच्या कुर्ता पायजम्यावर शोभून दिसतील.

✻ निळ्या रंगाची पादत्राणंही खूप सुंदर दिसतात.





# रोमांचक 'वळणदार' सफर

भटकंती

अनेकांना स्वत:च्या गाडीने फिरायला खूप आवडतं. स्वत: गाडी चालवत भटकंती करण्याचा आनंद वेगळाच. त्यातही झाडाझुडपांनी वेढलेल्या, नागमोडी वळणाच्या रस्त्यांवरून गाडी चालवण्यासारखं थ्रील नाही. तुम्हालाही लाँग ड्राईव्हला जायचं असेल किंवा जगावेगळ्या भटकंतीची आवड असेल तर भारतातल्या या रस्त्यांवरून एकदा तरी फिरायलाच हवं.

✻ सिक्किममध्ये थ्री लेव्हल झिगझॅग रोड आहे. समुद्रसपाटीपासून ११,२०० फूट उंचीवर असणारा हा मार्ग खूपच भन्नाट आहे. या मार्गावर अनेक वळणं असल्यामुळे चालकाचं कौशल्य पणाला लागतं. स्थानिक प्रशासनाच्या परवानगीनंतरच इथे गाडी चालवता येते. या रस्त्यावरून हिमालय पर्वताचं विहंगम दर्शन घडतं.

✻ तमिळनाडूमधला कोल्ली हिल्स भागातून गाडी चालवणं हा सुद्धा थरारक अनुभव असू शकतो. या रस्त्यावर ७० पेक्षा अधिक वळणं आहेत. घनदाट जंगलं आणि नयनरम्य दऱ्याखोऱ्यांच्या रस्त्यावरचा हा प्रवास अविस्मरणीय ठरतो.

✻ मनालीपासून ५३ किलोमीटर अंतरावर रोहतांग पास आहे. जून ते ऑक्टोबर या कालावधीत हा मार्ग वाहतुकीसाठी खुला असतो. या रस्त्यावरही धोकादायक वळणं आहेत. म्हणूनच कुशल वाहनचालकच या मार्गावरून गाडी चालवू शकतात.

# धावणं सुरू करताना...


फिटनेस फंडा

शारीरिक आणि मानसिक सक्षमतेसाठी धावण्यासारखा दुसरा व्यायाम नाही. नियमित धावण्यामुळे हाडं आणि स्नायू बळकट होतात. हृदयाची क्षमता वाढते. ताणतणाव कमी होतो आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे वजन कमी होतं. मात्र धावणं सोपं नसतं. धावण्याचं योग्य तंत्र गवसल्यानंतर त्याचे लाभ मिळू लागतात. तुम्हीही धावायला नुकतीच सुरूवात केली असेल किंवा धावण्याचा व्यायाम करण्याच्या विचारात असाल तर या टिप्स उपयोगी पडतील.

✻ धावण्यासाठी फार काही विकत घ्यावं लागत नाही. मात्र चांगल्या दर्जाचे बूट आणि व्यायामासाठी आरामदायी कपडे खूप आवश्यक आहेत. चांगले रनिंग शूज विकत घ्या. तसंच ढगळ आणि घाम शोषून घेणारे कपडे घालून धावायला जा. यामुळे तुमच्या धावण्याची गंमत अधिकच वाढेल.

✻ धावण्याआधी योग्य पद्धतीने वॉर्म अप करायला हवं. वॉर्म अपमुळे रक्ताभिसरणाची प्रक्रिया सुधारते. शरीर व्यायामासाठी सज्ज होतं. यामुळे दुखापतीचा धोका अनेक पटींनी कमी होतो. वॉर्म अपसाठी धावण्याआधी थोडं फार चाला किंवा साधारण पाच ते दहा मिनिटं शरीर ताणण्याचे व्यायाम करा. तसंच धावल्यानंतर वाढलेली हृदयगती पुन्हा सामान्य करण्यासाठी थोडे फार प्रयत्न करायला हवेत. या प्रक्रियेला कूल डाऊन असं म्हटलं जातं. यासाठी थोडं चालता येईल. तसंच सुरूवातीला एक दिवसाआड धावा.

✻ अगदी पहिल्या दिवसापासून खूप जोरात धावू नका. तसंच जास्त लांब अंतरही कापू नका. थोडं दमाने घ्या. सुरूवातीला एक किलोमीटर धावा. मध्ये धावण्याचा वेग कमी करून थोडं चाला. सुरूवातीला धावण्याचा वेग कमी ठेवा आणि पूर्ण अंतर याच वेगात कापा. थोडं जॉगिंग करा. प्रत्येक वेळी धावण्याचा कालावधी एक मिनिटांनी वाढवत न्या.



# यशाची खात्री आहे?

करियर

नवीन प्रकल्प कधी सुरू करायचा हे काळजीपूर्वक ठरवणे गरजेचे आहे कारण प्रकल्प वेळेआधी सुरू झाल्यास काही प्रमाणात अपयश होण्याची शक्यता वाढते. तेव्हा प्रकल्प सुरू करण्याची योग्य वेळ कधी आहे हे जाणून घ्यायला हवे.

सर्व प्रथम, आपण या नवीन प्रकल्पासह बाजारात कुठे आणि कसे उभे राहाल ते शोधा. नवीन कल्पना असेल तितका जास्त वेळ तुम्हाला त्यावर काम करावा लागेल, हे आधीच समजून असा. तुमचा प्रकल्प अद्वितीय आहे का, हेदेखील बघा. लक्षात ठेवा की तुमच्या मूळ व्यवसायापासून प्रकल्प वेगळा असेल तितका तुम्हाला संशोधन करण्यासाठी अधिक वेळ लागेल. म्हणूनच असे बाहेर असे इतर प्रकल्प चालू आहेत का? याची माहिती घ्या. त्याच स्वरुपाचा आणखी प्रकल्प झाल्यास कंपनी धोक्यात येणार नाही ना, हा प्रश्न स्वत:लाच विचारा. कोणताही नवीन प्रकल्प सुरू करण्यापूर्वी यश मिळण्याची शक्यता तपासा. हे लक्षात ठेवणे देखील महत्त्वाचे आहे की तुम्हाला खरोखरच हा प्रकल्प यशस्वी होण्याची ५० टक्क्यांपेक्षा कमी शक्यता दिसली तर प्रकल्पात सतत बदल करावे लागणार आहेत, सुधारणा कराव्या लागणार आहेत हे समजून घ्या. उलट ८० ते ९० टक्के यश मिळण्याची शक्यता असेल तर बिनधोक पुढे जाण्यास हरकत नाही.



शक्यतो सर्वात महत्त्वाची संसाधने आणि त्यांच्या स्त्रोतांसह या नवीन प्रकल्पाची अंदाजे किंमत निश्चित करा. हे करणे आवश्यक आहे कारण यानंतरच आपण हा प्रकल्प पुढे नेण्यास खरोखर पूर्णपणे तयार आहात की नाही हे आपल्याला योग्यरित्या समजू शकेल. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे टाइमलाइन लक्षात ठेवणे देखील महत्त्वाचे आहे. प्रकल्पाची सुरुवात वेगाने झाली पाहिजे. तो सुरुवातीलाच थंड पडला तर भविष्यात त्याची यशस्वी होण्याची शक्यता खूप कमी होते. म्हणूनच एक वेळापत्रक स्थापित करा. प्रकल्पाच्या टाइमलाइनकडे देखील लक्ष द्या. परंतु या टाइमलाइनमध्ये संशोधन आणि विचारांचा कालावधी समाविष्ट नसावा.

## फंडू एसएमएस

किसी को भी व्होट मिले
किसी का भी प्रचार हो,
बस तू मेरा रहे,
इस दिल में तेरीही सरकार हो।

सारे दोस्त काम के,
सबका अपना रोल,
जो संकट में साथ दे,
वो है सबसे अनमोल।

कामियाबी का जुनून होना चाहिये
फिर मुश्किलों की क्या औकात?

## व्हॉट्स न्यू?


### डेटा लिकेज तपासा



आज डेटा लीक होणे ही काही मोठी गोष्ट नाही. दररोज अनेक सोशल मीडिया साइट्सचा डेटा चोरला जात आहे आणि चुकीच्या कामांसाठी वापरला जातो. तुमचा स्वतःचा डेटा सुरक्षित ठेवायचा असेल तर पहिली पायरी म्हणजे तो लीक झाला नसल्याचे तपासून पाहा. शंका असल्यास haveibeenpwned.com ला भेट द्या. आता तुमच्या समोर एक पान उघडेल. आता खाली असलेल्या सर्च बारमध्ये तुमचा जी मेल आयडी टाका. काही सेकंदात ई-मेल आयडी लीक झाला आहे की नाही हे तुमच्या डेस्कटॉप स्क्रीनवर दिसेल. तुमचा आयडी लीक झाल्यास संपूर्ण स्क्रीन लाल होईल. तसे झाले नसेल तर तसे सांगणारा मजकूर झळकेल.

## स्मार्ट टिप्स

### गूगलवर अचूक माहिती हवी आहे?




कोणतीही माहिती शोधायची म्हटली की आपण गूगल बाबाला विचारतो. गूगलवर सगळ्या प्रश्नांची अचूक उत्तर सापडतील, असं आपल्याला वाटतं. मात्र गूगल सर्च करताना प्रत्येक वेळी अचूक पर्याय समोर येतीलच असं नाही. गूगलवर सर्च करताना अचूक पर्याय समोर येण्यासाठी नेमकं काय करायला हवं, याविषयी...गूगल सर्चवर एखादी ओळ लिहायची आहे. मात्र त्यातले काही शब्द तुम्हाला आठवत नसतील तर काळजी करू नका. या गाळलेल्या शब्दांच्या जागी स्टार ही खूण नोंदवा. यामुळे तुम्हाला आठवत नसलेले शब्द आपोआप येतील. तुम्हाला एखाद्या व्यक्तीचं वक्तव्य, विचार, लेख हवा असेल तर डबल इन्व्हर्टेड कॉमाचा वापर करा. म्हणजेच एखाद्या लेखातलं वाक्य आठवत असेल तर ते वाक्य डबल इन्व्हर्टेड कॉमामध्ये लिहा. या युक्तीमुळे तुम्हाला हवा असणारा लेख ओपन होईल.

## महत्त्वाचे

### ही चूक टाळा



आजच्या काळात आधार कार्ड हे कागदपत्र किती महत्त्वाचे आहे हे सांगण्याची गरज नाही. लोक पीव्हीसी आधार कार्ड बनवत आहेत. परंतु बहुतेक लोक हे करताना चूक करतात. काही लोक सायबर कॅफे आणि स्टेशनरीच्या दुकानात जाऊन पीव्हीसी कार्ड बनवून घेताना दिसतात. वास्तविक, तुम्हाला सायबर कॅफेमधून बनवलेले पीव्हीसी आधार कार्ड अनेक ठिकाणी वैध नाही. त्या कार्डवर दिलेला क्यू आर कोडही अनेक वेळा काम करत नाही आणि सरकारही त्याला मनाई करते. म्हणूनच तुम्ही घरबसल्या आधार वेबसाइटवरून पीव्हीसी आधार कार्ड मागवू शकता. पीव्हीसी कार्डवर आधार प्रिंट करून ते तुमच्या घरी पोहोचवण्यासाठी फक्त ५० रुपये द्यावे लागतील.

## सुविधा

### ई मेलसंबंधी...

व्हॉट्सपच्या आगमनाने ई-मेलचा वापर काहीसा कमी झाला असला तरी थांबलेला नाही. व्हॉट्सपवर मेसेज वाचला आहे की नाही हे कळते मात्र ही सुविधा ई-मेल लाही उपलब्ध असली तरी बहुतांश लोकांना माहिती नसते. हे जाणून घेण्यासाठी सर्वप्रथम, कॉम्प्युटरच्या गुगल क्रोमच्या वरच्या उजव्या बाजूला दिसणाऱ्या तीन डॉट्सवर क्लिक करा आणि नंतर अधिक टूल्सवर क्लिक करा.उघडलेल्या विंडोच्या अगदी तळाशी जा, तिथे गेट मोर एक्स्टेशनवर क्लिक करा. आता सर्च बारमध्ये जी मेल आणि एनबॉक्स ईमेल ट्रॅकिंगसाठी मेलट्रॅक टाइप करून शोधा. आता ते डाउनलोड करा आणि क्रोम मध्ये स्थापित करा. तुम्हाला जीमेल लॉगिनसाठी विचारले जाईल. लॉग इन केल्यानंतर, एक्टिव्हेट मेलट्रॅक वर क्लिक करा. इथे तुम्हाला ई मेल वाचली आहे की नाही हे समजेल.

## टेक-इन्फो

### वाय-फाय राउटर सुरू ठेवणे फायदेशीर

वाय-फाय राउटर २४/७ सुरू ठेवणे हा सर्वोत्तम पर्याय आहे. कारण राउटर पूर्णवेळ सुरू राहण्यासाठीच बनलेले असतात आणि ते डिव्हाइसला म्हणजेच आपले मोबाईल फोन्स, लॅपटॉप आदींना योग्यरित्या कार्य करण्यास मदत करतात. काहीजण रात्री वायफाय बंद करतात. त्यामुळे वीजबिलाची बचत होते, असे त्यांना वाटते. पण हे खरे नाही. रात्रीच्या वेळी वाय-फाय राउटर बंद करून ठेवला तरी ही बचत इतकी कमी आहे की त्याचा वीज बिलात फारसा फरक दिसणार नाही. त्यामुळे लोक सहसा राउटर बंद करत नाहीत कारण ते २४/७ चालण्यासाठीच डिझाइन केलेले असतात. उलटपक्षी वारंवार चालू-बंद केल्याने त्याचे आयुष्य कमी होऊ शकते.









# गुजरातच्या विजयात सिराज चमकला

## हैद्राबाद सलग चौथा सामना हरले! : वॉशिंग्टन-गिलची 'सुंदर' फलंदाजी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**हैदराबाद :** खणखणीत सांघिक प्रदर्शनाच्या बळावर गुजरात टायटन्स संघाने सनरायझर्स हैदराबाद संघावर ७ विकेट्सनी विजय मिळवला. हैदराबादचा यंदाच्या हंगामातला हा चौथा सलग पराभव आहे.

गुजरातने खेळपट्टीचा नूर ओळखून गोलंदाजीचा निर्णय घेतला. पहिल्याच षटकात मोहम्मद सिराजने ट्रॅव्हिस हेडला बाद केलं. त्याने ८ धावा केल्या. फटकेबाजीला सुरुवात केलेल्या अभिषेक शर्माला सिराजनेच तंबूचा रस्ता दाखवला. त्याने १८ धावा केल्या. पाठोपाठ इशान किशनही बाद झाला. प्रसिध कृष्णाने त्याला स्थिरावू दिलं नाही. ५०/३ वरून हेनरिच क्लासन आणि नितीश रेड्डी यांनी ५० धावांची भागीदारी केली. साई किशोरने क्लासनला त्रिफळाचीत करत ही जोडी फोडली. त्याने २७ धावा केल्या. पुढच्याच षटकात नितीश रेड्डीला माघारी धाडत हैदराबादला अडचणीत आणलं. त्याने ३१ धावा केल्या. उर्वरित

षटकांमध्ये अनिकेत वर्मा (१४ चेंडूत १८) आणि कर्णधार पॅट कमिन्स (नाबाद २२) यांनी उपयुक्त खेळी करत हैदराबादला सन्मानजक धावसंख्या गाठून दिली. सिराजने १७ धावांत ४ विकेट्स घेतल्या. प्रसिध कृष्णा आणि साईकिशोर यांनी प्रत्येकी ४ विकेट्स घेतल्या.

छोटेखानी लक्ष्याचा पाठलाग करताना साई सुदर्शन मोहम्मद शामीची शिकार ठरला. पॅट कमिन्सने जोस बटलरला बाद केलं. यामुळे गुजरातची अवस्था १६/२ अशी झाली. मात्र यानंतर शुबमन गिल आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी तिसऱ्या विकेटसाठी ९० धावांची भागीदारी केली. या भागीदारीने गुजरातच्या विजयाचा पाया रचला. गुजरातसाठी पदार्पणात वॉशिंग्टनने ४९ धावांची सुरेख खेळी साकारली.

शामीच्या गोलंदाजीवर अनिकेत वर्माने सुरेख झेल टिपत त्याची खेळी संपुष्टात आणली. कर्णधार शुबमनने सूत्रधाराची भूमिका निभावत संयमी अर्धशतकी खेळी साकारली. वॉशिंग्टन बाद झाल्यानंतर शेरफन रुदरफोर्डने वेगवान पवित्रा स्वीकारला. त्याने अभिषेक शर्माच्या एका षटकात १८ धावा वसूल केल्या. गिलने ४३ चेंडूत ६१ धावांची खेळी केली. रुदरफोर्डने १६ चेंडूत ३५ धावांची खेळी केली.

## बीसीसीआने गुजरातच्या प्रमुख गोलंदाजावर केली कारवाई



**हैद्राबाद :** इंडियन प्रीमिअर लीगमध्ये गुजरात टायटन्सने सलग तीन विजयांची नोंद केली. सनरायझर्स हैदराबादच्या ८ बाज १५२ धावांचा गुजरातने १६.४ षटकांत यशस्वी पाठलाग केला. हैदराबादकडून नितीश कुमार रेड्डी ( ३१), हेनरिच क्लासेन ( २७) व पॅट कमिन्स ( २२*) यांनी चांगला खेळ केला. गुजरातच्या मोहम्मद सिराजने सर्वाधिक ४ विकेट्स घेतल्या, तर साई किशोर व प्रसिद्ध कृष्णा यांनी प्रत्येकी दोन बळी टिपले. गुजरातकडून कर्णधार शुभमन गिलने ४३ चेंडूंत नाबाद ६१ धावांची खेळी केली, तर वॉशिंग्टन सुंदरने २९ चेंडूंत ४९ धावा केल्या, तर शेरफाने रुथरफोर्ड १६ चेंडूंत ३५ धावांवर नाबाद राहिला. या सामन्यानंतर गुजरात टायटन्सचा प्रमुख गोलंदाज इशांत शर्मा याच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. त्याला त्याच्या मॅच फीची २५ टक्के रक्कम दंड म्हणून भरावी लागणार आहे. सनरायझर्स हैदराबादविरुद्धच्या सामन्यात त्याला एक डिमेरिट गुण देण्यात आला आहे. त्याने आयपीएलच्या कलम २.२ नियमाचा भंग केला आणि त्यामुळे त्याच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे. जलदगती गोलंदाजानेही त्याची चूक मान्य केली आहे. 'इशांत शर्माने लेव्हल १ चा गुन्हा मान्य केला आहे आणि त्याला सामनाधिकाऱ्याने दंड सुनावला आहे,'असे आयपीएलने त्यांच्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. इशांत शर्माला या सामन्यात फार चांगली कामगिरी करता आलेली नाही. कालही त्याने ४ षटकांत ५३ धावा दिल्या. त्याने आयपीएलमध्ये आतापर्यंत ७ संघांचे प्रतिनिधित्व केले आहे आणि ११३ सामन्यांत त्याच्या नावावर ९३ विकेट्स आहेत.

## फ्लेम बॉइज ने पटकावला पुणे ट्राईब - सिझन १ चषक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे ट्राईब तर्फे कल्याणी नगर येथील एनफिल्ड अरेना येथे नुकतेच एक दिवसीय बॉक्स क्रिकेट सामन्याचे आयोजन करण्यात आले होते. प्रत्येकी ७ खेळाडू असलेले ट्राईब ब्लास्टर, फ्लेम बॉईज, सेव्हन अॅव्हेंजर, पी टी स्मॅशर्स, रॉयल हीटर्स आणि सेव्हन स्टार्स हे ६ संघ मैदानात उतरले होते. त्यांच्यात १५ चुरशीचे सामने पार पडले.

या स्पर्धेत प्रत्येक सामन्यानुसार ठरलेले सामनावीर निवडण्यात आले. त्यामधे सर्वोत्तम फलंदाज अर्जुन जिवनानी, सर्वोत्तम गोलंदाज आणि क्षेत्ररक्षक रितेश कामडी, सर्वात मौल्यवान खेळाडू मंगेश शुक्ल यांचा समावेश आहे. अंतिम सामना फ्लेम बॉईज आणि पी टी स्मॅशर्स यांच्यात खेळला गेला. पी टी स्मॅशर्सनी ६ षटकांत ५६ धावा केल्या. फ्लेम बॉईजने पाठलाग करत शेवटच्या चेंडूवर ४ धावा करत विजेतेपद जिंकले. अंतिम सामन्यातील कर्णधार आणि फ्लेम बॉईज संघाचे मालक मृणाल चड्डा हे सामन्याचे मानकरी ठरले.

वन स्टॉप सोल्यूशन्स तर्फे रोख बक्षीस १५,००० रू. आणि पुणे ट्राईब चषक फ्लेम बॉईज संघास देण्यात आला तर पी टी स्मॅशर्स या उपविजेता संघास उद्योजक आणि सामन्याचे आयोजक दिलीप गुप्ता यांच्या डॉल्फिन ग्रूप कडून रोख रक्कम ११,००० रू. आणि चषक बहाल करण्यात आला.

या एक दिवसीय सामन्याचे संयोजन अमित करमरकर, श्वेता कोठारे, स्वाती अजित, सायली तेल्हारकर, मृणाल चड्डा, शर्मिष्ठा बी.एन, कार्तिक कुमार, हितेन ठक्कर आणि मुबारक मुल्ला यांनी केले होते. पुणे ट्राईब हे समाज माध्यमातून एकत्र आलेले तिशीच्या पुढच्या वयोगटातील महिला आणि पुरुषांचा समावेश असलेले एक मित्र मंडळ असून या द्वारे वर्ष भर विविध कार्यक्रम आयोजित केले जातात.

## लौकिक अॅकॅडमी, कॉशन्ट पुणे, उत्कर्ष क्रिडा मंच कोथरूड, सिटी एफसी संघांचे विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पीडीएफए युथ लीग' फुटबॉल स्पर्धेच्या १३ वर्षाखालील गटात महाराष्ट्रीय मंडळ एफसी, लौकिक फुटबॉल अॅकॅडमी, कॉशन्ट फुटबॉल पुणे, उत्कर्ष क्रिडा मंच कोथरूड आणि सिटी एफसी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून एकतर्फी विजय नोंदविले.

सिंहगड रोड, माणिकबाग येथील आरएस स्पोटर्स कॉम्प्लेक्स् मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत १३ वर्षाखालील गटामध्ये महाराष्ट्रीय मंडळ एफसी संघाने मेट्रोसिटी एफए संघाचा ८-१ असा सहज पराभव केला. सामन्यामध्ये महाराष्ट्रीय मंडळकडून मिहीर जोशी याने ३ गोल तर, अहान एस. आणि अर्वयान एस. यांनी प्रत्येकी २ गोल नोंदविले. हुवरास्त एम. याने एक गोल केला. अव्देत टी. याने केलेल्या चार गोलांच्या जोरावर लौकिक फुटबॉल अॅकॅडमीने चौधे पाटील एससीचा ५-२ असा सहज पराभव केला.

कॉशन्ट फुटबॉल पुणे संघाने इनोव्हेटीव्ह एफसी संघाचा ४-० असा सहज पराभव केला. विजयी संघाकडून स्टीफन के. याने २ गोल तर, श्लोक परमार आणि अर्णव मोरे यांनी प्रत्येकी एक गोल केला.

स्टॅलियन्स् एफसी आणि गेम ऑफ गोल्स् एफसी यांच्यामधील सामना २-२ असा बरोबरीत सुटला. स्टॅलियन्स् संघाकडून रेयान एम. आणि अक्शित एच. यांनी तर, गेम ऑफ गोल्स् एफसी संघाकडून अर्जुन पंडीत याने दोन गोल नोंदविले. उत्कर्ष क्रिडा मंच कोथरूड संघाने स्पोटर्स मेनिया संघाचा ८-१ असा धुव्वा उडविला. युकेएम संघाकडून आरव के. आणि कुशल बी. यांनी प्रत्येकी ३ गोल तर, विहान पी. आणि पर्व एस. यांनी प्रत्येकी एकेक गोल केला. सिटी एफसी संघानेही एकतर्फी विजय मिळवताना इग्नाईट एफसीचा ७-४ असा पराभव केला. वेद ए. याने सर्वाधिक ४ गोल केले. आदिनाथ ए. याने दोन गोल तर, अवनीश जोशी याने एक गोल केला.

## चेंडूवर लाळेच्या परवानगीचा फायदा होतो आहे- मोहम्मद सिराज



**नवी दिल्ली :** 'चेंडूवर लाळेच्या वापराला परवानगी मिळाल्याचा मला निश्चितच फायदा होतो आहे', असं गुजरात टायटन्सचा गोलंदाज मोहम्मद सिराजने सांगितलं. सिराजने रविवारी हैदराबादविरुद्धच्या लढतीत ४ विकेट्स पटकावल्या. यामुळे गुजरातने हैदराबादला १५२ धावांतच रोखलं. हैदराबादच्या एकापेक्षा एक स्फोटक फलंदाजीसाठी प्रसिद्ध फलंदाजांना रोखण्यात सिराजची भूमिका निर्णायक ठरली. 'मी गोलंदाजीचा आनंद लुटतो आहे. मला पुरेशी विश्रांती मिळाली. या काळात मी गोलंदाजीवर आणि फिटनेसवर काम केलं. शरीर ताजंतवानं आहे. लाळेच्या वापरास परवानगी मिळाली आहे. याचा फायदा मला मिळतो आहे. चेंडू टप्पा पडल्यानंतर स्विंग होऊ लागला तर विकेट मिळते. लाळेच्या वापरायची परवानगी नव्हती तेव्हा चेंडू बॅटवर सहजतेने येत असे. फलंदाज त्या चेंडूवर जोरदार प्रहार करून धावा वसूल करत. नियम बदलल्यामुळे गोलंदाजांना विकेट पटकावण्याच्या संधी वाढल्या आहेत. या सामन्यातली खेळपट्टी संथ आणि धीमी आहे. मी चेंडू स्विंग करण्याचा प्रयत्न केला पण तो झाला नाही. स्टंप्सच्या दिशेने आक्रमण करणं फायदेशीर ठरतं', असं सिराजने सांगितलं. आयपीएल गव्हर्निंग काऊंसिलने यंदाच्या हंगामात लाळेचा वापर करण्यास परवानगी दिली होती. कोरोना काळात संसर्गाचा धोका लक्षात घेऊन चेंडूवर लाळेच्या वापरास बंदी घालण्यात आली होती. आयपीएलमध्ये ही सूट देण्यात आली असली तरी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आयसीसीने हा नियम अद्यापही शिथिल केलेला नाही. 'आयपीएल'च्या हंगामास सुरुवात होण्यापूर्वी दहाही संघांच्या कर्णधारांची मुंबई येथे बैठक झाली. या बैठकीत कर्णधारांनी 'बीसीसीआय'च्या प्रस्तावास मान्यता दिली.

## लायन्स् प्रौढ करंडक : रिस्क्राईब, दिक्षीत रॉयल्स् संघांमध्ये विजेतेपदासाठी लढत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**पुणे :** स्पोटर्सफिल्ड मॅनेजमेंट तर्फे आयोजित लायन शंतनु सिद्धा स्मृतीप्रित्यर्थ तिसऱ्या 'लायन्स् प्रौढ करंडक' (४० वर्षावरील) टी-२० क्रिकेट स्पर्धेत रिस्क्राईब आणि दिक्षीत रॉयल्स् या संघांनी अनुक्रमे गार्गी एज्युकॉन आणि रायगड वॉरीयर्स या संघांचा पराभव करून स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला.

येवलेवाडी येथील ब्रिलीयंट्स स्पोटर्स अॅकॅडमी मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत हृषीकेश मत्स्ये याने केलेल्या अर्धशतकी खेळीमुळे दिक्षीत रॉयल्स्ने रायगड वॉरीयर्स संघाचा ९ गडी राखून सहज पराभव केला. पहिल्यांदा खेळताना रायगड वॉरीयर्सने ११० धावा धावफलकावर लावल्या. हा डाव उभा करताना अमर याने नाबाद ३१ धावा आणि सिकंदर पाटील याने २४ धावांची खेळी केली. पराग चितळे याने ३ गडी तर, सचिन कापडे याने २ गडी बाद केले. हे लक्ष्य दिक्षीत रॉयल्स्ने १२.२ षटकात व १ गडी गमावून पूर्ण केले. हृषीकेश मत्स्ये याने ३४ चेंडूत ९ चौकारांच्या मदतीने ५३ धावांची खेळी केली. दुसऱ्या बाजुने राहूल बेलसरे (३४ धावा) आणि विवेक देशमुख (नाबाद १८ धावा) यांनी धावांचे योगदान देऊन संघाला सहज विजय मिळवून दिला.

संतोष पुणेकर याने फटकावलेल्या ६७ धावांच्या जोरावर रिस्क्राईब संघाने गार्गी एज्युकॉन संघाचा २४ धावांनी पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला. पहिल्यांदा खेळताना रिस्क्राईब संघाने १८० धावांचे आव्हान उभे केले. संघाचा डाव बांधताना संतोष पुणेकर याने ६७ धावांची खेळी केली. अमर खेडेकर (नाबाद ४१ धावा) आणि राहूल कामठे (२५ धावा) यांनीही धावांचे योगदान दिले. या लक्ष्याचा पाठलाग करताना गार्गी एज्युकॉनचा डाव १५६ धावांवर संपुष्टात आला. पराग सराफ याने ४७ धावांची खेळी करून प्रतिकार केला. अरविंद चौहान आणि वासिम शेख यांनी प्रत्येकी दोन गडी बाद करून संघाला सहज विजय दिला.

### पीवायसी हिंदू जिमखाना अ व ब, बँक ऑफ

## महाराष्ट्र, सेन्सिस सॉफ्टवेअर लिमिटेड संघांचे विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे डिस्ट्रिक्ट चेस सर्कल यांच्या वतीने आयोजित पहिल्या कॉर्पोरेट व क्लब बुद्धिबळ सांघिक अजिंक्यपद २०२५ स्पर्धेत पाचव्या फेरीत पीवायसी हिंदू जिमखाना अ व ब, बँक ऑफ महाराष्ट्र, सेन्सिस सॉफ्टवेअर लिमिटेड या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून आगेकूच केली.

द नेचर, मुकाईवाडी पुणे या ठिकाणी सुरू असलेल्या या स्पर्धेत पाचव्या फेरीत मिहिर नानिवडेकर, अक्षय साठे, आदित्य लाखे, तन्मय चितळे यांच्या विजयी कामगिरीच्या जोरावर पीवायसी हिंदू जिमखाना अ संघाने टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस लिमिटेड संघाचा ४-० असा एकतर्फी पराभव केला. बँक ऑफ महाराष्ट्र संघाने यार्डी सॉफ्टवेअर प्रायव्हेट लिमिटेड संघाचा २.५-१.५ असा पराभव केला.

अन्य लढतीत पीवायसी हिंदू जिमखाना ब संघाने बॉश ग्लोबल सॉफ्टवेअर टेकनॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड संघाचा २.५-१.५ असा पराभव केला. विजयी संघाकडून किरण खरे, निरंजन गोडबोले यांनी सुरेख कामगिरी बजावली. याआधी स्पर्धेचे उद्घाटन एमसीएचे सचिव निरंजन गोडबोले, अवधूत देशपांडे, आशिष भोसेकर यांच्या हस्ते करण्यात आले.

## ग्लेन फिलिप्सला दुसऱ्यांचा आधार घेत अचानक सोडावं लागलं मैदान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** इंडियन प्रीमियर लीग २०२५ स्पर्धेत सनरायझर्स हैदराबाद विरुद्ध गुजरात टायटन्स संघात रविवारी (६ एप्रिल) सामना सुरू आहे. या सामन्यात गुजरातने सामन्यात वर्चस्व ठेवलं आहे. पण तरी त्यांना एक मोठा धक्का या सामन्यात बसला. त्यांचा एक महत्त्वाचा खेळाडू दुखापतग्रस्त झाला असून त्याला मैदानातूनच बाहेर जावं लागलं आहे.

या सामन्यात प्रथम गोलंदाजी करणाऱ्या गुजरातला मोहम्मद सिराजने दमदार सुरुवात करून दिली होती. त्याने ट्रॅव्हिस हेड आणि अभिषेक शर्मा या सनरायझर्स हैदराबादच्या सलामीवीरांच्या विकेट्स घेतल्या होत्या.

पण या सामन्यात पॉवरप्ले सुरू असताना सध्याचा सर्वोत्तम क्षेत्ररक्षक असलेल्या ग्लेन फिलिप्स सब्स्टिट्युट म्हणून क्षेत्ररक्षण करायला आला होता. ६ व्या षटकादरम्याने प्रसिद्ध कृष्णाच्या गोलंदाजीवर इशान किशनने शॉट खेळला. पण तो शॉट फिलिप्सने सूर मारत आडवला. पण यादरम्यान त्याच्या मांडीजवळ वेदना झाल्या, ज्यामुळे तो थेट खाली झोपला. त्यामुळे फिजिओ लगेचच मैदानात आले. त्यांनी त्याला तपासल्यानंतर लक्षात आले की त्याच्या वेदना अधिक आहेत. त्याला चालताही येत नव्हते, त्यामुळे त्याला आधार देत मैदानातून बाहेर नेण्यात आले. खरंतर फिलिप्सला २ कोटी रुपयांना गुजरातने खरेदी केले असले, तरी अद्याप त्याला प्लेइंग इलेव्हनमध्ये संधी दिली नव्हती. पण त्याला या सामन्यात इम्पॅक्ट सबस्टिट्युट म्हणून खेळवले जाण्याची दाट शक्यता होती. परंतु, आता त्याला दुखापत झाल्याने त्याच्या उपलब्धतेवरही प्रश्नचिन्ह आहे.

### माही म्हणाला, त्यांचा खेळ पाहणे म्हणजे सौभाग्यच...

## धोनीच्या ड्रिम टीममध्ये भारताच्या तीन दिग्गजांची नावं

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** महेंद्रसिंग धोनीने त्याच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट कारकीर्दित अनेक स्टार खेळाडूंच्या मार्गदर्शनाखाली खेळण्याची संधी मिळाली आणि नंतर त्याच्या नेतृत्वाखाली अनेक दिग्गजही खेळले. सचिन तेंडुलकर, राहुल द्रविड, सौरव गांगुली, व्हीव्हीएस लक्ष्मण, वीरेंद्र सेहवाग, गौतम गंभीर, विराट कोहली, रोहित शर्मा, झहीर खान, हरभजन सिंग, अनिल कुंबळे, युवराज सिंग यांच्यासारख्या अनेकांसोबत धोनी खेळला आणि त्यांचे नेतृत्वही केले.

त्यामुळे जेव्हा धोनीला त्याच्या स्वप्नातील संघ निवडण्यास सांगितले गेले, तेव्हा तो थोडा कन्फ्युज झाला. त्याच्या ड्रिम टीममध्ये भारतीय खेळाडूंनाच प्राधान्य दिले, परंतु तो तीन खेळाडूंची निवड करून थांबला. असा संघ निवडणे अवघड असल्याचे त्याने मान्य करताना, आपण म्हणून ड्रिम टीम निवडत नसल्याचे तो म्हणाला.

"ड्रिम टीममध्ये मी भारतीय खेळाडूंनाच निवडणे पसंत करेन," असे धोनीने राज शमानी याच्या पॉडकास्टवर सांगितले. "विरू पा (वीरेंद्र सेहवाग) डावाची सुरुवात करेल. तर विरू पा, सचिन ( तेंडुलकर), दादा (सौरव गांगुली) या तिघांची मी निवड करेन. तुम्ही कल्पना करा की सर्वजण त्यांच्या सर्वोत्तम फॉर्ममध्ये आहेत आणि त्यांना खेळताना पाहण्याची संधी तुम्हाला गमवायची नाही. तेव्हा तुम्हाला वाटते की यापेक्षा चांगले कोणीच नाही. पण क्रिकेट हा चढ-उतारांचा खेळ आहे. त्यामुळे निवड करणे खूप कठीण होते, पण आम्ही या सर्व खेळाडूंची कामगिरी पाहत मोठे झालो आहोत." धोनीने पुढे सांगितले की या सर्व खेळाडूंनी भारतीय क्रिकेटच्या यशात योगदान दिले आहे, त्यामुळे तो फक्त त्यांच्या कामगिरीचा आनंद घेऊ इच्छितो. "जेव्हा युवी (युवराज) सलग सहा षटकार मारत होता, तेव्हा तुम्हाला दुसरं कोणाला खेळताना पाहायला आवडले नसते. तर मग, मी अमुक एकालाच का निवडावे? मी सर्वांच्या खेळाचा आनंद का घेऊ शकत नाही? त्यांनी सर्वांनी भारतासाठी योगदान दिले आहे. त्यांनी भारताला अनेक स्पर्धा जिंकून दिल्या आहेत," असे धोनी हणाला.

#रा